# डॉ.सुजाता मोरे चव्हाण

# संकलन अनुभवांचे



# संकलन अनुभवांचे

डॉ सुजाता मोरे चव्हाण

ई साहित्य प्रतिष्ठान

# संकलन अनुभवांचे

लेखिका : डॉ सुजाता चव्हाण,

Asst.prof.

Advanced centre for women studies

Tata Institute for Social Sciences

drsujatachavan61@gmail.com

phone no.09867934108

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखिकेकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखिकेची परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.

प्रकाशन : ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.com

esahity@gmail.com

9869674820

प्रकाशन : १६ जानेवारी २०१८

©esahity Pratishthan®2018

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची परवानगी घेणे आवश्यक आहे.

ई साहित्य प्रतिष्ठानची पुस्तके नियमित मिळण्यासाठी VIP सभासद व्हा.

आपल्या दहा मराठी मित्र किंवा नातेवाईकांचे ई मेल पत्ते पाठवा.

आमचा पत्ता : esahity@gmail.com

अधिक माहितीसाठी : www.esahity.com

# संकलन अनुभवांचे

**डॉ. सुजाता मोरे चव्हाण**
सहाय्यक प्राध्यापिका
टाटा सामाजिक विज्ञान केंद्र, मुंबई.

आदरणीय न्यायमूर्ती पालकर यांना अर्पण.

# प्रस्तावना

१९८३ मध्ये टाटा सामाजिक विज्ञानसंस्थेतून मेडिकल अॅंड सायकॅट्रिक सोशलवर्क मध्ये पोस्टग्रॅज्युएशन केल्यावर हॉस्पिटलमध्ये मेडिकल सोशल वर्कर म्हणून कामाला सुरुवात केली. के.ई.एम., जी.टी. हॉस्पिटल व टाटा मेमोरियल हॉस्पिटल मध्ये १९८९ पर्यंत काम केले. मुंबई कुटुंब न्यायालयात त्याच्या स्थापनेच्या दिवसापासून (१९८९) २०१३ पर्यंत विवाह समुपदेशक म्हणून कार्य केले. खूप प्रकारच्या व्यक्ती भेटल्या. विविध प्रकारच्या समस्या जवळून पहायला मिळाल्या. खूप काही शिकायला मिळाले.

कुटुंब न्यायालयाची स्थापना झाली आणि घटस्फोटाचे प्रमाण कमी करण्याचे, कुटुंब टिकवण्याचे प्रयत्न खऱ्या अर्थाने सुरु झाले. ३४ वर्षांच्या अनुभवातून बऱ्याच व्यक्ती, त्यांचे स्वभाव, मानवी प्रवृत्ती यांचे जवळून दर्शन झाले. 'व्यक्ती तितक्या प्रवृत्ती' हे म्हणणे सोपे असते पण त्यामुळे आपल्या बरोबरच्या मंडळींना त्याचा किती त्रास होत असेल, त्याने त्या दुखावल्या जात असतील याचा विचार करायला नको का? आपल्या बरोबरच जवळच्यांचा विचार करणे कठीण का जावे? स्वकेंद्रित वागणूक माणसाला सुखी करु शकेल का? छोट्या छोट्या गोष्टींत सुद्धा जर जळवून घेणे कठीण वाटू लागले तर कुटुंब व्यवस्था टिकेल का?

नोकरीनिमित्त विवाह समुपदेशकाचे काम करत असतांना हे खूपच जाणवले की कित्येकदा शुल्लक कारणे मोठी बनतात आणि संसार मोडेपर्यंत पोहचतात. मग असे वाटते की हे समुपदेशन विवाहपूर्व मुला-मुलींना दिले गेले तर त्याचा नक्कीच फायदा होईल. नोकरीत आलेले अनुभव, भेटलेल्या व्यक्तींपैकी काही केसेस लिहून ठेवाव्यात असे वाटले. त्या खऱ्या केसेस, नावे बदलून लिहिलेल्या आहेत. अनुभवातून शहाणपण यावे, तसे या कथांमधून कदाचित त्याचा फायदा होऊ शकेल.

डॉ. सुजाता मोरे चव्हाण

1. अवाक!
2. आशा
3. समजुतदारपणाची गरज
4. चूक कोणाची?
5. गैरसमज
6. जबाबदार कोण?
7. हुंडा
8. जीवनसाथी
9. असेही एक जोडपे
10. मंदा
11. जरा शांतपणे विचार केला तर!
12. नंदिनी
13. प्रेम
14. पेच
15. चंचल
16. मुले-आईवडिलांमधील दुवा
17. मी माझ्या पायावर
18. तडजोड
19. विसंवाद
20. फसवणूक
21. ती स्त्री आहे म्हणून!
22. सुभद्रा
23. सुदैव
24. परिणती
25. निराधार
26. हे टाळता आले असते का?
27. पश्चाताप
28. घटस्फोट
29. पुरुष जात
30. अट्टाहास

# अवाक!

"ताई, मला कळलं की मला काय झालंय. मला किनई '**C-A-N-C-E-R**' झालाय. मला माझ्या टीचरने सांगितले." अद्वैत माझ्याशी बोलत होता. त्याच्या हातात एक कागद होता. त्यावर मघाचे सांगितलेले स्पेलिंग होते. ते त्याने त्याच्या पेपरस्वरुन लिहिले होते व आपल्या टीचरला त्या शब्दाचा अर्थ विचारला होता. ९-१० वर्षांचे ते पोर! अगदी सहजपणे बोलत होता पण मला मात्र खूपच धक्का बसला होता.

अद्वैत रक्ताच्या कॅन्सरने आजारी होता. त्याचे उपचार चालू होते. दर आठवड्याला एक इंजेक्शन असायचे. त्याला इंजेक्शन हॉस्पिटलच्या फ्री ड्रगच्या कोट्यातून दिले जात होते. त्यामुळे दर इंजेक्शनच्या दिवशी त्याला आमच्याकडे यावे लागत असे. त्याची माझी ओळख होतीच. त्याने पूर्वी मला त्याच्या आजाराबद्दल विचारले होते. पण मी कॅन्सर हा शब्द वापरणे टाळले होते. आज म्हणूनच तो स्वत: शोध कसा लावला हे सांगत होता. अद्वैत एक हसरा फुललेला चेहरा. दोन वर्षांपर्यंत अगदी नॉर्मल होता. एके दिवशी अचानकपणे खूप ताप आला आणि तो बरा होईचना. त्यावर उपाय झाले. शेवटी आमच्या रुग्णालयात आणले. निदान केले गेले 'ब्लड कॅन्सर'. इतकुसा जीव. त्याचे काय हे वय आहे अंथरुणात पडून रहाण्याचे! घरात सर्वांनाच खूप चिंता लागली होती. तो बरा होण्याची शक्यता फारशी नव्हती. मधूनमधून त्याला दवाखान्यात भरती करत होते. इंजेक्शन्स्चालू होती. अद्वैतला चित्रकला व वाचनाचा छंद होता. रोज एखादे चित्र तो काढी. वाचन तर सतत चालू असायचे. ह्यावर्षी त्याला परीक्षेला बसता येईल का ह्याची काळजी वाटत होती. परीक्षेच्या वेळीसच तो जास्त आजारी झाला तर?! मी त्याच्या वर्गशिक्षक व प्रिन्सिपॉल ह्यांना भेटून आले. अद्वैतच्या आजारपणाबद्दल अलीकडेच त्याच्या आईवडिलांनी त्यांना कळवले होते. त्याची परीक्षा त्याला घरीच ठेवून घेण्याचे त्यांनी आश्वासन दिले. अद्वैतला खूप बरे वाटले. आपला पहिला नंबर ह्यावर्षीपण कायम ठेवायचा असे त्याने ठरवले. त्याला वाटले होते तसेच झाले. परीक्षेच्या काळात त्याला घरीच रहावे लागले. त्याने ठरल्याप्रमाणे घरुनच परीक्षा दिली.

परीक्षा संपली आणि दुसऱ्या दिवशी मात्र तो खूपच अस्वस्थ झाला. त्याला खूप त्रास व्हायला लागला. लगेच त्याला दवाखान्यात भरती केले. त्याची स्थिती खूपच खालावत होती. तो दिवस होता रविवार! आमची सुट्टी! दुसऱ्या दिवशी नेहमीप्रमाणे वॉर्डमधे गेले तर अद्वैत दिसला. परीक्षा कशी गेली म्हणून विचारपूस केली तर त्याला धड बोलताही येईना. त्याच्याकडे बघून मला खूप वाईट वाटले. पण काय करणार? आपल्या हातात हळहळण्याशिवाय दुसरे काही नव्हते. त्याचे आईवडिल येरझाऱ्या घालत होते, आपल्याच लेकाच्या वाटेला का यावे म्हणून नशिबाला दोष देत होते.

खरेतर आमच्याकडे रोज असे अनेक रुग्ण येतात. कितीतरी जण हे अशा आजाराने ग्रस्त असतात. तुम्ही एकटेच नाही अशी जणू ते इतर सर्व ग्वाही देतात. पण तरीही "मलाच का?" असा प्रश्न प्रत्येकाला पडतोच. आम्ही समाजसेवक त्यांची समजूत काढण्याचा आटोकाट प्रयत्न करतो. पण कितीही झाले तरी त्या व्यक्तीला वाटणाऱ्या भावना सह-अनुभवण्याशिवाय जास्त आम्ही काय करणार? आहे त्या परिस्थितीतून जास्तीत जास्त चांगल्या पद्धतीने बाहेर येता येईल ह्यासाठी मदत करण्यापलिकडे काय करणार? अद्वैतकडे बघून मला खूप वाईट वाटत होते.

एकूणच कॅन्सर पेशंटशी काम करतांना सुखद अनुभव येत नाहीत असे नाही. पण तसे कमी वेळा घडते. खूपदा आपल्यालाही समोरच्या व्यक्ती-कुटुंबाकडे बघून खूपच वाईट वाटते व हतबलपणा वाटतो. त्यातून जर लहान मुले ह्या आजाराची शिकार बनले तर मला स्वत:ला मात्र खूपच अस्वस्थ व्हायला होते. व्यावसायिक पातळीवर जरी आम्ही समुपदेशन करत असलो तर कुठेतरी मनाला त्याची झळ पोहचल्याशिवाय रहात नाही.

अद्वैतची अवस्था बघून मला त्यादिवशी जेवण गेले नाही. रोज पहिल्यांदा त्याला भेटायला मी जायचे. असा एकच अद्वैत दवाखान्यात होता असे नाही पण त्याच्याबद्दल जरा जास्त जवळीक निर्माण झाली होती हेच खरे. एका

सुट्टीच्या दुसऱ्या दिवशी सकाळी रुग्णालयाच्या दरवाज्यातच त्याचे आईवडिल माझी वाट बघत थांबले होते. अद्वैत सारखी तुमची आठवण काढतोय असे ते म्हणाले. त्याच पावली मी त्याला भेटायला गेले. अद्वैतला वाचवण्याचे डॉक्टरांचे प्रयत्न संपले होते. त्यांनी सर्व नातेवाईकांना बोलावयास सांगितले होते. मी अद्वैतचा हात हातात घेतला. दोन शब्द अगदी जड अंत:करणाने बोलले. झालं, अद्वैत या जगातून गेला! किती चिमुरडा तो जीव! काय पाहिले त्याने ह्या जगात? पण त्याचे बोलणे दरवेळी काहीतरी सांगून जात असायचे. त्याची आजी तो पाच वर्षांचा असतांनाच निधन पावली. त्याच्याच घरी ती असायची. त्यापूर्वी ती पूर्णपणे अंथरुणाला खिळून असायची. तिचे सर्व काही इतरांना करावे लागे. अद्वैत एकदा म्हणाला होता की मी पण आजीसारखाच अंथरुणात पडलोय म्हणजे मी पण आजीसारखाच देवाच्या घरी जाणार. नेहमी हसऱ्या चेहऱ्याने वावरणारा हा मुलगा आपल्या आजाराबद्दल, मृत्यूबद्दल माहित असूनही आनंदात असायचा.

अद्वैतचा तो हसरा चेहरा आणि आताचा निष्प्राण चेहरा! दोन्ही डोळ्यांसमोरुन हलणे शक्य होत नाही.

# आशा

सासूबाई बऱ्याच दिवसांपासून मागे लागल्या आहेत की तू हे मुल पाड. मीनाच्या मनात हा विचार परतपरत येत होता. घरात सर्वच जण मुल पाडण्याबद्दल तिला समजावत किंबहुना धमकावत होते. पण तिचे मन ते मानायला तयार होत नव्हते. मनातले हे द्वंद्व चालूच होते. नवरा त्याच्या आईच्या आज्ञेबाहेर नव्हता. मीनाला मातृत्त्वाची ओढ होती. 'आई' व्हायचे तिचे स्वप्न होते.

आपल्याला दिवस गेले आहेत हे कळल्यावर तिला खूप आनंद झाला होता. नवऱ्याने तिला डॉक्टरांकडे नेले. आल्यापासून मात्र त्यांचे वागणे बदलले. डॉक्टरांनी गर्भात मुलगी आहे हे सांगितल्यावर घरच्यांना ते मुल नको असे सर्व सांगत होते. मुलगी होणार म्हणजे संकटच कोसळणार होते. मीना आपल्या मनाला मारुन हे त्यांचे सांगणे ऐकण्याच्या परिस्थितीत नव्हती. शेवटी निर्धार करुन ती हट्टाने घरातल्या सर्वांना म्हणाली की ती हे मुल पाडणार नाही. घरच्यांनी तिला रागाने घराबाहेर काढले. पुढे ती माहेरी न जाता असेच कुठेकुठे राहून दिवस काढत गेली. मुलीच्या जन्माने तिला मातृत्त्वाचे समाधान मिळाले. मुलीचे नाव तिने 'आशा' ठेवले. मीना आता आपल्या पायावर उभी होती. तिचे व आशाचे ठीक चालले होते. एका जंगलाच्या जवळच तिने एक झोपडी बांधली होती. आशा त्या जंगलात खेळत असे.

एके दिवशी त्या जंगलात एक आजीबाई आली होती. आजीचे वय ७०-८० च्या घरात होते. 'पाणी पाणी' म्हणून तिचा आक्रोश चालू होता.

ह्या आजीला दोन मुलगे होते. त्या दोन्ही मुलांना एकएक मुलगा होता. आजीची प्रकृती वयानुसार जरा नाजूक झाली होती. घरात तिचे व्हिवळणे चालू रहायचे. त्याचा त्रास घरात सर्वांना व्हायचा. तिच्यावर सर्वच ओरडायचे. 'ही म्हातारी मरतही नाही' असे म्हणायचे. तिला एखाद्या वृद्धाश्रमात ठेवायचे तर तिची तब्येत ठीक नाही म्हणून कुठे प्रवेश मिळत नव्हता. शेवटी त्या दोन्ही मुलांनी मिळून तिला जंगलात सोडून द्यायचे ठरविले. आजीला आपण बाहेर फिरायला घेऊन जाऊ व तेथेच सोडून येऊ असा त्यांनी बेत केला.

आजीला जरा हवापालट होण्यासाठी घरच्या सर्वांनी मिळून सहल काढली. जंगलात गेले. दुपारची जेवणे झाली. आजीला तिथेच झोपवले व सर्व पसार झाले. आजीला जाग आली तेव्हा आजूबाजूला कोणी नव्हते. 'पाणी पाणी' असा ती आक्रोश करत होती.

आशाच्या कानावर हा आक्रोश पडला. ती लगेच तांब्याभर पाणी घेऊन गेली. त्या आजीला अंधारात नीटसे दिसत नव्हते. पण आशा पाणी द्यायला आली ते तिला कळले. आजीला आशाने विचारले की ती इकडे कशी आली? तिच्या घरी कोणी नाही का? आजीला नातवंडे आहेत का? आजी क्षीण आवाजात सांगत होती की तिला दोन मुलगे व दोन नातू आहेत. आशाला वाटले की आजीला कोणी नात नाही का? मग मीच तिची नात बनते. आशाने तिला पाणी पाजले. आपली नात समज असे सांगून तिला घरी आणले. आशाच्या आईकडे ती आली. आजीच्या शेवटच्या दिवसांत आशाने तिची देखभाल केली.

आशा ही कधी मरत नसते हेच खरे, नव्हे का?

# समजुतदारपणाची गरज

मुलगा म्हणजे वंशाचा दिवा! आपल्याला मुलगा असावा अशी सर्वसामान्यांची अपेक्षा असते. एकतर आपले नाव तो पुढे चालवतो आणि मुख्य म्हणजे आपल्या म्हातारपणी तो आधार देतो. जावयाच्या घरी रहायला कोणाला फारसे आवडत नाही. मुलगा आपल्या हक्काचा असतो अशी भावना असते. तरीपण आपण समाजात जरा उघड्या डोळ्यांनी नजर टाकली तर अगदी स्पष्टपणे असे दिसून येते की बहुतांशी कुटुंबात म्हाताऱ्या आईवडिलांना आधार देत असतात त्या त्यांच्या मुलीच! मुले आपल्या संसारात मग्न असतात. सूनेला सासूसासऱ्यांची अडचण नको असते. शिवाय सासूचे सूनेशी (की सूनेचे सासूशी?) जमत नाही. तरीही मुलगा असायला हवा हा अट्टाहास काही कमी होत नाही. आईवडिलांना मुलाकडून खर्चपाण्यासाठी पैसे मिळवण्यासाठी प्रसंगी कोर्टाची पायरी चढणे भाग पडते.

आशाबाई, वय ६० वर्षे, रहाणार मुंबईत, आपल्या मुलाविरुद्ध त्यांनी दावा दाखल केला होता. आशाबाई आपल्या लेकीकडे रहात होत्या. पाच वर्षांपूर्वी त्यांचे यजमान वारले. त्यांना दोन मुले व एक मुलगी. दोन्ही मुलांची लग्न झालेली. त्यांच्या बायका नोकरी करत होत्या. मुलगी आपल्या संसारात आनंदी होती. ती आपल्या आईची देखभाल करत होती. दोन्ही मुलांनी खर्च द्यावा अशी आशाबाईंची अपेक्षा होती. दोघांनाही चांगल्या नोकऱ्या होत्या शिवाय घरात दोघेही कमावणार. त्यांना काही कमी नाही, मग बाईंनाच ते पैसे द्यायचे का टाळतात? दोघांना कोर्टात बोलवण्यात आले होते.

मी दोन्ही मुलांशी बोलले. दोघांची इच्छा होती की आईने त्यांच्याजवळ रहावे. जावयाकडे कशाला रहायचे? दोघा भावांचे आपापसात चांगले जमत होते. पण आशाबाईंचा स्वभाव तसा भांडखोर होता. त्यांचे दोन्ही सुनांशी जमत नाही. दोघी नोकरी करणाऱ्या. त्यांच्याशी आशाबाईंचे गणित जुळत नव्हते. त्यांना त्यांच्या पद्धतीप्रमाणे घरात सर्व कामे व्हायला हवी असतात. ते मात्र दोन्ही सुनांना जमत नसे. दोघा मुलांना आईची काळजी होती, तिच्याबद्दल प्रेम होते. सुनांचीही आशाबाईंबद्दल तक्रार नव्हती पण आशाबाई जुळवून घ्यायला तयार नव्हत्या. त्यांचे वर्चस्व घरात रहात नाही ह्याची त्यांना हळहळ वाटत होती. मुलीकडे मात्र त्या जावयाच्या अपेक्षेप्रमाणे रहात होत्या. मुलगी आईला काही बोलली तरी त्याचे त्यांना फारसे वाईट वाटत नव्हते. आशाबाईच म्हणत होत्या की जावयाकडे जुळवून घ्यावे लागते, मुलगी असली तरी तिला त्रास द्यायला नको, असे त्यांचे मत होते.

दोघेजण आईला आपल्याकडे रहायला बोलवत होते. नातवंडात तिने आरामात रहावे असे त्यांना वाटत होते. आशाबाई मात्र आपली भूमिका बदलण्यास सहजासहजी तयार नव्हत्या. वृद्धापकाळ हा काही अनपेक्षितपणे येत नाही. त्यातून पतीच्या निधनानंतर त्य एकट्या पडल्या होत्या. आतापर्यंत यजमानांचा आधार होता. आता त्यांना जरा असुरक्षित वाटत होते. त्यासाठीच खरंतर स्वत:कडे पैसे असावेत असे त्यांना वाटत होते. यजमानांचे पेन्शन मिळत होते पण मुलांकडून काहीच मिळू नय? हा त्यांचा प्रश्न होता. आशाबाईंना बदललेली भूमिका मान्य करणे कठीण जात होते.

आणखी एक गोष्ट मला प्रकषाने जाणवली ती म्हणजे सर्व जणांना एकमेकांबद्दल प्रेम होतेच पण तक्रारी पण होत्या. तक्रारी व प्रेम दोन्हीही कोणी दुसऱ्यासमोर प्रगट करत नव्हते. आशाबाईंना मुलाबद्दल काय वाटते हे मुलांना समोरासमोर बसवून त्यांनी कधीच सांगितले नव्हते. मुलांनी आईशी मोकळेपणाने चर्चा केली नव्हती. कुटुंबात जर सर्व व्यक्तींमध्ये संभाषणे चालू असतील, (Open Communication) सर्वजण आपली मते मांडू शकत असतील तर अशा घरात खेळीमेळीचे वातावरण रहाते. गैरसमज होण्याचे प्रमाण (Chances)कमी असते.

सर्वांशी मी एकएकट्यांशी बोलले. मग एकत्रित चर्चा केली. आशाबाई मुला-सुनांना भेटल्या तेव्हा त्यांनी पहिला प्रश्न विचारला तो नातवंडांबद्दलचा. मुलांना त्यांच्या तब्येतीबद्दल विचारले. माझ्याशी बोलतांना त्यांनी मुलांविरुद्धच्या तक्रारींनी बोलणे सुरु केले होते. प्रत्यक्षात मुले समोर आल्यावर प्रथम प्रगट झाले ते प्रेम-आपुलकीच.

चार शेजारच्या लोकांनी सांगितले म्हणून आशाबाईंच्या मनात पोटगीचा दावा दाखल करावा असे आले. 'मुलांना मी धडा शिकवेन' असा त्यांचा प्रथम सूर होता. खरंतर त्यांची समस्या तशी काही गंभीर नव्हती. किंबहुना समस्या नसतांना निर्माण करवली गेली होती असे म्हटले तरी वावगे होणार नाही.

सर्वांनी एकत्रितपणे विचार केला ह्यापुढे आशाबाई दिवाळीच्या सुट्टीत लेकीकडे रहाणार व बाकी मुलांकडे रहाणार असे ठरले. सर्वांनीच समजून राहिले तर भांडणे होत नाही. आशाबाईंना दोन्ही मुले दरमहा १०० रुपये देणार होती. आशाबाईंचे समाधान झाले होते. सर्व एकत्र रहाण्यास त्यांनी लगेच सुरुवात केली.

ह्या गोष्टीला आज एक वर्ष उलटले. केस कोर्टातून निकाली तेव्हाच लागली होती. पण आठदहा महिन्यांनी आशाबाई सहज भेटायला येतात. घरच्या गमतीजमती सांगतात. त्यांनी आता खरोखरच समजूतीची भूमिका घेतली होती. आता कोणाबद्दलही त्यांची काही तक्रार नव्हती.

# चूक कोणाची?

बंडखोर स्त्री- पत्नी वय ३८ वर्षे, शाळेत शिक्षिका.

पती- वय ४५ वर्षे, गोदरेज कंपनीत मॅनेजर.

दोघांचेही दुसरे लग्न. तो विदुर ती विधवा. तिचा नवरा देवस्थानात स्नानाला गेला तो परत आलाच नाही. काय कसे झाले ते कळलेच नाही. पदरात अडीच वर्षाचा एक मुलगा. सासू-सासरे नाहीत. नवरा एकुलता एक होता. मुलाला घेऊन सासूसोबत ती रहात होती. तिच्या माहेरी दोन बहिणी, दोन भाऊ सर्वांचे सुखाचे संसार सुरळीत चाललेले. त्यांना ह्या बहीणीची अशी अवस्था पाहवेना. एका भावाचे लग्न बाकी होते. त्याच्या लग्नासाठी ती प्रयत्नात होती. विवाहमंडळांमधे नाव नोंदवले होते. तिच्या माहेरचे तिच्या दुसऱ्या लग्नाचा प्रयत्न करत होते. त्याची पहिली पत्नी कॅन्सरने वारली. एक मुलगी होती. एक भाऊ व आई होती. आई त्याच्या भावाकडेच रहायची. त्याचे व आईचे फारसे पटत नव्हते. मुलगी आजीसोबत काकाकडे रहायला लागली. तो घरी एकटाच राही. त्याच्या मित्रांनी परत लग्न करण्याचा सल्ला दिला. विवाहमंडळात नाव नोंदवले.

भावाचे स्थळ बघताबघता त्या मंडळातून ह्या व्यक्तीचे नाव व माहिती तिच्या भावाला मिळाली. माहेरच्यांनी त्याचा तपास काढला. वरकरणी सर्व ठीक वाटले. तिच्या मनात लग्नाचा फारसा विचार नव्हता पण माहेरच्यांचे तिने ऐकले. सासूपण तिच्या लग्नाला तयार नव्हती पण वय लहान असल्याने ती परत संसारात पडली तर बरे असे ठरले.

दोघांचे साध्या समारंभाने लग्न झाले. दोघांनीही एका मानसशास्त्रज्ञाचा विचार घेतला. लग्नानंतर मुलांना सोबत ठेवायचे की कसे हे ठरवायचे होते. डॉक्टरांच्या सल्ल्याप्रमाणे दोघांनी आपली मुले मुलांच्या आजीकडे ठेवून एकत्र रहायचे ठरवले. ती जेमतेम महिनाभर मुलाशिवाय राहिली. नंतर मात्र तिने मुलाला आणले. त्यालापण मुलीला आणावयास ती सांगत होती पण त्याने मुलीला आणले नाही. तिच्या आग्रहाने फक्त रविवारी आणत असे. तिचे व मुलीचे चांगले जमत होते. शिवाय भावाबहिणीचे पण सूर जुळत होते.

ती शिक्षिका पेशातली. मुलाला ती शिकवत असे. तो रागीट स्वभावाचा. थोड्याशा कारणानेपण मुलाला बेदम मारहाण करायचा. शिवीगाळ व्हायची. तिला अशा अशांत वातावरणात रहावेना. त्यातून तो तिच्या चारित्र्यावर शंका घेऊ लागला. कारण नसतांना कोणाकोणाबरोबर तिचे संबंध जोडले जायचे. मुळात तिचा स्वभाव अन्याय सहन न करणारा. पण हे दुसरे लग्न तेव्हा सोसत रहायचे तिने मन मारुन ठरवले. सहा-सात महिने झाले. मुल होऊ द्यायचे नाही हा तिचा निर्णय. त्यानेपण त्याबद्दल काही विरोध दाखवला नाही. अजून ४-५ महिने लोटले. मुलावर या सर्वाचा परिणाम होत होता. तिलापण सहन करणे कठीण जात होते. तिने घर सोडण्याचा निर्णय घेतला.

मुलाला घेऊन ती घरातून बाहेर पडली. परत आपल्या पहिल्या सासूकडे आली. आजीला नातवाचा लळा होताच. ती तिथेच रहायला लागली. त्याने तिची बरीच बदनामी केली. शाळेत जाऊन तिच्या चारित्र्याबद्दल बोभाटा केला. पण तिने पर्वा करायची नाही असे ठरवले. मध्यस्थ म्हणून एक-दोघांनी त्यांना एकत्र आणण्याचे प्रयत्न केले. पण ती आपल्या निर्णयावर पक्की होती. त्याची एकत्र रहायची तयारी होती पण तो बदलणार नव्हता. त्याचा रागीट स्वभाव, त्यात होणारी आदळ-आपट, मारहाण- तो म्हणे की मला आटोक्यात आणता येत नाही. त्यासाठी उपचार करुन घेण्याची त्याला गरज वाटत नव्हती. कारण त्याच्यामते तिच्याचमुळे, तिच्या व्यभिचारी वागणूकीमुळे तो असा वागतो!

शेवटी दोघे घटस्फोट घ्यायचा ह्या निर्णयाला आली. घटस्फोट झालाही पण ह्या लग्न मोडण्यामागे कारणीभूत कोण ह्याची टोचणी तिच्या मनाला लागली होती. बंडखोर स्वभाव बाजूला ठेवूनही अन्याय सहन करुनही त्याची शेवटी परिसीमा झाली म्हणून मी बाहेर पडले असे ती आपल्या मनाला समजावत होती.

# गैरसमज

विवाहानंतर दोन कुटुंबे जवळ येतात. नवरा-बायको हे नाते विश्वासावरच टिकून रहाते. दोघांनी एकमेकांना समजून घेणे गरजेचे असते. लग्नानंतर सुरुवातीचे काही दिवस दोघांनी एकमेकांशी बोलून एकमेकांना जाणून घ्यायला हवे. मुलीला घरच्यांशी जुळवून घ्यायचे असते. घरच्या चालीरिती समजून घेऊन त्या अंगवळणी पाडणे हे तसे काही फारसे सोपे नसते. पण लहानपणापासूनच होणाऱ्या संस्कारांच्या आधारावर हे घडत असते.

नवरा बायकोच्या नात्यातला आणखी एक महत्त्वाचा भाग म्हणजे लैंगिक संबंध. लग्न केले म्हणजे दोघांना शारिरीक संबंध ठेवण्यास समाजाकडून मिळालेली परवानगीच. मुलगा मुलगी लग्नानंतर जवळ येतात तेव्हा त्यांच्या मनात बऱ्याच काही कल्पना असतात. रोज पहाण्यात येणाऱ्या चित्रांवरुन, सिनेमांवरुन किंवा वाचनावरुन ह्या कल्पना बनलेल्या असतात. आपल्याकडे अगदी क्वचितच कोणी विवाहापूर्वी ह्याबद्दल वाच्यता करते. ह्यामुळेच याबद्दलचे गैरसमजही बरेच आढळून येतात.

चंपा व चिमण हे नवविवाहित जोडपे. अजून चार महिनेही लग्नाला झालेले नाहीत. चंपा लग्नानंतर अवघ्या पंधरा दिवसांतच माहेरी परतली. चंपाच्या वडिलांनी पोटगीचा दावा दाखल केला.

चिमण चंपाचा आत्तेभाऊ. माहितीतली माणसे. तेव्हा चंपाचे वय जरी १८ वर्षे असले तरी तिच्या वडिलांनी लग्न लावून दिले. चिमण २० वर्षांचा. स्वत:चे शिवणकामाचे दुकान. चंपाच्या वडिलांचापण शिवणकामाचाच व्यवसाय. एका झोपडीवजा खोलीत चंपाचे कुटुंबिय रहात होते. चिमणची एक पक्की खोली होती. त्याच्या घरी त्याचा एक विवाहित भाऊ, आईवडील होते. बहीण सासरी होती. चंपाच्या माहेरापेक्षा चिमणची परिस्थिती जरा बरी होती. चंपाच्या मागे दोन बहिणी होत्या. तिघींच्या लग्नाची जबाबदारी वडिलांवर होती. तेव्हा चंपाला मागणी आल्यावर त्यांनी लगेच होकार दिला.

लग्नानंतर दोघे एकत्र आले तेव्हा चंपाला त्रास होत होता. तिला काय करावे कळेना. शारिरीक संबंधाच्या वेळी चंपाला खूपच वेदना होत. ती विव्हळायची. चिमणला वाटे की तिला हे आवडत नाही. ती मुद्दाम टाळते आहे. दोन-तीन दिवसांनंतर चिमणने घरच्यांना हे सांगितले. चिमणच्या आईला वाटले की चंपाचे कुठेतरी दुसरीकडे मन लागले असणार. आपली भावाने अशी फसवणूक केली याचा तिला राग आला. तिने चंपाला माहेरी पाठवून दिले.

चंपाच्या वडिलांनापण राग आला. दोघांकडच्या मंडळींमधे बाचाबाची झाली. चंपा-चिमण यांचा त्यात समावेश नव्हता. दोघे आपापल्या घरी होते. चंपाला काय होतंय हे कळत नव्हते पण ती सारखी म्हणत होती की चिमणकडे जायचे नाही. दुसरीकडे कुठे तिचे मन गुंतले नव्हते, पण चिमणकडे जायचे नव्हते.

चिमणला खोदून विचारले तेव्हा त्याने दोघांमधे ही समस्या असल्याचे सांगितले. चंपानेपण ते मान्य केले. यावर वैद्यकिय उपचार करता येतो का हे पाहण्यासाठी दोघांना पाठवण्याची सुचना केली. दोघांची तयारी होती. दोघे डॉक्टरांकडे जाऊन आले. चंपाला योनीमार्गात थोडासा दोष होता. अगदी साध्या सोप्या उपचाराने तो बरा होण्यासारखा होता. दोघांनी एकत्र रहावे असे सुचवण्यात आले.

दोघांची गाठभेट कोर्टात घालून देत होतो. दोघे एकमेकांशी बोलून एकमेकांना समजावून घेत होते. दोघे बाहेर फिरायला जायचे. मग चिमण चंपाला घरी घेऊन गेला. दोघे एकत्र रहात होते. संसार मार्गी लागला होता. आता तर चंपाला एक मुलगा झाला. त्याच्या बारशाचे पेढे घेऊन ती मला भेटायला आली होती.

# जबाबदार कोण?

चंदा ही एका गरीब घरातली मुलगी. ती, तिची आई व आजी एका झोपडीत रहात होते. त्या सर्व मिळेल ते काम करत आणि त्यावरच त्यांचा उदरनिर्वाह चाले. चंदा वयात आली तशी तिचे आता लग्न करुन द्यावे असा विचार तिच्या आईच्या मनात आला.

चंदाच्या आईला तिच्या नवऱ्याने माहेरी सोडून दिले होते. चंदा ही तिची एकच मुलगी होती. मुलगा झाला नाही म्हणून सासरच्या मंडळींचा राग होता आणि शिवाय तिच्या आईकडून त्यांना फारसा काही हुंडाही मिळाला नव्हता. चंदाच्या वडिलांनी दुसरे लग्न केले आणी चंदाच्या आईचा छळ सुरु झाला. एके दिवशी त्याने तिला माहेरुन दहा हजार आण नाहीतर माहेरीच रहा असे सांगून माहेरी सोडून दिले. चंदाची आजी विधवा होती. ती रोजंदारीवर घर चालवत होती. ती कुठून आणणार एवढे पैसे? तेव्हा त्या दिवसापासून चंदाची आई माहेरीच होती. चंदाचे चौथी-पाचवी पर्यंतचे शिक्षण पार पडले. ती घरकामे करत होती. तसा तिचा बोजा आईवर पडत नव्हता पण वेळीच लग्न लावून दिले की आपल्यावरची जबाबदारी संपली असा विचार करुन तिच्या आईने लग्नासाठी प्रयत्न सुरु केले.

चंदा दिसायला ठीक होती. नाकी-डोळी नीटस होती. वर्ण सावळा पण टापटीप रहाणी शिवाय कामसू होती.

रमाकांत त्याच्या आईवडिलांचा एकुलता एक मुलगा. त्याच्या वडिलांनी दुसरे लग्न केले होते. दोन्ही बायकांना ते नीट सांभाळत होते. रमाकांतच्या आईची त्याच्या वडिलांच्या दुसऱ्या लग्नाबद्दल काही तक्रार नव्हती. त्याच्या आईला कोणतासा आजार होता त्यामुळे आता तिला मुलबाळ होण्याची शक्यता नव्हती. ह्यासाठीच त्याच्या वडिलांनी दुसरे लग्न केले होते. तेव्हा तक्रार करायची गरज तिला भासत नव्हती. आपल्याला मुलबाळ होणार नाही तरीही तो आपला सांभाळ करतो आहे म्हणजे रमाकांतच्या वडिलांचा मोठेपणाच होता असा तिचा समज होता.

रमाकांत एका प्रायव्हेट कंपनीत कामाला होता. दिवसाला २०-२५ रुपये मिळवत होता. लिहिता-वाचता येण्याएवढे त्याचे शिक्षण झालेले. दिसायला वर्ण काळा पण तरीही चारचौघांसारखा होता. नाहीतरी मुलाचे रुप कधी पहायचे असते का? तेव्हा रमाकांत चंदासाठी ठीक आहे असे चंदाच्या आईला वाटले. रमाकांत स्वत:हून चंदाच्या आईकडे आला होता. तेव्हा दारी आलेले स्थळ का सोडा? असा विचार करुन चंदाच्या आईने लग्नासाठी होकार दिला. चंदाची रहाती झोपडी ही तिच्या आजीची होती. तिच्या आजीची चंदाची आई ही एकुलती एक मुलगी आणि चंदाच्या आईला चंदा ही एकच मुलगी. रमाकांतने लग्नात फारशी काही मागणी केली नाही. साध्या पद्धतीने लग्न लावून द्या अशी मागणी होती. तरीही हौशीने चंदाच्या आईने कर्ज काढून ५-१० हजार रुपये खर्च केलाच. चंदाला सासरी रवाना केले.

रमाकांत बरेचवेळा चंदाच्या माहेरी येत असे. दोघींची विचारपूस करत असे. सुरुवातीचे वर्ष चांगले गेले. सणासुदी तिच्या आईने तिला शक्य होईल तेवढे केले. चंदाला दिवस राहिले. तिचे बाळंतपण माहेरीच झाले. चंदाला भेटायला रमाकांत सुरुवातीला यायचा पण नंतर मात्र त्याचे येणे कमी झाले.

चंदाला मुलगी झाली. ती काही महिन्यांची झाल्यावर रमाकांत बघायला आला. चंदा त्याच्या बरोबर सासरी जायचे म्हणत होती. पण रमाकांत उडवाउडवीची उत्तरे देत होता. शेवटी चंदा स्वत:हूनच सासरी गेली. सासरच्या मंडळींच्या वागणूकीत बदल झालेला दिसत होता. कारण मात्र कळेना. घरचे सर्व तू येताना माहेरुन कायकाय आणलेस व एवढेच का आणले असे विचारत होते. रमाकांत अधुनमधून दारु प्यायचा. मारहाण करायचा. कधीकधी मात्र नीट वागायचा. आठवड्यातून २-३ दिवस तो घरी येत नसे. कामावर जास्त वेळ असतो असे घरचे सांगत होते. चंदा गप्प होती. सर्व सहन करत होती. तिची मुलगी वर्षाची झाली. रमाकांतमध्ये काही सुधारणा तर नव्हतीच पण दिवसेंदिवस त्याची मारहाण - दारु पिणे वाढतच होते. चंदाला आता हे सर्व असह्य होत होते पण तरीही ती दिवस लोटत होती. माहेरी आईवर आपला भार नको असे तिला वाटत होते. शिवाय पदरी एक मुलगी पण होती.

शेजाऱ्यांकडून रमाकांतने एक बाई ठेवली आहे व तो तिकडेच काही दिवस रहातो असे चंदाला ऐकायला मिळाले होते. पण विचारणार कोणाला?

एके दिवशी तर रमाकांतने कहर केला. आपल्या रखेलला घेऊन तो घरी आला. चंदाचे सासू-सासरे तिच्याशी नीट बोलले. चंदाला काय करावे कळेना. तिचा पारा चढला. तिने त्या बाईला घराबाहेर जाण्यास सांगितले. पण रमाकांत उलट चंदालाच गप्प करत होता. त्याने चंदाला मारण्यास सुरुवात केली, पण चंदा ऐकेना. तेव्हा त्या बाईनेपण चंदाला मारहाण केली. चंदा आता बेभान होऊन ओरडत होती. शेजारीपाजारी गोळा झाले. त्यांनी भांडण मिटवले. चंदाला दवाखान्यात नेले. उपचार केले गेले. पोलिस केस नोंदविली गेली. रमाकांतला पोलिसांनी दमदाटी केली पण रमाकांतवर त्याचा काही परिणाम नव्हता. रमाकांतची ठेवलेली बाई राजरोसपणे घरी येत होती. चंदावर तिची दादागिरी चालत असे.

रमाकांतने देवळात जाऊन तिच्याशी लग्न लावले. दोघे एकत्र रहात होते. चंदाचा छळ चालूच होता. खूप त्रास झाला की ती पोलिसात तक्रार करायला जायची. पोलिसांच्या मते हे नवराबायकोचे भांडण आहे तेव्हा ह्यासाठी पोलिस कारवाईपैक्षा कोर्टातच चंदाने जावे.

चंदाच्या आईला चंदाच्या छळाबद्दल कळले. ती चंदाला भेटायला आली. आपल्यासोबत चलण्यासाठी तिने चंदाला सांगितले. पण चंदाला वाटत होते की दिवस बदलतील. रमाकांत एक ना एक दिवस सुधारेल. तो त्या बाईचा नाद सोडून परत येईल. तिने माहेरी जाण्यास नकार दिला.

रमाकांतचा डोळा तिच्या आईच्या झोपडीवर होता. घरात सर्व बायकांच आहेत तेव्हा त्यांच्यावर आपण सहज दादागिरी करु शकू असे त्याला वाटत होते. ती झोपडी आपल्या नावावर करुन देण्यासाठी तो चंदाच्या मागे लागला होता. चंदा त्याला तयार नव्हती. एके दिवशी तर रमाकांतने कहर केला. आपले ऐकत नाही म्हणून रागाने त्याने चंदावर रॉकेल ओतले. रमाकांतची दुसरी बायको सोबतच होती. घरात बाकी कोणी नव्हते. रॉकेल ओतून पेटवून देऊन दोघे बाहेर पडले. चंदाची मुलगी बाहेर खेळत होती. घराचे दार उघडेच होते. चंदाचे विव्हळणे बाहेर ऐकू येत होते. शेजारीपाजारी मदतीला धावून गेले. त्यांनीच तिला दवाखान्यात भरती केले. छळवणूक, मारहाण अशी पोलिस तक्रार नोंदवली गेली. चंदाची मुलगी खूपच बावरली होती. काय होतंय हे तिला नीटसे कळतही नव्हते. चंदाच्या आईला ही बातमी कळली. ती धावतच आली. चंदाची मुलगी आजीला बिलगली. ती आजीसोबत जाण्याचा हट्ट धरुन बसली. आजी नातीसह घरी आली. चंदा दवाखान्यातच होती.

साठ टक्के भाजल्याने चंदाची परिस्थिती गंभीर होती. ती वाचू शकेल ह्याची खात्री डॉक्टर देत नव्हते. चार दिवसांनी चंदा वारली. दवाखान्यातच तिचा शेवट झाला.

अंत्यसंस्कारांसाठी प्रेत घेऊन जाण्यासाठी आईने दवाखान्यात प्रेत ताब्यात देण्यास सांगितले पण पोलिस केस असल्याने दोन दिवस प्रेत मिळू शकले नाही. मरणानंतरही चंदाच्या नशिबी हालच असावेत.

आता चंदाची आई-आजी व मुलगी एकत्र रहात होते. पोलिस केस चालूच होती. रमाकांतची जामिनावर सुटका झाली. तो व त्याची दुसरी बायको एकत्र रहातात. त्यांचे रोजचे व्यवहार सुरळीतपणे चालले आहेत. चंदाच्या आजीला मात्र फक्त वेड लागायचेच बाकी आहे. तिला आजूबाजूचे भान रहात नाही. हे सर्व बघायला देवाने आपल्याला जीवंतच का ठेवले? असा तिचा सर्वांना सवाल आहे. चंदाची आई या अशा आजीला व नातीला सांभाळते आहे. चंदाचे वडिल एकदा भेटून गेले पण तेवढेच. पुढे त्यांच्याकडून काहीही मदत नाही. कामावर गेल्याशिवाय पोटाला मिळनार नाही तेव्हा ती कामावर रोज जाते. ती कामावर असताना रमाकांत किंवा त्याच्याकडचे कोणी येऊन नातीला उचलून तर नेणार नाही ना किंवा झोपडीची नासधूस तर करणार नाही ना ह्याची तिला सतत धास्ती असते.

चंदाच्या आईने नातीचा कायदेशीर ताबा मिळावा म्हणून कोर्टात दावा केला. मोफत कायदा सल्लाकेंद्रातर्फे तिला मदत मिळाली. ताबा मिळाल्यावर एखाद्या चांगल्या बोर्डींग स्कूलमधे तिला दाखल करावे असा तिचा विचार होता.

पोलिस केस चालली. पुराव्याअभावी रमाकांत व इतरांवरचे आरोप सिद्ध झाले नाहीत म्हणून सर्वांची सुटका झाली. कोर्टातून मुलीचा ताबा आजीला मिळाला. चंदाच्या आईने तिला एका शाळेत दाखल केले. रमाकांत दुसऱ्या बायकोसोबत रहात आहे.

चंदाची आई विचार करत की ह्या सर्वाला कारणीभूत कोण? ह्या सर्वांवर उपाय काय?

# हुंडा

एक आजी आजोबा आपल्या नातीचा कायदेशिरपणे ताबा मिळवण्यासाठी अर्ज करुन आले होते. नात आहे ३-४ वर्षांची. सध्या ती त्यांच्याचकडे आहे पण तिचे वडिल तिला केव्हाही येऊन घेऊन जातील अशी त्यांच्या मनात भीती व ह्यासाठी उपाय म्हणून त्यांनी हा दावा दाखल केला होता.

आज आजीचे वय पंच्चावन्न वर्षावरचे तर आजोबा पासस्टीतले. दोघेही घरातच असतात. त्यांना एक मुलगा व एक मुलगी. दोघांची लग्न झालेली. सून चांगली आहे. मुलगा, सून परदेशात असतात. वर्षातून एक-दोनदा त्यांना भेटायला येऊन जातात. आजोबा कुठल्याशा सरकारी ऑफिसातून निवृत्त झालेले. आर्थिक स्थिती उच्चमध्यमवर्गातली. मुंबईतल्या एका उपनगरात त्यांचा स्वत:चा ब्लॉक आहे. दोघे आनंदात रहात होते. मुलीचे लग्न लावून दिले. तिचे सासर नाशिकला होते. नवरा एका प्रायवेट कंपनीत चांगल्या हुद्यावर होता. नवऱ्याला एक अविवाहित बहिण व एक लग्न झालेला मोठा भाऊ, सासू, सासरे एवढे त्यांचे कुटुंब होते. मुलीला लग्नानंतर वर्षभरातच दिवस राहिले. मुलगी झाली.

सासरी सर्व सुरळीत आहे असा या मातापित्यांचा समज होता. त्यांच्याशी ते सर्व नीट बोलत. सणासुदी काहीना काही देणे तर होतच होते. अधूनमधून माहेरपणाला मुलगी यायची पण सासरबद्दल तिने कधी तक्रार केली नाही. आता मुलगी तीन वर्षांची झाली होती. अशीच एके दिवशी ती अचानकपणे माहेरी आली. आईवडिलांनी कारण विचारल्यावर सहजच आले म्हणून सांगितले. ८-१० दिवस झाल्यावर मात्र आईला शंका वाटली. तिने खूप विचारणा केली तरी मुलगी काहीच बोलली नाही.

आणि तो दिवस उजाडला! त्यादिवशी आई तिच्या मैत्रिणीकडे गेली होती. वडिल आपल्या नातीला घेऊन जेवल्यानंतर वामकुक्षी करत होते. ह्या मुलीने बाथरुममध्ये स्वत:च्या अंगावर रॉकेल ओतून पेटवून घेतले. थोड्याच वेळात आजोबांना चाहूल लागली. त्यांनी बघितले तर बाथरुम आतून बंद होते. दार फोडावे लागले. तोपर्यंत मुलगी खूप प्रमाणात भाजली होती. छोटीतर सर्व बघून गांगरुनच गेली होती. शेजाऱ्यांच्या मदतीने मुलीला दवाखान्यात नेले पण सर्व प्रयत्न व्यर्थ ठरले. रात्रीपर्यंत मुलगी देवाघरी गेली.

सर्वच अचानक घडले होते. घरात सर्व गांगरुन गेले होते. टेबलावर एक चिठ्ठी मिळाली. त्यात मुलीने लिहीले होते, "मी आता आयुष्याला कंटाळली आहे. आणखी छळवणूक सहन होणार नाही. मी ठरवूनच माहेरी आले. मी इथेच जीव देत आहे कारण त्यामुळे माझी छोटी तुमच्याकडेच राहिल. तिचा तुम्ही नीट सांभाळ करा एवढीच माझी इच्छा आहे."

लग्नानंतर सात वर्षांच्या आत संशयी मृत्यू ह्या आधारावर पोलिस केस नोंदवली गेली. सासरच्यांना कळवले गेले. सकाळी सर्व मंडळी आली. त्यांना दु:ख वाटले होते पण सर्व विधी झाल्यावर ते निघून गेले. मुलीला नेण्याबद्दल काहीच बोलले नाहीत. परत त्यांनी फोनही केला नाही. ४-६ महिन्यांनी आता मुलीला परत घेऊन जायचे आहे असा निरोप आला.

नात इकडे रुळली होती. आजी आजोबा तिच्यावर जीवापाड प्रेम करत होते. तिच्या आईच्या निधनानंतर तिला मानसिक आधार बराच लागला होता. आपले दु:ख बाजूला ठेवून नातीसाठी दोघे हसतखेळत रहात होते. आणि आता हिला परत पाठवावे लागणार असे कळल्यावर मात्र दोघांची झोप उडाली होती. आत्या, आजी तिचे लाड करतील ही आशा होती पण खात्री नव्हती. त्यांना तेवढा वेळ मिळेलच का? ह्यापेक्षा आपल्याकडेच तिला ठेवावे असे त्यांना वाटत होते. वकिली सल्ल्याने त्यांनी मग दावा दाखल केला.

जवळच्या शाळेत तिला प्रवेश मिळवून घेतला. तिच्यासाठी सर्व काही करण्याची त्यांची तयारी होती. कोर्टाच्या तारखांना दोघेही येत होते. वडिलांना मुलीला भेटण्यास मिळावे असा वडिलांनी अर्ज केला. कोर्टात भेटण्यास परवानगी देण्यात आली. विवाह समुपदेशकांच्या मार्गदर्शनाखाली दोघांची भेट होत होती. ती वडिलांना भेटण्यासाठी उत्सुक असायची. दोघेही गप्पा मारायचे, खेळायचे. अधूनमधून घरी फोनवर गप्पा होत होत्या. असेच दिवस जात होते.

आजी आजोबांनी विचार केला की मुलगी थोडी मोठी झाली व समजूतदार झाली की मग तिला वडिलांकडे पाठवले तरी चालेल. पण तोपर्यंत तरी तिला इकडेच ठेवावे. दोघांशी समुपदेशक बोलले. दोघांच्या एकत्र बैठकी घेतल्या. विचार करायला दोघांनाही पुरेसा अवधी देण्यात आला. इकडे तिच्या वडिलांच्या दुसऱ्या लग्नाची तयारी चालू होती.

आपल्या समाजात पुरुषांची दुसरी लग्ने होणे तसे फारसे अवघड जात नाही. तो 'पुरुष' आहे म्हणून त्याला सर्व गुन्हे माफ असतात. बायकांना मात्र ती 'स्त्री' आहे याची पदोपदी जाणीव करुन देण्यात येते. मग ती अशिक्षित असो की पदवीधर. ती 'स्त्री' आहे याच मुद्यावर तिच्यावर सर्व बंधने लादली जातात.

चर्चा करुन दोघांनीही समजुतीने हा दावा मिटवायचा असे ठरवले.

छोटी अजून चार वर्षे आजीआजोबांकडे रहाणार नंतर वडिलांकडे जाणार असे ठरले. दर महिन्यात एक दोनदा परस्परांच्या सोयीने वडिल मुलीस भेटावयास येतील व उन्हाळी, दिवाळीच्या सुट्टीपैकी एक सुट्टी ती वडिलांबरोबर घालवणार असे संमतीपत्र तयार केले. पोलिस केस चालू होती. ती पुढे चालवायची नाही असे ठरले.

मुलीच्या ताब्याचा प्रश्न सुटला. आजी आजोबांना आनंद वाटला. आपली मुलगी गमावल्याची भरपाई कोणीच कोणत्याही प्रकारे करु शकणार नव्हते तेव्हा निदान नातीकडे तरी नीट लक्ष देता येईल असे त्यांना वाटत होते. पोलिस केस चालू ठेवूनही न्याय मिळेलच अशी खात्री कोण देणार? तेव्हा समजूतदारपणा दाखवून त्यांनी दावा मागे घेतला.

आता चार महिने झाले. मुलगी वडिलांना भेटते. फोनवर बोलते. सर्व सुरळीत चालू आहे.

मला प्रश्न पडतो की अशा दाव्यात समजुतीने ताब्याचा प्रश्न सुटला पण जीवानिशी गेलेल्या तिच्या आईचे काय? तिच्या आईवडिलांनी म्हातारपणी हे दु:ख सहन करणे सोपे आहे का? समाजात तिचा नवरा ताठ मानेने वावरतो आहे. त्याचे आता दुसरे लग्नपण होईल. त्यात त्याला कदाचित जास्त कमाईपण होईल! ह्याला उपाय काय? कायदा कागदोपत्री राहतो. न्याय हा न्यायालयात मिळेलच का? केवळ कायद्याने सामाजिक समस्या सुटणे शक्य आहे का? समाजानेच आपली विचारसरणी बदलायला हवी.

# जीवनसाथी

"गणपती गेले, आता दसरा मग दिवाळी आता दिवस कसे पटकन जातील हे कळणारही नाही." दोन बायकांचे हे बोलणे माझ्या कानावर पडले. मी वॉर्डमधे राऊंडसाठी जात होते. खरंच! सण आले की आपल्याकडे उत्साही वातावरण असते. इकडे हॉस्पिटलामधे पण कर्मचारी वर्गाची उपस्थिती कमीच असते आणि रुग्णांची संख्यापण त्याप्रमाणात कमीच असते. कोणाला आवडेल सणासुदीला हॉस्पिटलचे तोंड पहायला? अगदीच नाईलाज झाला तर मात्र काय करणार? ह्या विचारात मी वॉर्डमधे शिरले. नवीन दाखल केल्या गेलेल्या दोनच केसेस होत्या. त्यातल्या एका रुग्णाकडे गेले. केसपेपरवर नाव होते सौ.सुनिता गांगुर्डे.

स्त्री रुणांचा तो वॉर्ड होता. सुनिता कॉट नंबर ८ वर होती. डोळे मिटून पडली होती. तिचे डोळे बंद होते पण चेहऱ्यावरचे हावभाव बदलत होते. त्यावरुन ती कुठल्याशा विचारात मग्न असावी असे वाटत होते. मी तिला हळूच हाक मारली. लगेच तिने डोळे उघडले. उठून बसली.

स्तनाच्या कर्करोगाची ती रुग्ण. वय वर्षे २७ फक्त. तिला शस्त्रक्रिया करण्यासाठी भरती केले होते. गेले ३-४ महीने ती उपचारांसाठी नियमितपणे येत होती. वेगवेगळ्या चाचण्या केल्या गेल्या व कर्करोगाचे निदान करण्यात आले. शस्त्रक्रिया करावी लागेल असे डॉक्टरांचे मत पडले.

तिच्या पेपर्सवर एक मुंबईचा पत्ता होता व दुसरा गावचा. तिच्या खाटेजवळ कोणी नातेवाईक दिसत नव्हते. एकटीच होती. मी तिच्याशी बोलायला सुरुवात केली. ती फक्त मी विचारेन तेवढेच सांगत होती. तिला बोलते करायला मला जरा प्रयत्न करावे लागले. घरचं कोणी जवळ दिसत नाही, असे का? असे विचारल्यावर ती रडूच लागली. तिला जरा शांत होऊ दिले. मग मात्र ती मनमोकळेपणे बोलू लागली.

"घरात खुप माणसे आहेत पण माझे असे कोणीच नाही" तिने सांगितले. ती मूळची मुंबईची. तिचे आईवडिल मुंबईला असतात. लग्नानंतर ती पुण्याजवळच्या एका गावी गेली. तिचे सासर तिकडचे. घरात १०-१२ व्यक्ती आहेत. घर म्हणजे मोठा वाडाच आहे. मुंबईच्या घराच्या तुलनेने तिला ती जागा खूपच मोठी वाटायची. माहेरी तिला एक भाऊ व तीन बहिणी. सर्वांची लग्ने झाली. सर्व आपल्या संसारात मग्न असतात. आईवडिल खाऊनपिऊन सुखी आहेत. सुनिताचे लग्न ८-९ महिन्यांपूर्वी झाले. आता येणार ती पहिली दिवाळी! घरात गणपती येतात. पण ती ही अशी आजारी म्हणून माहेरीच होती. वडिलांनी तिला दवाखान्यात आणले, उपचार करुन घ्यायला लावले. तिचा नवरा रमाकांत एका कंपनीत नोकरीला आहे. तो ग्रॅज्युएट झाला आहे. घरात सासू-सासरे, दीर-जाऊ व मुलंबाळं आहेत. सुनिता घरातील लहान सून. घरात वर्चस्व होते ते सासूबाई व जाऊबाईंचे! सुनिता मुंबईची त्यामुळे गावाकडच्या रहाणीमानाशी तिला जुळवून घ्यायला जरा वेळ लागला व त्रासही वाटला. पण तरीही तिने जुळवून घेतले. नवरा चांगला आहे पण सासरची मंडळी दिवसभर टोचून बोलतात. खायला प्यायला आहे पण ते पण असे बोलून-टोमणे देऊन. घरच्या त्रासाबद्दल सुरुवातीला सुनिताने नवऱ्याला काहीच सांगितले नाही. सासू- मग ती अशीच असणार! असा तिने विचार केला.

काही महिन्यांनी तिला थकवा जाणवू लागला. काम करावेसे वाटेना. घरच्यांना वाटले की ही नाटक करते. मुंबईची मुलगी गावाकडची कामे करु शकत नाही म्हणून खोटे सांगते. पण तिच्या नवऱ्याला काळजी वाटली. तो तिला डॉक्टरांकडे घेऊन गेला. काही दिवस औषधे घेतली पण गुण येईना म्हणून पुण्याच्या मोठया दवाखान्यात तपासणीसाठी नेले. तिथे काही तपासणी केली तर त्यांनी तिला मुंबईला जाण्याचे सांगितले. मुंबईला माहेरी ती आली. तिच्या आईवडिलांकडे रमाकांतपण काही दिवस राहिला. पण नोकरी सांभाळणे जरुरीचे होते म्हणून तो दर रविवारी भेटायला यायचा. दवाखान्यात सुनिता वडिलांबरोबर यायची. रोजच्या ह्या व्यापाला खरंतर ती कंटाळली होती. रमाकांतसाठी ती दर रविवारची वाट बघत असे. दोघांना एकमेकांबद्दल काळजी/प्रेम वाटत होते. सर्व चाचण्या केल्या व निदान केले गेले 'कर्करोग (कॅन्सर)' सुनिताला एका स्तनाचा कॅन्सर झाला होता. तो एका जागीच असल्याले शस्त्रक्रियेने काढून टाकणे शक्य होते. ह्यासाठी एक स्तन कापावे लागणार होते. सुनिताला हे सर्व कळले आणि ती

कोलमडली. आईवडिलांसमोर काहीच बोलत नव्हती पण हे सर्व रमाकांतला केव्हा सांगू असे तिला झाले होते. बुधवारी डॉक्टरांनी तिला हे सांगितले. ती रविवारची वाट पहात होती आणि नेमक्या त्याच रविवारी रमाकांत मुंबईला येऊ शकला नाही. आता काय करावे म्हणून तिने तार पाठवली. 'लवकर या' असे कळवले. रमाकांतला कंपनीत कामासाठी रविवारीपण बोलावले होते. म्हणून त्याची आई आली. सुनिताच्या आईने तिच्या आजाराबद्दल वाच्यता केली. खरंतर सुनिता खूप घाबरली होती. आता आपले कसे होणार? ही तिला चिंता होती. सुनिताच्या सासूबाईंनी सहानुभूती तर सोडाच पण त्यांची फसवणूक केल्याचा आरोप केला. दुसऱ्या दिवशी सासूबाई परत गेल्या. आता रमाकांत भेटायला येईल का? अशी चिंता सुनिताला वाटत होती. मध्ये एक-दोन दिवस गेले.

रमाकांत एका संध्याकाळी आला. तो गप्प-गप्पच होता. काहीच बोलायला तयार नव्हता. जुजबी विचारपूस करुन तो निघून गेला. खरंतर सुनिताला त्याच्याशी खूप बोलायचे होते. पण काय करणार? नंतर मात्र तो भेटायला आला नाही.

आमच्याकडून त्याला पत्र टाकले. भेटायला बोलवून घेतले. तो पत्रात सांगितल्या दिवशी आला. सुनिता व रमाकांत यांची भेट करुन दिली गेली. मी रमाकांतशी प्रथम बोलले. मग दोघांना एकत्र बसवले.

रमाकांत हा त्याच्या आईवडिलांचा लाडकाच. त्याचे लग्न थाटामाटात केले गेले. त्याच्याच पसंतीने सुनिताची निवड केली होती. लग्नानंतर त्यांचे सुनिताशी चांगले जुळले नसले तरी सुनिता कधी उलट बोलत नसे. रमाकांतला सुनिता आवडली होती व त्याला तिची काळजीपण वाटत होती. त्याच्यामते तिला बरे करुन तो तिला न्यायला तयार होता. पण त्याच्या आईने ठामपणे ठरवले होते की आता सुनिता घरात काही करु शकणार नाही आणि मुख्य म्हणजे रमाकांतला ती सुखी करु शकणार नाही. त्यामुळे त्यांनी घटस्फोट घ्यावा व रमाकांतचे दुसरीकडे लग्न करुन द्यावे. तिनेतर रमाकांतसाठी मुली पहायलापण सुरुवात केली होती. रमाकांतला हे अमान्य होते पण तो तसे त्यांना सांगू शकत नव्हता. सुनिताच्या आजाराबद्दल रमाकांतने चौकशी केली. मी त्याला सविस्तर माहिती दिली. त्याची द्विधा मनस्थिती चेहऱ्यावर उघडपणे दिसत होती.

सुनिताला जेव्हा तिच्या आजाराचे निदान सांगण्यात आले तेव्हा ती घाबरली होती. 'आता माझे कसे होणार?' असे तिला वाटले होते. सर्वसाधरणपणे 'कॅन्सर' शब्द ऐकला की माणूस घाबरतो. आता आपण मरणार असे त्याला वाटते. पण हे तितकेसे खरे नाही. हा आजार जर प्राथमिक स्वरुपाचा असेल तर त्यावर उपाय करुन तो रुग्ण बरा होतो. सुनिताच्या मनातली भीती प्रथम मी काढून घेतली. नंतर तिच्या आजाराचे स्वरुप, त्यावरची उपचारपद्धती ह्याबद्दल तिला माहिती दिली. तिच्यावर शस्त्रक्रिया करुन एक स्तन काढावयाचे होते. आता कृत्रिम स्तन बसवता येते ह्याची पण तिला माहिती दिली. तिच्या मनाची तयारी करायला काही तास तिच्याशी बोलावे लागले. एवढे करुन ती आता जेव्हा शस्त्रक्रियेला तयार झाली होती तेव्हा तिच्या सासूबाईंचा हा स्वर ऐकून ती परत घाबरुन गेली होती. त्यासाठीच मी रमाकांतला बोलावून घेतले होते. दोघांना एकमेकांशी बोलायला दिले.

रमाकांतला सुनिताबद्दल प्रेम वाटत होते. तिची तो काळजी घ्यायला तयार होता. त्यानेच आता तिला उभारी द्यायची गरज होती. त्याने त्याच्या आईच्या बोलण्याबद्दल माफी मागितली इतकेच नव्हे तर त्याची तिला सांभाळायची तयारी आहे असे स्पष्ट केले. सुनिताला रमाकांतशी बोलल्यावर खूप मोकळे वाटले होते. रमाकांत पण तिच्याशी गांभिर्याने बोलत होता. त्याला तिच्याबद्दल वाटणाऱ्या भावना तो लपवू शकत नव्हता. दोघांनाही संसार करण्याची इच्छा होती.

रमाकांतची डॉक्टरांशी पण भेट घालून दिली. त्याच्या मनातल्या शंकांचे निरसन करुन देण्यात आले.

सुनिताची शस्त्रक्रिया यशस्वीपणे पार पडली. रमाकांत नियमितपणे तिला भेटायला येत होता. उपचार संपल्यावर तिला घरी पाठवण्यात आले. सुनिता माहेरी गेली. रमाकांतने आपल्या एका मित्राच्या मदतीने पुण्यातच एक घर घेतले. छोटेसे होते पण दोघांना पुरेसे होते. आईवडिलांना त्याने समजवण्याचा प्रयत्न केला पण त्याच्या आईला

त्याने दुसरे लग्न करावे असे वाटत होते. त्यांना सुनिताबद्दल शास्वती वाटत नव्हती. शिवाय हा आजार संसर्गजन्य आहे असे त्यांना वाटत होते. रमाकांतने त्याच्या दृष्टीने त्यांची समजूत काढण्याचा प्रयत्न केला पण सर्व व्यर्थ. म्हणून तोच घरातून बाहेर पडला. दोघे एकत्र रहायला गेले. काही महिन्यांनी परत तपासणीसाठी सुनिताला बोलावले जात होते. ती यायची तेव्हा हमखास भेटून जायची. दोघांचे उत्तम चालले होते. आतातर सुनिताला गरोदरपणाचे वेध लागले होते. दोघांच्या चेहऱ्यावरचा आनंद खूप काही सांगून जात होता.

अशा सुनिता पुष्कळ असतील पण असे रमाकांत मात्र तुरळकच. मला रमाकांतचे कौतुक वाटले.

# असेही एक जोडपे

एक मध्यमवयाचे जोडपे कोर्टातर्फे पाठवण्यात आले. त्या बाईने दावा दाखल केला होता. दोघे सध्या एकत्र रहात होते. घरात ते दोघे, त्यांची मुलगी व नातू रहात होते. नेहमीप्रमाणे दोघांच्या नावांची नोंद करुन त्यांचे वय विचारले. तिला आपले वय माहित नव्हते. 'तुम्हीच काय ते अंदाजाने लिहा' असे ती म्हणाली. तिच्या नवऱ्याचे वय ५८ वर्षे. ती साधारण ५० वर्षांची असावी. अशिक्षित, एका घरी काम करुन २०० रुपये कमवते. तो एका कंपनीत कामाला होता. निवृत्त होऊन दोन वर्षे झाली. सध्या घरीच असतो. त्यांच्या लग्नाला २३-२४ वर्षे झाली. मोठा मुलगा वर्षापूर्वी वारला. तो २२ वर्षांचा होता. त्यांच्याच जागी मुलाला नोकरीला लावले होते. मुलाला एक मुलगा आहे. आता तो जेमतेम वर्षाचा आहे. सून तिच्या माहेरी रहाते. त्यांची मुलगी शिकत आहे. तिचे वय १९ वर्षे. 'तुम्ही कशासाठी दावा दाखल केलात?' असा प्रश्न विचारल्यावर त्यावर ती जरा गप्पच होती. नंतर म्हणाली की माझ्या मुलीच्या लग्नाचा खर्च मिळावा म्हणून मी कोर्टात आले आहे. तिने ९४ मध्ये दावा दाखल केला होता. ९५ पासून दोघे एकत्र रहात होती.

तिचे पेपर्स मी वाचले. त्यात घटस्फोट मागितला होता. शिवाय तिचा नवरा निवृत्त होणार तेव्हा त्यातील वाटा मिळावा असेही म्हटले होते. तिच्या मते तिला घटस्फोट नकोच होता. व आतातर नकोच आहे. वकीलांनी काय लिहिले ते तिला माहित नव्हते. तिला फक्त मुलीच्या लग्नासाठी पैसे मिळायला हवे होते. तिला तसे सांगितल्यावर तिचा मला प्रश्न, 'हे काय वय आहे काहो घटस्फोट घेण्याचे?'

सहा वर्षांपूर्वी तिच्या नवऱ्याचे एका बाईबरोबर प्रेमप्रकरण होते. ती बाई मुस्लिम होती. तिच्याच घरी तिचा नवरा रहात होता व म्हणून तो घरी फारसा येत नसे. निवृत्त झाल्यावर मिळणारा पैसा तो उडवून टाकेल ह्या भीतीने तिने वकीलाच्या मार्फत दावा दाखल केला होता. कोर्टात ती नियमितपणे येत नसे म्हणून तिची केस रद्द केली गेली हे तिला काही महिन्यांनंतर कळले म्हणून परत तिने दावा विचारात घ्यावा असा अर्ज केला. दावा दाखल केल्यावर तिला पोटात काहीतरी आजार झाल्याने २-३ ऑपरेशन्स करावी लागली. त्यावेळी तिचा नवरा तिच्याकडे परत आला. ती आजारी असल्यामुळे कोर्टात येऊ शकली नव्हती. कोर्टाने तिच्या अर्जाचा विचार केला व दावा परत दाखल करुन घेतला. नंतर आज दोघेही हजर होती.

त्याला सध्या कंपनीतर्फे ऐंशी हजार रुपये मिळाले होते. त्यातले ५००० रुपये तो नातवाच्या नावे बँकेत ठेवणार असे दोघांचे ठरले होते. आपला मुलगा तारुण्यात अपघाती मृत्यूने आपल्याला सोडून गेला ह्या आठवणीने दोघेही अस्वस्थ झाले होते. दोघांनाही मुलीची व नातवाची काळजी वाटत होती. दोघांनी संमतीने ठरवले की मुलीच्या लग्नासाठी व तिच्यासाठी अशी मिळून साठहजार रुपये तो बँकेत तिच्या नावे ठेवणार. शिवाय त्याला अजूनही काही रक्कम कंपनीकडून येणे बाकी होती. ती मिळाल्यावर त्यातील पाऊण रक्कम तो तिच्या नावे बँकेत ठेवेल. आज दोघेही एकत्र रहात होतेच. त्याने त्या बाईचा नाद सोडून दिला होता. आपली चूक त्याने मान्य केली होती व सुधारली पण होती.

समजूतदारपणे दोघांनी दावा मागे घेतला.

# मंदा

"ही मुलगी वेडी आहे व आमची फसवणूक केली गेली आहे. ह्यातून आम्हाला सुटका करुन घ्यायची आहे", असे मुलाकडची जेष्ठ मंडळी म्हणत होती. मुलगा गप्पच होता. घरचे ठरवतील ती पूर्व दिशा असे त्याच्याकडे बघून वाटत होते. बाकी सर्वांना बाहेर बसावयास सांगून दोघांशी स्वतंत्रपणे बोलण्याचे मी ठरवले.

मधुकर वय वर्षे ४०. बोलतांना जरा अस्पष्टपणे बोलायचा. बुद्धीने हुशार नसला तरी सामान्य होता. बोलण्यातले व्यंग सोडले तर काही दोष त्याच्यात नव्हता. त्याचे लग्न जुळत नव्हते म्हणून एवढ्या उशिरा लग्न झालेले. कायमची नोकरी होती. महिना २,०००/- रुपये कमवत होता. घरात आईवडिल होते. दुसरा भाऊ वेगळे बिऱ्हाड करुन रहात होता. त्याला बहिण नव्हती.

मंदा वयाने विशीतली. सर्वसामान्यांसारखी दिसणारी. भावाने तिचा सांभाळ केला. परिस्थिती तशी गरिबीचीच त्यामुळे हुंडा देण्याची तिच्या भावाची ऐपत नव्हती. मंदा चौथीपर्यंत शिकली. नंतर रोजंदारीवर काही कामे करी नाही तर घरातले सर्व ती करत असे. मधुकरशी तिचे लग्न तिच्या भावाने ठरवले. तिच्या होकार-नकाराचा काही प्रश्नच नव्हता. भावाचा निर्णय तोच तिचा निर्णय होता. काहीही हुंडा न देता लग्न लागले. मंदा सासरी रहायला गेली.

घरात सर्वकाही ती नीटपणे करायची. लग्नघर पाहुण्यांनी भरलेले होते तोपर्यंत ती सर्वांशी नीट वागत होती. हळूहळू घर रिकामे झाले. पहिल्या रात्री दोघे एका खोलीत जेव्हा आले तेव्हा मात्र मंदा खूप घाबरली. मधुकरने काहीही केले तरी ती कोपऱ्यात जाऊन बसली. मधुकरला ती हातही लावू देत नव्हती. ती त्याला सांगत होती की त्याने जरासा जरी स्पर्श केला तरी ती आरडाओरडा करेल. मधुकरला काही कळेना. पण दोघे वेगवेगळ्या बिछान्यावर झोपत होते. २-४ दिवसांनंतर मात्र मंदाला जास्तच भीती वाटू लागली. मधुकर आता काही बोलत नाही-करत नाही पण एखादेवेळी त्याने जबरदस्ती केली तर? ह्या विचाराने ती कावरीबावरी होत असे. मधुकरने घरात कोणाला हे काही सांगितले नाही पण मंदाच्या वागण्यात बदल होत होता. तिचे घरच्या कामात लक्ष लागेना. ती एकटीच बसून रहायची. आपल्याच विश्वात मग्न असायची. मधुकरने मग तिला माहेरी आणून सोडले. महिना-दोन महिने आराम करुन बरे वाटल्यावर ये असे सांगितले. मंदा परत आली नाही. सहा महिने झाले तरी ती आली नाही. मधुकरच्या घरच्यांनी त्याला कारण विचारले तेव्हा त्याने घडलेला प्रकार सांगितला. त्यावरुन सर्वांना वाटले की ती वेडीच आहे. मंदाच्या भावाने त्यांची फसवणूक केली.

मंदाच्या भावाला मात्र काही कळेना. मंदा तर चांगली आहे. घरात सर्व नीट करते मग मधुकरशीच ती अशी का वागली? तो तिला खूप रागावला. लग्नानंतर ती परत त्याच्याकडे आली हे त्याला आवडले नव्हते. पण मंदा परत जायला तयार होईना. ती बाहेर काम करुन पैसे कमावत होती. घरात वहिनीपण टोचून बोलायची पण नाईलाजाने ती तिकडे रहात होती.

मधुकरने लग्न रद्द ठरवणे किंवा घटस्फोट मिळावा ह्यासाठी खटला दाखल केला होता. मधुकर स्वभावाने शांत होता. मंदा खरेतर त्याला आवडली होती. घरातल्या कामात ती तरबेज होती. पण त्यच्याशीच ती अशी का वागते हे त्याला कळत नव्हते.

मंदाशी खूप खोलवर गप्पा मारुन तिला बोलते करावे लागले. तिच्या जुन्या आठवणींना उजाळा देत असतांना तिने लहानपणचा एक किस्सा सांगितला. तिच्याच नात्यातल्या एका पुरुषाने तिच्यावर बलात्कार केला होता. त्यावेळी हे काय ते कळले नसले तरी 'पुरुष' जातीवर तेव्हापासून तिचा राग होता. कोणत्याही पुरुषाबद्दल तिला आपुलकी वाटली नव्हती. तिला पुरुषांची नेहमीच भीती वाटत होती. लग्नानंतर मधुकर एकटा जेव्हा तिच्या जवळ येणार होता

तेव्हा तिला त्या प्रसंगाची आठवण झाली. ह्यातून बाहेर पडण्यासाठी ती आरडाओरडा करण्यास तयार होती. मधुकर मात्र शांत होता. त्याने कधीच जबरदस्ती केली नाही. पण भीतीने ती मात्र वेड्यासारखी वागत होती. माहेरी आल्यावर तिने याबद्दल विचार केला. मैत्रिणींशी बोलली. त्यांच्या फॅमिली डॉक्टरशीपण ती बोलली. तिचे काही गैरसमज होते ते दूर झाले. परत एकदा मधुकरशी संसार करुन बघावा असे तिला वाटत होते. माहेर तर सासरपेक्षा वाईट होते. सासरची मंडळी तिच्याशी कधीच वाईट वागली नव्हती. पण हे सर्व मधुकरला सांगणार कोण? तिला मधुकरला भेटायला कधी मिळाले नव्हते.

माझ्यासमोर दोघे एकमेकांना भेटले. मंदाने परत जाण्याची तयारी दाखवली. मधुकरच्या घरची मंडळी प्रथम तयार नव्हती पण मग केस चालू ठेवून एकत्र रहायला दोघे तयार झाले. महिनाभराने दोघे कोर्टात आले. दोघांचे व्यवस्थित चालू होते. मंदाने तिच्या गत-आयुष्याची कहाणी मधुकरला विश्वासात घेऊन सांगितली होती. मधुकरने विचारी बुद्धीने मंदाचा स्वीकार केला होता. दोघांनी कोर्टातला दावा काढून घेतला. आज दोघांचा संसार सुखासमाधानात चालू आहे.

# जरा शांतपणे विचार केला तर!

मेरीने कोर्टात पोटगीसाठी अर्ज केला होता. मेरी व डेव्हिडला माझ्याकडे पाठवले तेव्हा दोघेही हसतमुख व आनंदी चेहऱ्याने आत आलीत.

त्यांत मेरी वादी असल्याने तिच्याशी प्रथम बोलले. तेव्हा लक्षात आले की डेव्हिडशी तिचे संबंध अतिशय व्यवस्थित होते. परंतु जेव्हा मेरीच्या आईने दारुचा धंदा करायला सुरुवात केली व मेरी आईला मदत करायला लागली तेव्हापासून डेव्हिड तिच्याशी वाईट वागू लागला व दोघांचे पटेनासे झाले. लहान लहान कारणांवरुन भांडणे व्हायला लागलीत. हळूहळू मेरी आईकडेच जास्त रहायला लागली. तिची आई तिला पैसे द्यायची कारण ती आईला मदत करत होती. डेव्हिडला तेही पटत नव्हते. त्याचे म्हणणे तू आईला मदत करु नकोस व पैशाचा तोरा दाखवू नकोस. तो पैसा चांगल्या मार्गाने कमावलेला नाही. दारुचा पैसा डेव्हिडला नको होता. हळूहळू दोघांमध्ये दुरावा निर्माण झाला व मेरी आईकडेच रहायला लागली. जेव्हा डेव्हिड अजिबात येईनासा झाला तेव्हा मेरी घाबरली व तिने कोर्टात केस केली. मेरीला खरेतर पोटगी नको होती तिला डेव्हिडकडे परत जायचे होते. परंतु दोघांच्या हट्टामुळे मेरीला कोर्टात यावे लागले. मेरीची परिस्थिती समजून घेतल्यावर मी डेव्हिडला बोलावले.

डेव्हिड आला तो अगदी रागातच. म्हणाला, मी का म्हणून पोटगी देऊ? ती दारुचा धंदा करते व पैसे मिळवते आहे. मी तिला एक पैसाही देणार नाही. सुरुवातीचे बरेच दिवस डेव्हिडच्या मनातील मेरीबद्दलचा राग काढून टाकण्यातच गेले. थोड्या दिवासांनी त्याचा राग शांत झाला.

एकीकडे मेरीलाही समजावून सांगण्यात आले की तू सध्या काहीच जास्त न बोलता फक्त शांत राहून डेव्हिडचे ऐकून घे. त्या दोघांना एकत्र बसविल्यावर मेरीनेच बोलण्यात पुढाकार घेतला. ती म्हणाली, आपल्याला पैसे पुरत नाही म्हणून मी तुम्हाला मदत करण्याकरिता आईबरोबर काम करते. यावर डेव्हिडचे म्हणणे होते की तिने आईकडे जायचे नाही व दारुचा धंदा करायचा नाही.

डेव्हिड स्वत:ही छोटा धंदाच करीत होता. त्याची वडापाव विकायची हातगाडी होती व त्याला जागा अगदी मोक्याची असल्याने धंदा बरा चालत होता. एकट्याला काम भारी होत होते.

हळूहळू पर्याय असा निघाला की मेरीनेच त्याला त्याच्या कामात मदत करायची. धंदा वाढवायचा. मेरीची तयारी होती. पण तिने आईकडे जायचेच नाही हे मानायला ती तयार नव्हती. तिची आईपण एकटीच असल्याने तिला आईची काळजी वाटणे स्वाभाविकच होते. डेव्हिडला समजावून सांगणे जरा कठीणच जात होते. पर्याय असा निघाला की सुरुवातीला काही महिने मेरीने आईकडे जायचे नाही व एकदा डेव्हिडची खात्री पटली, त्याचा विश्वास वाढला की मग मेरीने थोड्यावेळाकरिता आईला भेटून यायचे असे ठरवले. दोघांनाही ते पटले.

कोर्टातर्फेच ह्या दोघांनी एकत्र रहायला जायचे असे ठरले. मागचे सर्व विसरुन मेरी परत नांदायला तयार होतीच व २-३ मुलाखतींमध्ये डेव्हिडचीही तयारी झाली होती. पुढील कोर्टाच्या तारखेला न्यायाधिशांपुढे उभे राहून दोघेही कोर्टातून एकत्र रहायला गेलीत.

मी त्यांना १५ दिवसांनी भेटायला बोलावले होते. १५ दिवसांनी ती दोघे आली तेव्हा त्यांचा चेहराच सर्व काही सांगत होता. दोघेही अत्यंत खुष होती. अगदी हातात हात घालून दोघे आलीत व आनंदानी सांगत होती की दोघांनी एकत्र काम केल्यामुळे त्यांचा धंदा अगदी व्यवस्थित वाढला होता व मिळकतही छान होती. दोघांनी नवीन कपडे घेतले होते.

कितीही आनंदी दिसली तरी मेरीला तिच्या आईची थोडीफार काळजी वाटतच होती. डेव्हिड समोर असतानाच तिने मला बोलून दाखविले की तिला एकदा तरी आईला भेटायची परवानगी द्यावी. यावर डेव्हिडनेच सांगितले की येत्या रविवारी तो तिला तिच्या आईकडे भेटायला घेऊन जाईल. मग काय, मेरी एकदम खुषच झाली. डेव्हिडचाही १५ दिवसांत मेरीवर विश्वास बराच वाढला होता हे त्याच्या वर्तनावरुन दिसत होतेच. मी त्यांना सावकाशीने त्यांच्या सवडीने २-३ महिन्यांनी भेटायला या असे सांगितले व तिथपर्यंत केस चालू ठेवायची असेही सांगितले.

मेरी व डेव्हिड त्यानंतर आले तेच मुळी ४ महिन्यांनीच. मध्यंतरी त्यांचे एक पत्र आले की त्यांचे व्यवस्थित चालू आहे व ते सावकाश भेटायला येतील. ख्रिसमसनंतर न्यूइयरला ती दोघे आली तीच मुळी खुशीची बातमी घेऊन. मेरी आई होणार होती. डेव्हिडपण खुपच आनंदी होता. दोघांचाही आनंद चेहऱ्यावरुन ओसंडून वहात होता.

मेरी अधूनमधून तिच्या आईला भेटत होती. ख्रिसमसला सगळे एकत्र आले होते. मेरीच्या आनंदाची परिसीमाच नव्हती.

आज त्यांनी त्यांची केस काढून टाकायचे ठरवले होते. त्याप्रमाणे मेरीने कोर्टाला अर्ज दिला व केस काढून टाकली. डेव्हिडला महानगरपालिकेकडून वड्याची गाडी चालवायला परमनेंट प्रमाणपत्रही मिळाले होते. त्यामुळे दुग्धशर्करा योग आला होता व मी मनातूनच त्यांना 'नांदा सौख्य भरें!' म्हणत होते.

# नंदिनी

लग्नाला उणेपुरे सहा महिने झाले आणि त्याच्या लक्षात आले की आपल्या बायकोला काहीतरी त्रास होतोय. एक दोनदा तिला अचानकपणे चक्कर आली होती. त्याच्या हनीमूनच्या वेळीच एकदा तिला त्रास झाला होता. पण थकल्याने असेल असे वाटले होते. आता मात्र हे वारंवार होत होते. घरात दोघेच रहात होते. आई-वडिल जवळच रहात होते. तो आईवडिलांचा एकुलता एक मुलगा पण त्याचे रहाते घर अगदीच लहान होते म्हणून अजीतने ब्लॉक घेतला. पूर्वीचे घर तळमजल्यावर, हे घर मात्र चौथ्या मजल्यावर होते. आईवडिलांना तळमजल्याचे रहाते घर सोडायचे नव्हते. म्हणून अजीत नवीन घरी रहात होता. तसे दोघेही रोज सकाळ-संध्याकाळ भेटायचे.

नंदिनीला अजीतने डॉक्टरांकडे नेले. अगदी अनपेक्षित असा धक्का त्याला बसला की नंदिनीला मोठा आजार असणार म्हणून "टाटा हॉस्पिटल" मधे जाण्याचे त्याच्या फॅमिली डॉक्टरांनी सांगितले. टाटा हॉस्पिटल असे नाव ऐकल्यावर माणसाचे अर्धे धैर्य गळून पडते. आपल्याला कॅन्सर आहेच असे जणू वाटून तो मनोधैर्य गमावून बसतो. पण जोपर्यंत निदान केलेले नसते व कदाचित कॅन्सर नाही असे पण निदान होऊ शकतेच न! शिवाय जरी कॅन्सर असलाच तरी तो प्रथम टप्प्यांतला असला तर आज त्यावर औषधे आहेत. उपचारांनी रोगी बरा होऊ शकेलच न!? आधीच मनात भीती बाळगणे योग्य नाही.

नंदिनीच्या चाचण्या कल्या गेल्या. तिला मेंदूत एक गाठ आढळली. त्यावर उपचार करायचे ठरले. अजीत तसा धीराचा होता. त्याने नेटाने नंदिनीला उपचारांसाठी तयार केले. त्या उपचारात नंदिनीचे केस गळणार-डोक्यावर टक्कल दिसणार ह्याची जाणिव तिला करुन दिली गेली. काहीही असले तरी त्याला अजीतची तयारी होती. तो चार्टर्ड अकाऊंटंट होता. त्याची सर्व कमाई तो तिच्या उपचारांसाठी खर्च करायला तयार होता. नंदिनी खरंच नशिबवान होती. अजीतसारखा नवरा तिला मिळाला होता!

उपचारपद्धती चालू होती. आजच्या काळात समाजात असे चित्र बघावयास मिळणे अशक्य नसले तरी दुर्मिळच नाही का?

कॅन्सरच्या आजारावर औषधे असतात किंवा रेडियोथेरापी म्हणजे एक विशिष्ट प्रकारचे किरण त्या भागावर सोडले जातात. त्यामुळे तो भाग काळा पडतो.

डॉक्टरांच्या अपेक्षेपेक्षाही चांगला परिणाम नंदिनीच्या तब्येतीवर औषधांचा होत होता.

नंदिनी पोस्ट-ग्रॅज्युएट होती. एका कॉलेजात प्राध्यापिका म्हणून काम करत होती. आता मात्र तिने नोकरी सोडली होती. घरातच ट्युशन्स चालू केल्या होत्या. दिवसेंदिवस तिची तब्येत सुधारत होती. अजीतचा तिला मोठा आधार होता. सासूसासरे तसे मधूनमधून देखरेख ठेवतच होते. माहेरच्या माणसांना मात्र अजीतचे खूपच कौतुक वाटत होते.

दोघांचा संसार चांगला चालू होता. पुढे अजीतने डॉक्टरांना मूल होण्याबद्दल विचारले. डॉक्टरांच्या मते मुल होऊ देण्यापेक्षा दत्तक घेणे चांगले. एकतर नंदिनी गरोदर राहिल ह्याची शक्यता कमी होती व गरोदरपणातही तिला त्रास होण्याची शक्यता नाकारता येत नव्हती. दोघांनी मग मुल दत्तक घ्यायचे ठरवले. एक १० महिन्यांची मुलगी त्यांनी दत्तक घेतली. मोठ्या आवडीने तिचे नामकरण करण्यात आले. मुलीचे नाव ठेवले सायली. त्यांच्या संसारवेलीवरचे ते फूल.

दत्तक घेतांना दोघांची तयारी होती. पण त्यांच्या घरच्यांना समजवावे लागले होते. अनाथाश्रमातून दत्तकमुल

आणतांना काही कायदेशीर पद्धतीचा वापर करावा लागतो. त्याची त्यांना माहिती करुन देण्यात आली.

आज सायली दोन वर्षांची झाली. बोलू लागली होती. अगदी दृष्ट लागण्यासारखा त्यांचा संसार चालू आहे.

देव त्यांना असेच ठेवो ही सदिच्छा!

# प्रेम

माझ्यासमोर निता नरेश बसले होते. ती दोघेही साधारण पंचविशीच्या आतलीच होती. दोघेही घटस्फोट हवा म्हणून कोर्टात आलेली. त्यांचा अर्ज हा संमतीने घटस्फोट मिळावा यासाठी होता. दोघांशी सुरुवातीला जुजबी बोलले व नरेशला बाहेर बसायला सांगितले आणि निताला बोलते केले.

'निता! अग तुमच्या दोघांचे असे काय बिनसले की लगेच तुम्ही घटस्फोटापर्यंत आलात?' तरीही निताची मान काही वर झालीच नाही. 'हे बघ, तू मला आत्ता जे सांगशील ते फक्त तुझ्या-माझ्यातच असेल. मी ते कोणालाही तुझ्या परवानगीशिवाय सांगणार नाही. पण तू जर तुमच्या दोघांमधे काय घडले हे बोललीच नाहीस तर मला कसे कळणार?'

'नको मॅडम, मला आता काहीही बोलायचे त्राणच उरले नाहीत. आमचे लग्न म्हणजे एक खेळ झाला. त्यात नरेशना-मला तर मनःस्ताप झालाच. पण इतरांनाही काही कमी त्रास झाला नाही, आता मोडायचे ठरविले आहे, ते तरी सुरळीत होऊ दे. पुन्हा तो विषय नको.'

कितीही समजावले तरी निता बोलायला तयारच नव्हती. तीचे एकच म्हणणे, आम्ही यातून बाहेर पडणार. हा आमचा निर्णय पक्का आहे मग बाकी चौकशी कशाला?

तिला वेळ देणे आवश्यक होते म्हणून निताला बाहेर पाठवून नरेशला बोलावले. 'काय नरेश, घटस्फोटाच्या निर्णयापर्यंत आलात? अडचण/त्रास काय आहे? तुमचे लग्न तर तुमच्या पसंतीनेच झालेय. बाकी घर, पैसा ही काहीच अडचण नसतांना, मने जुळताना काय त्रास झाला? जरा सविस्तर बोललात तर आपण सगळे मिळून मार्ग काढू.'

'बाई, मी निताला अगदी सुरुवातीपासून हे सांगत आलोय. मला मनापासून तिच्याशीच संसार करायचा आहे. अडचणी येतातच पण ती किंवा तिच्या घरचे काही ऐकायला तयार नाहीत. सुरुवातीला दोन दिवस पती-पत्नी संबंध आलेच नाही कारण घरी नातेवाईक वगैरे होते. पूजा झाल्यावर आम्ही महाबळेश्वरला गेलो. तिथे अडचण काहीच नव्हती पण निता एकदम घाबरुनच गेली आणि नेमकं त्याचवेळेस तिला चक्कर आली. मी पण खूप घाबरलो, पण डोके शांत ठेवले. चक्कर साधीच होती. तिला थोडे पाणी पाजले. ती शुद्धीवर आली. डॉक्टरकडे तरी रात्रीच्या वेळी परगावात कसे जाणार. रात्रभर आम्ही दोघे बसून होतो. सकाळी नाश्ता केला आणि निताला म्हटले चल आपण चौकशी करुया व एखाद्या डॉक्टरला भेटूया. पण ती हटूनच बसली की मुंबईला परत जायचे. शेवटी माझा नाईलाज झाला आणि परत आलो.'

घरी मी सगळे सांगितले. आता माझे आईवडिल व निताचे आईवडिल एकत्र बसून त्यांनी शेवटी घटस्फोट घ्यायचे ठरवले. मी खरं सांगू बाई, निता मला अतिशय आवडली आहे. अजूनही तुम्ही काही मार्ग काढाल तर बरे. या प्रसंगानंतर माझ्या वाचनात आले की डॉक्टर तज्ञ असतात. ते अशा प्रसंगी मदत करतात. तुम्ही तिला सांगा समजावून. कसेही करुन तिला संसार कयायला तयार करा.'

'हे बघा नरेश, तुम्ही जी केस दाखल केलीत ती दोघांच्या संमतीने घटस्फोट घेण्याची. त्यामुळे निताला स्वत:लाच वाटले तर ती नक्की तयार होईल व कोर्टात तुमची केस तशीच चालू ठेवून तुम्ही एकत्र येवू शकाल. आपण दोघेही एकत्र निताशी याविषयी चर्चा करुया. सुरुवातीला थोडे सबूरीने घ्यावे लागेल.'

'अहो, माझी कितीही दिवस थांबायची तयारी आहे. फक्त निताने हो म्हणायला हवे.' ठीक आहे, मी निताला बोलावते. मी निताशी एकट्यानेच बोलायचे ठरवले.

'निता, नरेश काय म्हणताहेत ते समजून घे. शांतपणे विचार कर आणि मग काय करणे योग्य आहे ते ठरव. मघाशी तू काहीच बोलली नाहीस, पण तुमची इतकी साधी अडचण आहे की त्यासाठी घटस्फोट घ्यायला नको. आपल्याकडे आजकाल सगळ्या विषयांचे तज्ञ आहेत. तुम्ही एकदा त्यांना भेटून तर या आणि ते जर का म्हणाले की लग्नसंबंध ठेवणे जमणार नाही, तर मग ह्या निर्णयापर्यंत या.'

इतके बोलल्यावर मग निता बोलायला तयार झाली. 'बाई झाली एवढी मानहानी पुरे. मला जमणारच नाही असे संबंध ठेवायला फार भिती वाटते मला. त्यापेक्षा मी शिकेन व आपल्या पायावर उभी राहीन.'

'अगं निता, तुला आता भिती वाटणे साहजिक आहे. पण आपण या विषयावर बोलूया. तुला नक्की कशाची भिती वाटते ते सांग म्हणजे त्याचे निराकरण करता येईल. हे बघ, नरेश सगळे समजून घ्यायला तयार आहेत. मी तुझ्या आणि त्यांच्याही आईवडिलांशी बोलेन. मग तर हरकत नाही ना तुझी?'

'मला आठ दिवस द्या विचार करायला. मग मी सांगते.'

'चालेल, हरकत नाही. पण ह्या आठ दिवसात मी तुला एक काम सांगणार आहे. मी एक पुस्तक देते ते तू वाचून ये.' आणि मी तिला डॉ. विठ्ठल प्रभूंचे 'निरामय कामजीवन' वाचायला दिले.

नरेशना तिची मनस्थिती सांगितली. त्यांनाही तेच पुस्तक वाचायचा सल्ला दिला व आठ दिवसांनी भेटायला बोलावले.

निताच्या घरच्यांनी निताला वैवाहिक जीवन काय असेल याची कल्पनाच दिलेली नव्हती व घरात बहिणींमधे निताच मोठी. त्याचून संकोची स्वभावाची त्यामुळे तिला हा त्रास झाला असावा. अर्थात तिच्यात इतर काही दोष आहेत का हेही ताडून बघणे आवश्यकच होते.

निता आठ दिवसांनी आली तेव्हा तिच्यात थोडा बदल जाणवला. एकदम अंतर्मुख होती. चेहऱ्यावर थोडे तरी हावभाव जाणवायला लागले होते. आल्यावर ती अगदी मोकळी बसली. मागच्या वेळेचे अवघडलेपण तिच्यात नव्हते. तिला हळूहळू बोलते केले तेव्हा कळले की निताला स्त्री-पुरुष संबंधाबद्दल जी माहिती होती ती चुकीची होती व त्यामुळेच पहिल्यावेळी तिला अतिशय भिती वाटत होती. आज तिने 'निरामय कामजीवन' हे पुस्तक वाचल्याने तिच्यात बराच मोकळेपणा आला होता व ती मोकळेपणी बोलायला तयार होती. थोड्यावेळ आमचे बोलणे झाल्यावर मी नरेशना बोलावले व निताच्या गैरसमजूतीबद्दल आम्ही एकत्र बोलायचे ठरवले.

निताच्या मनात जी काही भिती होती, उदा. संभोग केल्यावर लगेचच ती गर्भार होईल व नंतर तिचे वय लहान असल्याने प्रसूती अवघड होईल इत्यादी विषयांवर आम्ही चर्चा केली. त्यानंतर त्या दोघांना मोकळेपणा दिला व इतर विषयांवर बोलायला सांगितले.

नरेश सुरुवातीपासूनच लग्न टिकविण्यास उत्सुक होते. निताचा प्रतिसाद मिळतो आहे हे लक्षात आल्यावर त्यांनी निताला बाहेर घेऊन जाण्याची परवानगी मागितली. निताच्या घरच्यांशी संमती घेऊन ती देण्यात आली.

मध्ये १५ दिवस गेले व एके दिवशी ती दोघे ठरलेल्या दिवसाच्या आधीच माझ्याकडे एकत्र आली. मध्यंतरी दोनतीनदा फोनवर व दोनदा फिरायच्या निमित्ताने त्यांची बोलणी झाली होती. नरेश आता अतिशय उतावीळ झाले होते. त्यांना ताबडतोब निताला घरी न्यायचे होते. परंतु नितामध्ये तेवढा आत्मविश्वास आलेला नव्हता.

समुपदेशक या नात्याने मी त्यांना सुचवले की, मागचे १५ दिवस ती दोघे जशी एकमेकांना भेटत होती तसेच

परत त्यांनी भेटावे, एकमेकांच्या घरी जावे, हवे तर नाटक सिनेमासाठी जावे व मुख्य म्हणजे त्यांनी कुठल्याही स्त्रीरोगतज्ञाकडे जाऊन निताच्या ज्या गर्भारपण व प्रसूती याबद्दलच्या भ्रामक गैरसमजूती आहेत त्यांचे निराकरण करावे. हवे असल्यास मी पत्र देवू शकते. परंतु निता स्वतःच त्यांच्या ओळखीच्या डॉक्टरांकडे जायला तयार झाली. नरेशसुद्धा तिच्याबरोबर जाणार होते. दोघांची डॉक्टरी तपासणी झाल्यावर घरच्या वडिलमंडळींबरोबर मी त्यांना यायला सांगितले.

महिन्यानंतर ती दोघे व त्यांचे आईवडिल असे सर्व माझ्याकडे अगोदर फोन करुन आली. आम्ही सर्व एकत्र बसलो. निता आता पूर्णपणे भितीतून बाहेर आली होती. ती स्वतःच डॉक्टरांशी सर्व बोलली, चौकशी केली व त्यामुळे तिचे स्त्री-पुरुष संबंधाबाबतचे सर्व गैरसमज दूर झाल्याचे तिने सांगितले. त्यानंतर असे ठरले की निता थोडे दिवस नरेशकडे जाऊन राहिल व तरीही नरेश व निता यांनी एकमेकांवर कसलीही जबरदस्ती करायची नाही. घरातल्या वडिल मंडळींनाही सांभाळून घ्यायचे. तसा त्या दोघांमधे करार तयार करुन कोर्टाला दिला व साधारण महिन्याची मुदत कोर्टाकडे मागितली.

पुढच्या वेळेस दोघे आली ती खूपच उत्साही व आनंदी दिसत होती. कोणालाही न विचारता कळले असते की त्यांचा आनंद ओसंडून वहातो आहे. त्या दोघांनी त्यांचा राहिलेला मधुचंद्र पूर्ण करु का अशी विचारणा केली. निताला विचारले असता तिची त्याला हरकत नसल्याने त्या दोघांना ती परवानगी देण्यात आली.

ती गेल्यावर मनात विचार आला, हेच स्त्री-पुरुष संबंधाचे ज्ञान निताला तिच्या पालकांनी आधीच दिले असते तर त्यांच्यावर आज ही वेळ आली नसती. आज आपल्या शाळांतून व कॉलेज मधून योग्य लैंगिक शिक्षणाची किती आवश्यकता आहे हेच या दोघांच्या गोष्टीमधून आपल्या लक्षात येते.

मधुचंद्राहून दोघे आली तीच मुळी त्यांची केस काढून घेण्याच्या विचारात. आजपर्यंत ती दोघे एकत्र राहून तीन महिन्यांचा कालावधी गेला होता. दोघेही आनंदी होती व एकमेकांविषयी काहीच तक्रार नव्हती. त्यामुळेच त्यांनी केलेल्या अर्जावर विचार करण्यात आला व न्यायाधिशांनी त्यांना केस काढून घ्यायला परवानगी दिली.

# पेच

हॉस्पिटलमधे येणाऱ्या पेशंटसच्या वेगवेगळ्या समस्या असतात. ते ऐकून घेणारा व त्यावर उपाय करणारा हॉस्पिटलचा कर्मचारीपण माणूसच असतो. त्याच्याही अशाच काही समस्या असतील का? त्यांनाही काही काळजी, व्यथा असेल का? असणारच की! शेवटी तो पण माणूसच आहे, नाही का?

त्यादिवशी माझ्याकडे एक डॉक्टरीण आली. स्त्रीरोगतज्ञ अशी ही व्यक्ती. साधारण तीशी-पस्तिशीतली- खूप चिंताग्रस्त वाटत होती. खूप रडल्याने डोळे सुजले होते. खरेतर ती हॉस्पिटलमधील डॉक्टर म्हणून असे वाटले की ती कुठल्यातरी पेशंटसंबंधी सांगायला आली असेल. पण तिचा चेहरामात्र वेगळा वाटला. मी तिला सहज म्हटले की तुला बरं नाहीए का? की वॉर्डमधे/ओ.पी.डीत खूप गर्दी आहे का? ती थोडावेळ गप्पच होती. पण मग मात्र म्हणाली की मला तुमच्याशी बोलायचे आहे. माझं खाजगी काम आहे. तुम्ही मला वेळ देऊ शकाल का? मला आजच तुमच्याशी बोलायचे आहे.

तिने तिची व्यथा सांगायला सुरुवात केली. ती एका उच्चमध्यमवर्गीय घरातील मुलगी. एम.बी.बी.एस. पर्यंत शिक्षण झाले. खूप हुशार होती. पुढे पोस्ट ग्रॅज्युएशन करायचा विचार होताच. पण घरच्यांचे म्हणणे की तू घरातील एकुलती एक मुलगी वय उलटून जाण्याच्या आताच लग्न करायला हवे. लग्नानंतर हवे ते शिक. त्यांना त्यांची जबाबदारी संपवायची होती. एका मध्यमवर्गीय घराण्यातले स्थळ त्यांना कोणीतरी सुचवले. मुलगा एम.टेक झालेला. मेडिकल लाईनचा नसला तरी काय झाले? चांगला शिकलेला आहे. घरी त्याचे भाऊ होते. बहिणींची लग्नं झाली होती. त्याच्यावर घरची कोणतीही जबाबदारी नव्हती. एकंदर चांगले स्थळ वाटले शिवाय त्यांची मुलगी जरी डॉक्टर होती तरी रंगाने काळी व दिसायला चारचौघींसारखीच होती. त्यामुळे हातचे स्थळ घालवायला ते तयार नव्हते. तिची खरंतर मनापासून लग्नाची तयारी नव्हती. पण ती काहीही बोलली नाही. लग्न थाटामाटात झाले. ती सासरी रहायला गेली. घरचे वातावरण एकदमच वेगळे होते. घरी सर्वजण तसे कमीच शिकलेले. बोलतांना मधूनमधून शिव्यांचा वापर करत होते. तिला ते वगळे वातावरण आवडले नाही. पण सासर हे असेच असते अशी लहानपणापासूनची शिकवण.

घराबाहेर डॉक्टर म्हणून तिला मान देत होते पण घरात मात्र घरची लक्ष्मी म्हणूनही मान देत नव्हते. पदोपदी अपमान करत, प्रसंगी मारहाणही करत. नवरा मनाने चांगला होता, प्रेमळ होता पण घरच्यांच्यापुढे त्याचे काही चालत नव्हते. शेवटी तिने अट्टाहासाने वेगळे बिऱ्हाड करायचे ठरवले. नवऱ्याने अर्थातच ऐकले नाही. लग्नाच्या दोन वर्षात तीनदा सासरच्यांनी घराबाहेर काढले. नवऱ्याने दोनदा परत आणले. नंतर मात्र ते वेगळे रहायला लागले. इतके दिवस सासरच्यांचा त्रास होता तो तरी संपला. आता आपण सुखाने राहू ह्या विचारात होती. पण तसे काही झाले नाही. तिला बाहेर मिळणारा मान नवऱ्याला बघवत नव्हता. तिला 'डॉक्टर' म्हणून कोणी म्हटले की त्याचे रक्त उसळे. "मी काय कमी शिकलो आहे का?" असे त्याच्या मनात येई. ती खरंतर घरात गृहिणी म्हणून रहायचा प्रयत्न करत होती पण नवऱ्याला ते वारंवार टोचत होते.

त्यांच्या एकुलत्या एक मुलीवर दोघांचेही प्रेम होते. मुलीचे लाड दोघेही करत. खूप हुशार मुलगी आहे म्हणून बाहेरच्यांनी कौतुक केलेले नवऱ्याला सलत असे. 'आई एवढी हुशार' म्हटलेले आवडत नसे. शेवटी रोजच्या वादविवादांना कंटाळून मुलीला घेऊन तिने घर सोडले. माहेरी आली, माहेरच्यांनी तिला आसरा दिला पण तेही टोचून बोलत की दोनदा घराबाहेर काढले तरी परत गेली. तिला नवरा एवढा आवडतो मग आता का त्याला सोडून आली? वरकरणी जरी त्यांनी आसरा दिला तरी मनातून त्यांनी तिला आपलेसे केले नाही. ती ना सासरची राहिली ना माहेरची.

अशा मनस्थितीत असतांना नोकरी धरली. नोकरी करणं तर भाग होते. कारण पैसे कोण देणार? ती कमावू शकते म्हणून माहेरच्यांनी मदत करण्याची उत्सुकता दाखवली नाही आणि तिला नवऱ्याकडून पैसे मागायचे नव्हते. घरचे सर्व करुन, मुलीची शाळा सांभाळून नोकरी करणे यात तिची खूप तारांबळ उडत होती. शिवाय तिला नवऱ्याबद्दल प्रेमही वाटत होते. आपण परत एकत्र राहू लागलो तर बरे होईल असे वाटत होते आणि त्याही बरोबर स्वत:हून त्यांना भेटायला व विनवण्या करायला तिचे मन तयार नव्हते. माहेरच्यांनी स्पष्ट सांगितले होते की जर तू आता परत त्याच्यापुढे जाऊन नाक घासले तर आमचे घर तुला कायमचे बंद होईल. जरी डॉक्टर असली तरी पदरातल्या मुलीला तिला मोठे करायचे होते.

दोन दिवसांपूर्वी एका व्यक्तीने तिला काही पेपर्स दिले. तिच्या नवऱ्याने ते कागद पाठविले होते. ते पेपर्स होते घटस्फोटाचे. दोघांनी संमतीने वेगळे व्हावे असे नवऱ्याचे मत पडत होते. ती त्याला तयार नव्हती. दोन दिवस ती एकटी त्यावर विचार करत होती. खूप विचार करुनही काय करावे ते तिला कळत नव्हते. आदल्याच दिवशी नवऱ्याला जाऊन भेटली. त्याने तिचे म्हणणे ऐकून घेतले पण तरीही आता परत एकत्र रहाणे शक्य होणार नाही असे तो सांगत होता. त्याला त्याची करीयर पुढे वाढवायची होती. तिच्या करीयरच्या आड त्याला यायचे नाही म्हणून तो घटस्फोट घेणार होता. पुन्हा ती डॉक्टर असल्याने हे सर्व होतंय अशी जाणीव तिला होत होती. आपण जर काहीच शिकलो नसतो तर?.....उगीचच आपण शिकलो का?...की पुरुषांना आपली बायको चांगली शिकलेली आहे, चारचौघात तिला मान मिळतोय हे बघवत नाही? लग्नापूर्वीच खरंतर ह्यावर दोघांचे बोलणे झाले होते. त्याने तिच्या शिकण्याला प्रोत्साहन दिले होते. पण एकदा शिक्षण पूर्ण झाले आणि सर्वच पालटले, असे का?

तिच्या नवऱ्याशी बोलल्यावर त्याच्यामते ती खूप गर्विष्ठ, अहंकारी आहे. आपण कोणीतरी मोठे आहोत. बाकीचे सर्वजण म्हणजे तुच्छ, त्यांना काही कळतच नाही, अशा विचारसरणीची आहे. तिचे कोणाशीच पटत नाही. ती खूप हेकेखोर आहे. तिच्या खूप चुका झाल्या आहेत. त्यालापण खरंतर तिच्याबद्दल प्रेम वाटत होते. तिच्या शिक्षणाबद्दल अभिमान होता. पण तेच शिक्षण वैयक्तिक जीवनात आडकाठी बनू नये असे त्याला वाटत होते. तिच्या ह्या व्यवसायाचा मुलीवर परिणाम होऊ नये, तिचे शिक्षण सुरळीत व्हावे म्हणून त्याने नोकरी केली. तिला वेळ दिला. आता त्याला व्यवसाय चालू करायचा होता. तेव्हा काही वर्षे तिने सर्विस करावी व नंतर स्वत:ची प्रॅक्टीस चालू करावी असे त्याचे म्हणणे होते. पण तिला ते मान्य नव्हते. ती तिच्या व्यवसायाशी तडजोड करायला तयार नव्हती. शेवटी आपण तरी आपल्या व्यवसायात वर यावे म्हणून घटस्फोट घेऊन मनाला शांती मिळवायची त्याची इच्छा होती. ती मुलीला भेटू देत नव्हती. मुलीला खरंतर त्याचा लळा होता. पण आता ती हेकेखोर झाली होती. त्यालापण काय करावे ते कळत नव्हते.

दोघांचेही खरंतर मनापासून एकमेकांवर प्रेम होते. त्यांनी परत एकत्र रहावे अशी दोघांचीही इच्छा होती. वाटेतले काही अडथळे, अडचणी दूर करणे जरुरीचे होते.

दोघांनाही एकत्र बोलायला मी एक तारीख ठरवली. दोघेही आले. एकमेकांशी नाही पण माझ्याशी बोलले. कोणालाही स्वत:हून माघार घ्यायची नव्हती. त्याला मुलीला भेटायचे होते. मी भेटीचा एक दिवस-वेळ व ठिकाण ठरवून दिले. त्यादिवशी तिने मुलीला घेऊन जायचे व त्याने मुलीला भेटायचे असे ठरले. आठवड्यानंतर दोघांनाही यायला सांगितले. ह्या आठ दिवसांत त्यांना घरी करायला एक अभ्यास दिला. प्रत्येकाने दुसऱ्याबद्दल चांगले व वाईट असे काय वाटते ते लिहून काढायचे.

आठवड्याने दोघेही आले. ठरल्यावेळी तो मुलीला भेटला होता. दोघांनीही होमवर्क केला होता. दोघांना तो वाचायला दिला. त्यावर चर्चा केली. काही गोष्टींची त्यात भर पडली. त्यादिवशी परत त्यांना चार दिवसांचा वेळ दिला. एकत्र रहायचे असेल तर त्यांच्या अटी कोणत्या हे लिहून आणायला सांगितले. चार दिवसांनी दोघेही परत आले. त्याने त्याच्या अटी लिहिल्या होत्या की हिने घरात गृहिणीप्रमाणे रहावे, डॉक्टर असण्याचा गर्व मानू नये. मुलीची नीट काळजी घ्यावी. माहेरच्या व्यक्तींना दोघांच्याही संसारात लुडबुड करु देऊ नये. त्याचा व्यवसाय स्थिरस्थावर होईपर्यंततरी तिने नोकरी करावी.

तिनेपण अटी लिहून आणल्या होत्या. त्या अशा की, नवऱ्याने तिला आपली बायको म्हणून मानावे. मारहाण करु नये. मानसिक त्रास देऊ नये. वेगळे घर करावे. आपल्या आईवडिलांशी संबंध ठेवू नये व तिला स्वतंत्र व्यवसाय करु द्यावा.

दोघांच्याही अटी एकत्र करणे जरुरीचे होते. दोघांनी त्यावर आपली मते मांडली. असेच का, तसेच का नाही? ह्यावर वाद झाला. प्रसंगी एकजण खोटे बोलतोय असे आरोप झाले. दोघांनाही शांत करणे जरुरीचे होते. दोघांशीही मी परत स्वतंत्रपणे बोलले. विचार करायला त्यांना वेळ दिला. मध्यंतरी एकेकट्यालाच बोलावले. त्यांच्याशी त्याचे वागणे, दुसऱ्याकडून त्याची अपेक्षा व सत्यस्थिती ह्याचा विचार केला.

दोघेही एकत्र दर आठवड्याला भेटू लागले. हळूहळू दोघांनाही एकमेकांचे चांगले गुण दिसून येत होते. मुलीला पण तो भेटत होता. तो वेगळे घर घ्यायला तयार झाला. तिने २-३ वर्षे नोकरी चालू ठेवायचे मान्य केले. दोघेही दोन-तीन दिवसांकरिता ट्रिपला जाऊन आले. नवीन घरात ते रहायला गेले. मुलीची शाळा बदलली. त्याने त्याचा स्वतंत्र व्यवसाय चालू केला होताच. तिची नोकरी चालू होती. दोघेही मधूनमधून भेटायला येत होते.

आणि आज ती खूपच खुशीत होती. आता त्याचा व्यवसायात जम बसला होता. आता ती नोकरी सोडून स्वतंत्र व्यवसाय चालू करत होती. तिच्या छोट्याशा नर्सिंगहोमच्या उद्घाटनाची आमंत्रण पत्रिका द्यायला आली होती. तिचा त्या दिवसाचा चेहरा आणि आजचा.... आज तिला आपण हवे हे करु शकतोय त्याचा आनंद वाटत होता.

दोघांचा संसार सुखाने चालू होता. मुलगीपण आता जाणती झाली होती. जरा शांतपणे व समजूतीने घेतलेल्या निर्णयाचे फळ तिला मिळाले होते.

# चंचल

बालक मार्गदर्शन केंद्रातर्फे मुलांच्या विविध समस्यांचे निराकरण व उपचार केले जातात. ह्या केद्रामध्ये बालरोगतज्ञ, मानसोपचारतज्ञ, मानसशास्त्रज्ञ व समाजसेविका, सर्व एकत्रितपणे काम करतात. मुलाच्या समस्येबाबत त्यांच्या पालकांशी तसेच मुलाशी बोलणे होते. निरिक्षणाच्या द्वारे मुलाच्या समस्यांचे निदान करुन उपाय केले जातात. सर्वसाधारणपणे खेळाच्या माध्यमातून उपचार केले जातात.

अशाच एका केंद्रामध्ये काम करतांना आलेला अनुभव -

आम्ही चौघे मिळून मुलांच्या मार्गदर्शनासाठी क्लिनिक चालवतो. या क्लिनिकमध्ये एक डॉक्टर- बाल रोगतज्ञ, एक मुलांचा मानसोपचार तज्ञ व एक मनोविकार तज्ञ आणि एक समाजसेविका असते. मी समाजसेविका म्हणून तिथे काम करत होते.

समीर हा पाच वर्षांचा मुलगा. दिसायला चुणचुणीत परंतु अतिशय चंचल. एक मिनिटही तो स्वस्थ बसू शकत नाही. शारदाताईची हीच तक्रार होती. त्या नेहमी म्हणायच्या समीर जर पाच मिनिटे स्वस्थ बसला तर मी पेढे वाटेन. त्यांची तक्रार हीच होती की समीरचे शाळेत अजिबात लक्ष नाही. सतत खोड्या करतो. कारणाशिवाय उठून बाहेर जातो. वरवर पहाता ही सगळी लक्षणे अतिशय द्वाड मुलाची वाटतात व शारदाताईचा व त्यांच्या घरातील मंडळींचाही हाच समज होता. त्यांना त्याचे काही वेगळे कारण असू शकेल ही पुसटशीही कल्पना नव्हती. शारदाताई नेहमी समीरच्या वागण्याकडे दुर्लक्ष करायच्या. त्यांच्यामते मोठा झाल्यावर येईल समज त्याला. समीर पहिलीत गेला व त्याच्या वर्गशिक्षिकेला समीरचे वागणे खटकले त्यांनी शारदाताईना आमच्याकडे पाठवले.

आमच्या क्लिनिकमध्ये तक्रार आल्यावर आम्ही त्या मुलाची डॉक्टरकरवी संपूर्ण तपासणी करतो. इतर मानसिक बुद्धी/पातळी ठरवण्याकरिता आवश्यक चाचण्याही मानसोपचार तज्ञांकडून करुन घेतो. त्याप्रमाणे समीरच्या डॉक्टरी तपासणीत काहीच विशेष आजार निघाला नाही. परंतु त्याला झोप जरा कमीच आहे असे जाणवले. त्याची मानसिक वाढ थोडी कमीच असल्याचे लक्षात आले व दुसरे महत्त्वाचे म्हणजे समीरचा अवखळपणा हा सर्वसाधारण नसून त्याला एक प्रकारची मनोविकृती असल्याचेही आमच्या लक्षात आले. समीरला हायपर ॲक्टिव्हिटी (अतिवर्धित क्रियाशील) अथवा हायपरकायनेसीस (अतिवर्धित गतिलक्षण) ही मानसिक विकृती होती.

समीरच्या विकृतीची संपूर्ण कल्पना त्याच्या आईवडिलांना देणे अगदी आवश्यक होते. त्याप्रमाणे सुरुवातीलाच आम्ही त्यांना क्लिनिकमध्ये बोलावून समीरच्या आजाराची कल्पना दिली. सुरुवातीला शारदाताई मानायला तयारच नव्हत्या. पण जेव्हा त्यांना व समीरच्या वडिलांना मानसोपचारतज्ञाने सर्व समजावून सांगितले व समीरच्या वागणुकीतील लक्षणे उदाहरणांनी समजावले तेव्हा त्यांना थोडे पटले. सतत वेळेवर औषधोपचार व वागणूकीत बदल घडवून अशा प्रकारच्या मानसिक विकृती बरी करण्यात यश येते हेही त्यांना सांगून दिलासा दिला. समीरच्या वर्तणुकीतील बदल घडवून आणण्याकरीता आठवड्यातून एकदातरी मार्गदर्शनाकरीता त्याने आमच्याकडे येणे आवश्यक होते.

हायपरकायनेसीस अथवा हायपर ॲक्टिव्हीटी या विकृतीमुळे मुले लक्ष केंद्रित करु शकत नाहीत. त्यांच्यात स्थिरता कमी असते. सहज त्यांचे लक्ष दुसरीकडे केंद्रित होते. मनाचा गोंधळ होतो. चित्त विभ्रम होते. ती मुले

भावनावश होऊन एकदम उचल खातात अथवा त्यांना एकदम आवेश येतो, जोर येतो. त्यांचे मूड्स, भावस्थिती सतत बदलत असते. अशा मुलांबरोबर काम करताना स्वत:चा आग्रह व निग्रह टिकवून ठेवणे जितके महत्त्वाचे तितकेच त्रासाचे असते. समाजसेविकेबरोबरच आईवडिल, शिक्षक यांनाही फारच श्रम घ्यावे लागतात, मनाची दृढता लागते. यातूनच त्यांच्या वर्तणुकीत बदल घडवून आणावा लागतो. अशा विकृतीवर औषधोपचारही करता येतात व तशी औषधे आम्ही समीरला मानसोपचार तज्ञांकडून देतच होतो.

समीरचे लक्ष केंद्रित करण्याकरिता त्याच्याबरोबर बसून त्याला आवडणाऱ्या गोष्टी-खेळ खेळणे व त्यातूनच त्याचे लक्ष केंद्रित करण्याचा अवधी वाढविणे हा पहिला टप्पा होता. त्याकरिता त्याला आठवड्यातून दोन दिवस केंद्रात बोलावले जात होते. सतत त्याचे एका ठराविक रितीने लक्ष केंद्रित करण्याकरिता लागणाऱ्या सगळ्या आवश्यक गोष्टी एकत्र करुन (Positive reinforcement) वर्तणुकीत बदल घडवण्यात येत होता. सुरुवातीला समीर १/२ मिनिटसुद्धा एका जागी बसू शकत नव्हता. तो साधारण २ ते ३ मिनिटांपर्यंत एका जागेवर बसून खेळणे, वाचन अथवा त्याच्या मनात आलेली कुठलीही गोष्ट करीत होता.

मध्यंतरी त्याच्या शाळेतील शिक्षिकेला भेटले. तिला समीरच्या आजाराची कल्पना दिली होती व तिनेच त्याला आमच्या पर्यंत आणून पोहोचवले याबद्दल तिचे आभार मानले. वेळोवेळी आवश्यक असलेले सहकार्यही तिच्याकडून मिळतच होते. शाळेतील अभ्यासक्रमातही समीर आता थोडीफार प्रगती दाखवू लागला होता. महिन्यातून एकदा मानसोपचार तज्ञांकडे समीरच्या प्रगतीचा आढावा घेत होते. त्यांच्याही मते समीर हळूहळू प्रगती दाखवीतच होता. मनोविकार तज्ञांनी दिलेली औषधे, समीरचे आईवडिल, समाजसेविका, शाळेतील शिक्षिका या सर्वांच्या अविरत व सततच्या प्रयत्नांमुळे समीर हळूहळू बरा होत होता. समीरबरोबरच आमचे सर्वांचे जे एकजुटीने कार्य चालू होते त्यात यशाची चाहूल आम्हाला लागली होती. येणाऱ्या यशामुळे त्याच्या आईवडिलांना धीर-दिलासा देता येत होता. त्याला चालू असलेली उपाययोजना थोडी त्रासदायक व महागाची होती. त्यामुळे जेव्हा गरज भासेल त्यावेळेस त्याच्या आईवडिलांना आर्थिक मदतीसाठी कुठे अर्ज करावा याबद्दलची माहिती व आवश्यक मदत देण्यात येत होती.

प्रयत्नांती परमेश्वर! असे सर्व सांगतात, त्याच आशेवर आम्ही सर्व समीरला सुधारण्यासाठी नेटाने प्रयत्न करीत होतो. समीर हळूहळू सुधारत होता व वर्षभराच्या प्रयत्नांनंतर त्याने बरीच प्रगती दाखविली होती. त्याच्या शाळेतील शिक्षिकाही म्हणत होत्या की समीरमध्ये बरीच सुधारणा झालेली आहे. असेच प्रयत्न चालू ठेवल्यावर थोडेच दिवसात समीरची सर्वसाधारण मुलांमध्ये गणना होऊ शकेल अशी आशा आम्हाला नक्कीच वाटत होती.

ज्या मुलांना हायपरकायनेसीस अथवा हायपर ॲक्टिव्हीटी ही मनोविकृती असते ती मुले साधारणत: त्यांच्या पौगंडावस्थेपर्यंत अथवा थोडी नंतर बरीच स्थिर होतात परंतु सुरुवातीपासून जेव्हा त्या दिशेने प्रयत्न केले जातात त्यावेळेस ती त्यांच्या वयाच्या १८ ते २० वयापर्यंत सर्वसामान्यांच्यात जाऊन पोहचतील. म्हणून अशा प्रकारचा खोडसाळपणा कोणात आढळल्यास त्याकडे अगदीच दुर्लक्ष करण्यासारखे नसून निदान बालरोगतज्ञ अथवा बालमानोसपचार केंद्रात जाऊन तपासणी करुन घेणे योग्य ठरेल/ ठरते.

# मुले-आईवडिलांमधील दुवा

रंजना पस्तिशीला आलेली, थोडीफार शिकलेली आणि मिलमध्ये काम करणारी. हसतमुख पण प्रथमदर्शनीच लक्षात येते की हिच्या चेहऱ्यावरचे हसणे थोडेफार ओढून आणलेले आहे. त्याला कुठेतरी दु:खाचे गालबोट लागलेले दिसते.

रंजनाने कोर्टात नवऱ्याकडून मुलींच्याकरीता पोटगीची मागणी केली होती. तिची केस मागची १२ वर्षे कोर्टात चालू होती. मॅजिस्ट्रेट कोर्टाने रंजनाच्या बाजूने निकाल दिला होता व तिच्या नवऱ्याने(हनुमंतने) तिला दरमहा मुलींकरीता एक ठराविक रक्कम द्यावी असा आदेश हनुमंतला दिला होता.

हनुमंत ही साधारण ४० वर्षे ओलांडलेली व्यक्ती, परंतु चेहरा अगदी साठीला आल्यासारखा दिसत होता. चेहऱ्यावर त्रासिकपणा अगदी स्पष्ट दिसत होता. हनुमंतने कोर्टाच्या आदेशाप्रमाणे नियमित पैसे न भरल्याने आज रंजनाला परत कोर्टात यायला लागले होते. त्यामुळेच रंजना व हनुमंत माझ्यासमोर बसले होते. नुकतीच कौटुंबिक न्यायालयाची सुरुवात झाली होती. त्यामुळे रंजना व हनुमंत यांना एकत्र यायला एक संधी मिळाली होती.

आत्तापर्यंत पोटगीचे दावे हे मॅजिस्ट्रेट कोर्टात चालायचे व तिथे वादी-प्रतिवादींना एकत्र येऊन बोलायला संधी किंवा सोय नव्हती. जे काही बोलणे, ठरवणे होते ते परस्पर वकिलांतर्फेच जास्त व्हायचे. परंतु कुटुंब न्यायालयामुळे पती-पत्नींना एकत्र बसून बोलण्याची संधी देण्यात आली. याच संधीचा रंजना व मी पूर्ण फायदा घ्यायचे ठरविले. सुरुवातीला मी रंजनाशी बोलले. त्यावेळेस रंजनाचा अजूनही हनुमंतकडे ओढा कायम आहे हे मला तिच्या बोलण्यातून निदर्शनास आले. ती प्रत्येक वेळा बोलताना मला सांगत होती की बाई, ह्यांची काहीच चूक नाही. थोडेसे जुगार खेळतात, पण म्हणून का आम्ही वेगळे रहायचे. आता मुलींनापण समज आलीए. त्यांनाही सतत वडिलांना भेटावेसे वाटते. बाई, तुम्हीच आता यातून मार्ग काढा व आम्हाला एकत्र आणा.

हनुमंतला एकट्याला बोलावले. त्यावेळेस लगेचच त्याने स्वत:च कबुली दिली की त्याने भरपूर कर्ज घेतले असल्याने त्याला पोटगी भरता आली नाही. परंतु यापुढे तो शक्यतो वेळेवर पोटगी भरण्याचा प्रयत्न करणार आहे.

कौटुंबिक न्यायालयाचा मुख्य उद्देश लक्षात ठेवून मी त्या दोघांना एकत्र चर्चेसाठी बोलावले. सुरुवातीला दोघेही एकमेकांशी काय बोलावे या विभ्रमात पडले होते. एका पूर्ण तपानंतर त्यांना एकत्र बोलण्याची संधी मिळाली होती. सुरुवात कुठून करावी हा मोठा प्रश्न होता. मग मीच दोघांमध्ये संवाद साधण्यासाठी त्याच्या मुलींची, शाळेची अशी इतर चौकशी केली. त्यावर हनुमंत म्हणाले की ते मुलींना फारसे ओळखतच नाही. याच मुद्यावर मग आम्ही सर्वप्रथम चर्चा केली व तिघांनी असे ठरवले की हनुमंतने शक्य तेवढी जास्त रक्कम लवकरात लवकर कोर्टात भरायची व पुढच्या तारखेला रंजना मुलींना घेऊन कोर्टात येणार व मग हनुमंत आपल्या मुलींना भेटतील.

मुलींची वडिलांशी भेट १२ वर्षांनी होत होती. त्यात लहान मुलीने तर वडिलांना बघितलेच नव्हते. मी रंजनाला या सगळ्याची कल्पना आधीच दिली होती व तिला तिच्या दोन्ही मुलींना तयार करुन आणायला सांगितले होते. परंतु प्रत्यक्षात मुली व वडिल एकमेकांकडे काय दृष्टीने बघतील याची कल्पना करणे कठीणच होते.

पुढील तारखेला रंजना व मुली आल्या त्यावेळेस मी मुलींशी बोलले. मुलींना वडिलांबद्दल आदरच होता. कुठल्याही प्रकारचे किल्मीष त्याच्या मनात नव्हते. रंजनाच्या शिकवणीमुळे त्यांच्या मनात वडिलांची एक चांगलीच प्रतिमा तयार होती. रंजनाने मुलींना सांगितले होते की, जे काही भांडण आहे ते त्या दोघांचेच आहे व त्यात मुलींचे काहीच वाकडे नाही. हनुमंतही आजपर्यंत कोर्टाने ठरवल्यामुळे नियमित पोटगी देत असल्याने मुलींचेही स्वत:चे जे

वडिलांबद्दलचे मत होते त्यात राग किंवा द्वेष दिसून येत नव्हता. सुरुवातीच्या भेटीत चौघेही एकमेकांशी फार काही बोलू शकले नाहीत. हनुमंत चौकशी करत होते व मुली त्याची उत्तरे देत होत्या. मात्र निघतांना लहान मुलीने पटकन विचारले, बाबा, परत कधी भेटणार? हनुमंतनेही जराही वेळ न घालवता पटकन सांगितले की कधीही. पुढच्या रविवारी भेटूया, चालेल? हा प्रश्न त्याने रंजनाला विचारला होता. मग मीच मध्यस्थी केली व त्यांना ठरवून दिले की पुढील तारखेपर्यंत चौघांनी मिळून एक-दोनदा बागेत, सिनेमाला वगैरे जायला काहीच हरकत नाही. या सुचनेला चौघांनी होकार दिला. दोन महिन्यांनी परत मला भेटण्याचे नक्की केले. त्यावेळेस मुलींची परीक्षा असल्याने त्यांनी यायची आवश्यकता नाही असे ठरले.

माझ्या मनात इथे एक कोडे होते की रंजना सांगत नव्हती, तरी १२ वर्षांपूर्वी तिच्यावर बरेच दडपण आल्याने किंवा हनुमंतची जराही साथ नसल्यानेच तिला वेगळे व्हावे लागले होते. रंजनाचे असे म्हणणे होते की, तिच्या पतीला जुगाराचे व्यसन असल्याने त्यांचे उत्पन्न नव्हते व पूर्णपणे कर्जबाजारी असल्याने सासू व दीर तिला सतत बोलायचे. याच भांडणामुळे तिला जेव्हा दुसऱ्यांदा दिवस गेले त्यावेळेस सासू व दीर-जावांनी तिला टोचून बोलून हैराण केले. पतीला जुगारापुढे तिची काहीच कदर नसल्याने ती आपल्या आईकडे परत आली होती. परंतु तिला थोडीशी आशा होती की तिच्या पतीने जर जुगार सोडला तर ती सर्व एकत्र राहू शकतील. याच आशेवर ती माहेरी दिवस घालवीत होती.

तिच्या माहेरी सुरुवातीला आई व वडिल असतांना तिला काहीच त्रास नव्हता म्हणून तिने मिलमध्ये नोकरी सुरु केली. परंतु काही वर्षांनंतर तिच्या भावांची लग्ने झालीत. वडिल वारले व तिची आई परावलंबी झाली. रंजना फारच एकटी पडली होती. त्यातून अधूनमधून मुलीही बाबांकडे जावूया म्हणू लागल्या व सगळ्या परिस्थितीतून जात असतानाच ती कौटुंबिक न्यायालयात आली.

पुढच्या तारखेला मी एकटी रंजनाशी बोलले. मुलींचे वडिलांबद्दल काय मत आहे? याची चौकशी केली. दोघी मुली वडिलांबरोबर एकदा सिनेमाला व एकदा फिरायला जावून आल्या होत्या. इतक्या वर्षांनंतरही वडिलांशी उत्कृष्ट नाते संबंध प्रस्थापित करु शकतात ह्याचे सगळे श्रेय मात्र रंजनाचेच आहे हे मी तिला पटवून दिले. रंजना फारच खुशीत होती, कारण ती सगळी फिरायला गेली असताना हनुमंतने आपणहून मागचे सर्व विसरुन एकत्र राहूया, अशी इच्छा व्यक्त केली होती. यावेळेस मी रंजनाला सांगितले की नुसते ते म्हणताहेत म्हणून नाही, तू स्वत: सगळ्या गोष्टीचा विचार कर व मगच निर्णय घे. मुलींचे शिक्षण, जागा, पैसा, हनुमंतचे कर्ज या सर्व गोष्टींवर नीट विचार करुनच मग निर्णय घ्यायचा होता.

हनुमंतला देखील ह्या सगळ्या गोष्टींची कल्पना होती. त्याने व रंजनाने घर, कर्ज व मुलींचे शिक्षण यावर व्यवस्थित विचार करण्याचे ठरवले. हनुमंत व्यवस्थित कामावर जायला लागलाच होता. त्यामुळे त्याने निम्मा पगार कर्ज फेडण्याकरीता वापरला तर साधारण चार महिन्यांत कर्ज फेडण्यासारखे होते. तोपर्यंत एप्रिल, मे महिना आला असता. त्यावेळेस मुलींच्या परीक्षा संपून नवीन वर्ष सुरु होईल तेव्हा जागा बदलून चालले असते. त्यामुळे एप्रिल पर्यंत कर्ज फेडणे व जागा बघणे- करण्याचे ठरवले.

दोघांच्याही कामाच्या जागा पश्चिमरेल्वे मार्गावर असल्याने बोरीवलीत जागा बघणे सोईचे होईल असे ठरले व त्याप्रमाणे बोरीवलीत पागडीवर दोघांच्या नावाने भाड्याची जागा घेतली. कर्जही फिटलेच होते. मध्यंतरीच्या काळात चौघांनी मिळून नवीन जागेच्या सजावटीसाठी बरीच मेहनत घेतली. ह्या सगळ्या एकत्रित येवून काम करण्यामुळे दोघांची मनेही जुळून आली. स्वभावातील गुण व दोष लक्षात आले.

अशारितीने मे महिन्यापासून सर्वांनी एकत्र रहायचे ठरले. तसे त्यांनी कोर्टात लिहून दिले व चालू असलेली केस तशीच बाजूला ठेवून सर्व एकत्र रहायला गेली. त्यानंतर त्यांनी मला साधारण महिन्याने कधीही त्यांच्या सवडीने येवून भेटावे असेही ठरले.

शाळा सुरु होण्यापूर्वी मुलींचे निकाल लागल्यावर चौघेही मला येवून भेटले. मोठी मुलगी कॉलेजमधे जाणार होती व धाकटी शाळेत. दोघींच्या ॲडमिशन्स व्यवस्थित झाल्या. घराचे बस्तानही बसले. मागचे राहिलेले पैसे सध्या मागायचे नाहीत असे ठरले. आता एकत्र रहायला लागल्यावर रंजनालाही वेगळ्या पैशांची गरजच नव्हती. कोर्टाच्या नियमाप्रमाणे मी केस आणखी दोन महिने चालू ठेवायची का असे विचारले. त्यावर हनुमंत म्हणाले की त्यांची काहीच हरकत नाही. त्याच्यावरचे कर्ज असेही फिटत आले होते. मध्यंतरी मी स्वत: त्यांच्याकडे जावून आले. हनुमंत व रंजना दोघांच्या शिफ्ट असल्याने दुपारी ४ वाजता दोघे भेटले. त्यांचा संसार अगदी व्यवस्थित सुरु होता. आजूबाजूला त्यांची कोर्टात केस चालू आहे ही कल्पना नसल्याने मी रंजनाची मैत्रिण म्हणूनच गेले होते. शेजारी यांचे वागणे फारच उत्तम होते. सगळे खेळीमेळीने एकमेकांना मदत करुन एकत्रित रहात होते.

एक तपानंतर अशारितीने ह्या दोघांचा संसार पुन्हा सुरु झाला. जणू काही त्यांना वनवासाचा शापच होता. एका तपानंतर सुटका होऊन सगळे सुरळीत झाले. रंजनाने केस मागे घेतली. पुढील आयुष्यात गेलेली १२ वर्षे कशी भरुन काढता येतील याची मनोरथे रचण्यात संपूर्ण कुटुंब दिवस घालवित. एकमेकांना गरज असेल तेव्हा सांभाळून घेत रहात होती.

# मी माझ्या पायावर

"ताई, मी आज तुमचे आभार मानायला आलोय, आज मी माझ्या घरी जाणार!" अगदी आनंदाने सचिन हे सांगत होता. वीस वर्षांचा हा तरुण मुलगा आपल्या पायांवर उभा राहून चालत आला होता. त्याच्याकडे पाहून तो सर्वप्रथम ज्या दिवशी आला होता तेव्हाचा चेहरा आठवला. किती अंतर होते ह्या दोन चेहऱ्यांमधे!

सचिन अगदी काकुळतीने सांगत होता की मला काही माझा पाय कापून घ्यायचा नाहीय. गावी काहीही उपाय करु नाहीतर आहे तसे राहू दे, पण पाय कापायचा नाही असा त्याचा निश्चय होता. त्याचे वडिल वय ६० वर्षे. आता खरंतर ह्या उमद्या मुलाच्या जीवावर त्यांनी दिवस काढायचे पण त्यांचे नशिबच असे की त्याच मुलाला ते दवाखान्यात घेऊन आले होते. गावी डॉक्टरांनी मुंबईला नेण्यास सांगितले होते. त्यानुसार पैश्यांची जुळवाजुळव करुन ते इकडे आले. त्याच्या आजाराचे निदान केले गेले. त्याला हाडाचा कर्करोग होता. एक पाय गुढघ्यापासून कापावा लागणार होता. त्यानंतर तो बरा होण्याची शक्यता जास्त होती. डॉक्टरांच्या मते तो नक्की बरा होणार होता. पण तो काही केल्या शस्त्रक्रियेला तयार नव्हता. ह्यासाठीच डॉक्टरांनी त्याला माझ्याकडे पाठवले होते.

एखाद्या व्यक्तीला त्याच्या आजाराची पूर्ण कल्पना देऊन त्यावरच्या उपचारपद्धतींची माहिती देणे हे आमचे कामच असते. शिवाय हे करतेवेळी ती व्यक्ती त्या आजाराकडे कोणत्या दृष्टीकोनातून बघते, त्याच्या आजाराचा त्याच्यावर व त्याच्या कुटुंबियांवर काय परिणाम होतात, त्याच्या कुटुंबियांची काय प्रतिक्रिया होते याचाही अभ्यास केला जातो. सचिन ऑपरेशनला तयार नव्हता, का? हे जाणून घेणे महत्त्वाचे होते. डॉक्टरांकडे फक्त तो 'मी तयार नाही' ह्याचाच घोष करत होता.

सचिनशी मी बोलले. त्याच्या वडिलांशी बोलले. दोघांशी एकत्रितपणे बोलले.

एखाद्या व्यक्तीच्या वागणुकीमागचे कारण जाणून घेतले तर ती व्यक्ती अशी का वागते हे समजून घेता येते. त्या व्यक्तीच्या वर्तणूकीत बदल घडवून आणणे शक्य होते. जेव्हा आपल्याला जाणवते की आपले काहीतरी चुकतेय, आपण असे नाही तसे वागायला हवे तेव्हाच आपण स्वत:त बदल घडवून आणतो.

सचिनचे अगदी तरुणपणाचे दिवस, अजून लग्न झालेले नाही. गावी तो घरात मोठा मुलगा. वडिल शेतीकाम करणारे. त्यांचे उतारवय, "त्यांना आधार द्यायचा की मीच अपंग होऊन घरी बसायचे?" सचिनचा प्रश्न. पाय कापला की अपंग होऊन घरात बसणार असा सचिनचा ग्रह. त्याचमुळे तो शस्त्रक्रियेला तयार होत नव्हता. हे जेव्हा समजले तेव्हा हा पूर्वग्रह चुकीचा कसा आहे हे त्याला दाखवून देणे गरजेचे होते. त्यासाठी मी त्याच्यासारख्या २-३ जणांना त्याच्याशी बोलायला सांगितले. त्यांचे अनुभव ऐकून सचिनला वाटले की आपल्याला काही घरात निकामी बसून रहावे लागणार नाही. कृत्रिम पाय बसवून तो हिंडू फिरू शकेल. कामकाज करुन कमावू शकेल. घराचा तो आधारस्तंभ होता. शस्त्रक्रिया नाही केली तर मात्र आजार बळावेल व नंतर मात्र उपचार करणे कठीण जाईल ह्याची त्याला जाणिव करुन दिली गेली. सर्व बाजूंनी विचार केल्यावर सचिन ऑपरेशनला तयार झाला. तो स्वत:हून डॉक्टरांना आपली तयारी असल्याचे सांगण्यास गेला.

सचिनचे ऑपरेशन झाले. त्याला कृत्रिम पाय बसवण्यात आला. तो काही महिने दवाखान्यात भरती होता. त्याकाळात त्याला टायपिंगचे ट्रेनिंग देण्यात आले. एका सेवाभाची संस्थेने त्याला टाईपरायटर दिला. त्यामुळे भविष्यात तो आपलेच नव्हे तर कुटुंबाचे पण पोट त्याच्या कमाईवर भरु शकणार होता.

आज त्याला दवाखान्यातून घरी पाठवण्यात येत होते. आपण आपल्या घरी जाणार तेही चालत म्हणून त्याच्या चेहऱ्यावरचा आनंद लपू शकत नव्हता.

# तडजोड

लग्न जुळवणे हा आपल्याकडे वडिलधाऱ्या माणसांचा छंदअसतो. अजून तरी प्रेमविवाहांचे प्रमाण तसे कमीच आहे. बहुतांशी लग्न जुळवलेच जाते. दोन्हीकडची मंडळी एकत्र बसतात, विचारविनिमय होतो व लग्न पक्के केले जाते. ह्यावेळी पुष्कळदा नवरा-नवरी पडद्याआडच असतात. त्यांचे हित-अहित हे वडिलधारी मंडळी त्यांच्या कल्पनांनुसार ठरवत असतात. लग्न जुळवण्यात पहिला टप्पा म्हणजे पत्रिका पहाणे. किती गुण जमतात? ३६ गुण जमले की मग इतर कशाला पहायचे? आपल्या सर्वांच्याच पहाण्यात असे ३६ गुण जुळूनही संसार न झालेली उदाहरणे किंवा ह्याउलट पत्रिका न पहाता केलेले लग्नही आनंदाने टिकून राहिलेले अशी उदाहरणे कमी नाहीत. पत्रिका पहावी की नाही हा वैयक्तिक प्रश्न आहे हे खरे पण फक्त पत्रिकेवरच सर्व काही अवलंबून ठेवणे योग्य की अयोग्य ह्याचापण विचार व्हायला हवा. लग्न ठरवतांना नवरा-नवरीची पसंती, दोघांचे शिक्षण, दोघांच्या आपल्या जीवनसाथीबद्दलच्या आशा-अपेक्षा, दोघांची आर्थिक स्थिती, दोघांच्या कुटुंबियांचे रहाणीमान, खाण्यापिण्याच्या सवयी ह्या सर्वांचाच विचार करायला हवा. 'पाण्यात पडले की आपोआप पोहता येते' किंवा 'जात्यावर बसले की ओव्या येतात' हे सर्वच अंशी बरोबर नाही.

शालिनी-शिरिषचे लग्न असेच वडिलधाऱ्यांनी ठरवलेले. शिरीष शालिनीला पहायला गेला. चहापोहे खाल्ले. २-३ मिनिटे शालिनीला पाहिले. चार-पाच जुजबी प्रश्न विचारले व मग ह्यावरुन होकार कळवला. लग्न ठरले व पार पडले.

शालिनी एका उच्चमध्यमवर्गीय कुटुंबातली मुलगी. तिचे शिक्षण दहावीपर्यंतच. पण इंग्लिश माध्यमातून झाले. बोलतांना ती इंग्रजी अगदी चांगल्याप्रकारे बोलायची. शिरीष शालिनीला दिसायला अनुरुप होता. जोडा चांगला दिसत होता. शिरीषचे शिक्षण गावीच झाले. मग तो मुंबईत आला. नोकरी करुन पुढचे शिक्षण पूर्ण केले. आता त्याला चांगली नोकरी मिळाली होती. स्वतःच्या कष्टाने त्याने मुंबईत चाळीत घर घेतले. २-३ वर्षांपूर्वीच आपल्या आईवडिलांना त्याने गावाहून इकडे आणले. बहिणीचे लग्न त्यानेच करुन दिले. त्याला एक लहान भाऊ होता त्याच्या ग्रॅज्युएशनपर्यंतच्या शिक्षणाचा खर्चही शिरीषनेच केला. आता तो नोकरीच्या शोधात होता. घरातला जेष्ठ मुलगा ह्या नात्याने घराची जबाबदारी शिरिष पार पाडत होता.

शालिनीचे स्थळ सांगून आले मग पत्रिका जुळवून बघितली. पहाण्याचा कार्यक्रम झाला व लग्न ठरले. लग्नाचा संपूर्ण खर्च शालिनीकडच्यांनी केला. शिरीषने चार मोजकेच दागिने केले. त्याच्या घराची व आर्थिक परिस्थितीची कल्पना त्याने शालिनीच्या घरच्यांना दिली होती. त्याच्या घरात नोकर-चाकर नव्हते. त्याला आपल्या घरच्यांशी जुळवून घेणारी बायको हवी होती. शिक्षणाची अट नव्हतीच. किंबहुना कमी शिकलेली, नोकरी न करणारीच बायको असावी म्हणजे घरात ती सर्व बघेल असे शिरीषला वाटे. त्याच्या अपेक्षांमध्ये शालिनी बसली होती.

लग्न आटोपले. दुसऱ्या दिवशी रिवाजाप्रमाणे घरात पूजा झाली. घरातले पाहुणेमंडळी आपापल्या घरी निघून गेली. शिरीष शालिनीला घेऊन बाहेर फिरायला निघाला. बाहेर पडल्यावर शालिनीला रिक्षेनेच फिरायचे होते. शिरीष नेहमी बसने जाणारा पण शालिनीला नाराज करायला नको म्हणून रिक्षेने गेला. हनिमूनसाठी महाबळेश्वरला जावे असा शिरिषचा प्लान. त्याप्रमाणे त्याने बुकिंगही करुन ठेवले होते. शालिनी मात्र जरा नाराजच होती. जाऊन जायचे तर खूप लांब जायला हवे. विमानाने जाऊया की कसे असे शालिनीला वाटत होते. शिरिषने तिची समजूत काढली. दोघे महाबळेश्वरला गेले. प्रत्येकवेळी मात्र शालिनी शिरीषच्या गरिबीवर टीका करत होती. 'तुमच्यासारखी कंजुषी कधी बघितली नाही' वारंवार हेच ऐकून शिरीषला खरंतर खूप चीड आली होती. पण त्याने स्वतःच्या मनावर ताबा ठेवला. समजावणीच्या स्वरातच तो बोलत असे.

घरी आल्यावर शिरीषचे ऑफिस सुरु झाले. सकाळी लवकर उठून त्याला डबा द्यावा लागे. शालिनीला लवकर उठायची सवय नव्हती. शिवाय कामाचा उरकही नव्हता. शिरीषची आई समजूतदार स्वभावाची होती. ती सर्व कामे सकाळी करी. शालिनी थोडीफार मदत करत होती. शालिनीला स्वयंपाकही फारसा येत नव्हता. शिरीषच्या आईने तिला समजावून सांगितले की आता जरी शिकलीस तरी चालेल. तिला शिकवण्यास सासूची तयारी होती. शालिनीने काही पदार्थ केला की याचे सर्वचजण कौतुक करत. तिला शिकण्यासाठी प्रोत्साहन देत.

शालिनीला मात्र आपली सासू गोड गोड बोलते पण शेवटी ती सासूच! ती चांगली कशी असणार असा समज होता. शिरीष घरच्यांकडे जास्तच लक्ष देतो. घरच्या सर्वांचे करण्याचा त्यानेच का मक्ता घेतला आहे? असा तिचा सवाल. घरात शिरीष कमावतो मग घरकामासाठी बाई का ठेवू नये? घरच्यांच्या मताशी शालिनी सहमत होत नसे. तिला हवे तसे इतरांनी वागावे असे तिला वाटत होते. सासू जरी बोलत नसली तरी तिच्या म्हणण्याप्रमाणे शालिनीनी वागावे अशी जी सासूची अपेक्षा होती तिलाच शालिनीचे ऑब्जेक्शन होते. ती वारंवार माहेरी निघून येत होती. माहेरी जास्त वेळ झोपायला मिळे. घरात काहीच काम करावे लागत नव्हते. बाहेर फिरायला जाता येत होते. मैत्रिणीत वेळ घालवता येत होता. त्यामुळे माहेरी तिला मोकळे वाटत होते. सासरी मात्र बंधनात असल्यासारखे वाटत होते. शालिनीने मग सासरी परत जायचे नाही असे ठरवले. तिच्या घरच्यांना तिने घरात सर्व काम करावे लागते अशी तक्रार केली. आईवडिलांनी तिची बाजू खरी मानली. शिरीषची आई त्रास देते तेव्हा त्याला वेगळे रहायचे असेल तर शालिनी परत जाईल असा त्यांनी विचार केला.

शिरीष शालिनीला भेटायला येत असे. पण एकतर ती घरात नसायची किंवा असलीच तर तुमच्या घरी मला त्रास होतो अशी तक्रार कयायची. परत जायला ती तयार नव्हती. शिरीष कंटाळला. त्याने तिच्या घरच्यांना स्पष्टच विचारले. खरंतर लग्नापूर्वीच घरच्या परिस्थितीची कल्पना त्याने स्पष्टपणे दिली होती. तरी पण शालिनीच्या आईवडिलांची समजूत की लग्नानंतर शालिनी बदलेल शिवाय शिरीषची परिस्थिती सुधारेल.

जवळजवळ वर्ष संपत आले. शालिनी परत आली. मग मात्र शिरीषने कायदेशीर काहीतरी करायचे ठरविले. एका संस्थेकडे तो गेला. त्या संस्थेतर्फे शालिनीला बोलावून घेण्यात आले. शिरीष-शालिनीची भेट घडवून देण्यात आली. पण संस्थेच्या मते शिरीषने काही कायम स्वरुपाची रक्कम शालिनीला द्यावी व घटस्फोट घ्यावा. शिरीषला खरेतर संसार मोडायचा नव्हता. शिवाय मोडायचाच असला तर स्वतःची काही चूक नसतांना पोटगीसाठी रक्कम का द्यायची? असे त्याला वाटे. संस्थेतर्फे काहीच निर्णय निघाला नाही. शिरीषने मग कोर्टात दावा दाखल केला.

शालिनी तारखेला हजर राहिली. दोघांना विवाह समुपदेशकाकडे पाठवले. शिरीष व शालिनी दोघांशी वेगवेगळे बोलणे झाल्यावर दिसून आले की दोघांमध्ये काही भांडण नव्हते. दोघांची पुरती ओळख होण्यापूर्वीच शालिनी घराबाहेर पडली होती. शालिनी माहेरी रमली होती. कोणतीही जबाबदारी तिच्यावर नव्हती. परंतु आता तिला आपण परत सासरी जावे, संसार करावा असे वाटत होते. तिने माहेरी राहिलेल्या काळात विचार केला होता, आपले कुठे चुकले याचा पडताळा घेतला होता. सासरी कोणीच तिच्याशी वाईट वागले नव्हते. पण तिच्याचमते त्यावेळी ती जरा पोरकट होती. आता तिला आपल्या जबाबदारीची जाणीव झाली होती. ती शिरीषकडे जायला तयार होती. पण शिरीषने स्वतःहून तिला न्यावे असे वाटत होते. शिरीष शालिनीला न्यायला तयार होता पण पूर्वीसारखे तिने वागू नये अशी त्याची अट होती. सासू-सासऱ्यांशी जुळवून घ्यावे व घरातली कामे व्यवस्थितपणे करावीत अशी त्याची अपेक्षा होती. दोघांचे एकत्रित बोलणे झाले. शिरीषच्या घरच्यांचेपण मत घेतले गेले. दोघांनी आपापल्या वागणूकीत थोडेफार फेरफार करुन एकत्र राहून पहावे असे त्यांनी सुचवले. दोघांनाही ते पटले. दोघे केस चालू ठेऊन एकत्र राहू लागले. दर महिन्याने कोर्टात दोघे येत.

शिरीषच्या घरची परिस्थिती पूर्वीसारखीच होती. शालिनीची विचारसरणी बदलली होती. तिच्या अपेक्षांनापण तिने मुरड घातली होती. ती जुळवून घेण्यास शिकली. संसार सुरळीत चालू होता. सासरच्या अपेक्षा समजून घेऊन त्याचप्रमाणे वागल्याने शिरीष-शालिनीचा संसार उभा होता.

दोघांच्या अपेक्षा त्याच्यात्याच्या स्वतंत्र ठिकाणी योग्य होत्या पण त्या एकमेकांशी जुळत नव्हत्या व त्यामुळेच समस्या निर्माण होत होत्या. संसारात दोघांनाही तडजोड करायची गरज असते हे खरे. पण येथे शालिनीकडूनच जास्त तडजोड होत होती. आजच्या सामाजिक स्थितीत हेच चित्र बहुतेकवेळा पहावयास मिळते. हे योग्य आहे का? हे बदलता येणे शक्य आहे का? कसे? याचा प्रत्येकानेच विचार करणे गरजेचे आहे.

# विसंवाद

कोर्टात काम करतांना येणाऱ्या केसेस ह्या जरी कायद्याच्या दृष्टीने घटस्फोटाच्या किंवा मुलांच्या ताब्याच्या किंवा पोटगीच्या अशा काही शिर्षकांखाली मांडता आल्या तरी येणारे प्रत्येक जोडपे हे त्याचे स्वत:चे असे स्वरुप घेऊन येतात. कोणत्याही दोन व्यक्ती सारख्या नसतात. येथे तर हे संबंध फक्त दोन व्यक्तींपुरता मर्यादित नसतात. दोन कुटुंबांचा ह्यात समावेश असतो. आमच्या कामाबद्दल बऱ्याचदा इतरांना असे वाटते की ह्या कामात तोच तो पणा येत असणार. पण तसे होत नाही. येणारी प्रत्येक व्यक्ती/कुटुंब आपले काहीतरी नाविन्य घेऊन येत असते. त्यामुळे कधी तोच तो पणा येत नाही.

श्री व सौ. जोशी हे जोडपे माझ्यापुढे बसले होते. दोघे जवळजवळच्या खूर्चीवरच बसले होते. तसे वरवर पहाता हे सुखी जोडपे असावे असेच एखाद्याला वाटावे. श्री जोशी यांनी घटस्फोटाचा दावा दाखल केला होता. दोघांना कोर्टातर्फे माझ्याकडे पाठवण्यात आले होते.

येणारे जोडपे आत येतांना अप्रत्यक्षरित्या त्यांच्याबद्दल काही माहिती देत असतात. समुपदेशक हा चांगला निरिक्षकही असावा लागतो. तोंडी बोललेले व ऐकलेले तर लक्षात घेतलेच जाते पण त्याबरोबरच शारिरीक हालचालीपण बरीच माहिती देऊन जातात. (Non-verbal) खाणाखुणा, व्यक्तीचा पोशाख, बसण्याची-बोलण्याची पद्धत, जोडप्याची बसण्याची पद्धत यावरुन व्यक्तीबद्दल व त्यांच्या परस्परांतील संबंधांबद्दलही बरीच माहिती मिळून जाते. उदा. नवरा बायको जवळजवळच्या खूर्चीवर बसतात किंवा दोन टोकांकडे खूर्ची ओढून बसतात किंवा बायको नवऱ्याच्या हजेरीत बसायला तयार नसते. ती उभीच रहाते.

श्री व सौ. जोशी परस्परांच्या शेजारी बसले. श्री. जोशी सावळा वर्ण-वय वर्षे ३९. एका प्रायव्हेट कंपनीत नोकरी करणारे, त्यांना ना भाऊ ना बहिण. आईवडिल व ते घरात रहात होते. एकुलता एक मुलगा म्हणून आईवडिलांचा लाडका होता. त्याचे हे दुसरे लग्न. पहिल्यांदा परस्पर संमतीने घटस्फोट घेतला होता. आता वर्तमानपत्रात जाहिरात देऊन हे लग्न ठरलेले. सौ. जोशी गोऱ्यापान वर्णाच्या. वय वर्षे ३५. एका शाळेत शिक्षिकेची नोकरी करणाऱ्या त्यांना एक भाऊ व आई होती. वडिल काही वर्षांपूर्वी वारले. आई एकटीच नाशिकला असते. भाऊ आपल्या संसारात मग्न होता. त्यांचे हे दुसरे लग्न. पहिल्या लग्नात सासरच्यांशी पटले नाही त्यामुळे त्यांनी घटस्फोट घेतला. त्या तशा स्वतंत्र मताच्या वाटल्या. आज एकट्याच कोर्टात आल्या होत्या.

वर्तमानपत्रातील जाहिरातीस ह्या आताच्या सौ. जोशींनी प्रतिसाद दिला. श्री. जोशींकडून त्यांचे आईवडिल व ते मुलगी पहायला नाशिकला गेले. सर्वांची पसंती झाली व लग्न ठरले. लग्न ठरल्यावर श्री. जोशी एकदाच नाशिकला त्यांना भेटायला गेले होते. लग्नानंतर दोघेही त्यांच्या आताच्या गिरगावच्या घरी रहायला आले. सौ. जोशींनी आपल्या शाळेतील नोकरीची बदली मुंबईत करुन घेतली. सुदैवाने ही बदली महिनाभरातच झाली.

गिरगावला चाळीत त्यांचे घर होते. सौ.जोशींचा नाशिकला बंगला होता. इकडे चाळीत शेजाऱ्यांचा आवाज येई. सर्व एकत्र असल्यासारखेच रहात होते. सौ.जोशींना एकांत आवडायचा. इतरांमध्ये त्या फारशा मिसळत नसत. त्यामुळे चाळीतले घर त्यांना फारसे आवडले नाही. तरी पहिले काही दिवस ठीक गेले. दोघांना माळ्यावरची खोली होती. तिकडे तसा एकांत होता, प्रायव्हसी होती. सौ.जोशींना इतरांशी जुळवून घ्यायला अवडत नसे. आपला ठरलेला कार्यक्रम त्याचपद्धतीने त्या करायच्या. कामात नीटनेटकेपणा होता. पण स्वत:पुरतेच त्या काम करायच्या. दुसऱ्याची वाटी, बशी, ग्लास उचलून ठेवणे हे त्यांना कमीपणाचे वाटे. घरात सासूशी त्यांचे जमत नव्हते. सकाळची शाळा असल्याने सकाळी उठून स्वत:चा चहा करुन घ्यायच्या व निघायच्या. १०-११ वाजता घरी परतल्यावर सासूबाईंचा स्वयंपाक तयारच असायचा. आपले ताट वाढून घेऊन त्या आराम करायच्या. संध्याकाळी मात्र सर्वांसाठी साग्रसंगीत

स्वयंपाक करायच्या. घरात कोणाशी कामाव्यतिरिक्त त्या बोलत नसत. शाळेतील पेपर्स, वह्या तपासणे त्या दुपारी करत. सुट्टी आली की दर पंधरवड्याला त्यांची नाशिकला फेरी व्हायची. बऱ्याचदा शाळेतूनच परस्पर त्या नाशिकला निघून जायच्या व श्री. जोशींना फोन करुन तसे कळवायच्या. हे सर्व श्री. जोशींच्या आईवडिलांना खटकत होते. श्री. जोशी त्यांच्याशी तिच्या वागणुकीबद्दल बोलले पण तिला त्यांच्या आईचा स्वभाव आवडत नव्हता. दोघेजण ४-५ दिवस तिच्याच आग्रहाखातर एका हॉटेलमध्ये राहिले. घरापासून दूर राहिल्यावर दोघे एकत्र राहून दोघांच्यात बोलून काही घडवून आणता येईल का म्हणून प्रयत्न केले. पण श्री. जोशींच्या मते तेथेही दोघांची भांडणे झाली. सौ. जोशी आवाज चढवून बोलतात त्यामुळे श्री. जोशींना गप्पच बसावे लागे. सौ. जोशींना वाटे की दोघे घराबाहेर एकमेकांशी नीटपणे राहू शकतात. पण श्री. जोशी सतत आपल्या आईचाच विचार करत असतात. चार दिवस जरी हॉटेलमध्ये राहिले तरी दिवसातून २-३ वेळा त्यांचे त्यांच्या आईशी फोनवर प्रदीर्घ बोलणे होत होते. सकाळी उठल्यापासून झोपेपर्यंत आई त्यांना आता हे कर, आता ते कर असे सांगत असते. श्री. जोशींना स्वत:चे असे अस्तित्त्वच नव्हते. आई सांगेल तसे ते वागत होते. हेच सौ. जोशींना खटकत होते. त्यावरुन दोघांची भांडणे होत. शेवटी कंटाळून सौ. जोशी एकदा नाशिकला निघून गेल्या. आपण आता श्री. जोशी बदलल्याशिवाय परतायचे नाही असे त्यांनी मनोमन ठरवून टाकले. श्री. जोशींनी तिला पत्र टाकले पण त्यांनी पत्रोत्तर दिलेच नाही. त्यांनी तिला फोन केला. फोनवरुन सौ. जोशींनी तुम्ही तुमच्या आईवडिलांना सोडून वेगळे रहाणार असाल तरच त्या परत येतील असे सांगितले. हे तर श्री. जोशींना शक्य नव्हते. शेवटी त्यांनी घटस्फोटाचा दावा दाखल केला.

सौ. जोशींची माहेरची आर्थिक स्थिती चांगली होती. वडिलांनी आईच्या नावावर घर व संपत्ती ठेवली होती. त्यातूनच आईचा चरितार्थ चालत होता. शिवाय आता आई हे सर्व त्यांनाच देणार होती. भाऊ स्वतंत्र रहात होता. त्याने पण काही हिस्सा मागितला नव्हता. सौ. जोशींचे पहिले लग्न मोडले तेव्हापासून त्या आईसोबत रहात होत्या. स्वत:च घरचे सर्व व्यवहार पहात असत. स्वत:च सर्व निर्णय घेत होत्या. परत लग्न करावे असे त्यांना वाटले नाही. आईने जाहिरात वाचली व आईच्या इच्छेखातर श्री. जोशींना तिने पत्र लिहिले. पुढे बोलणी झाली. श्री. जोशी हे एकुलते एक तेव्हा आता कोणाची जबाबदारी नाही. एकुलती एक सून तेव्हा ती हवे तसे वागू शकेल अशी त्यांची अपेक्षा, म्हणून सौ. जोशी लग्नाला तयार झाल्या.

सकाळी सौ. जोशी शाळेत जाण्यासाठी निघत तेव्हा श्री. जोशी उठलेलेही नसायचे. रात्री ते ७-८ वाजता घरी येत. रात्रीचे जेवण सर्वजण एकत्र बसून करत. पण नंतर टी.व्ही. बघणे व एकत्र बसून गप्पा मारण्याचा कार्यक्रम असे. सौ. जोशींना गप्पांत तसा रस नसे. त्या माळ्यावर जाऊन बसायच्या. रात्री उशिरापर्यंत मायलेकरांच्या गप्पा चालत. सकाळी लवकर उठायचे म्हणून त्या लवकर झोपत. एकूण दोघांचे संवाद जुळत नसत. एकमेकांना ते फारसा वेळ देत नसत.

"श्री. जोशी आपल्या आईची एवढी काळजी घेतात तर मी तरी का घेऊ नये?" असा सौ. जोशींचा सवाल. ह्यासाठी त्या वारंवार आपल्या आईकडे जात असत. आपला नवरा आईवेडा आहे हे त्यांचे ठाम मत झाले होते. तर श्री. जोशींना हे मान्य नव्हते. "आईने एवढे दिवस केले मग आता माझ्यासाठी लक्ष घातले तर काय बिघडले?" हा श्री. जोशींचा सवाल.

दोघांचे खरेतर एकमेकांशी खऱ्या अर्थाने संबंध जुळलेच नव्हते. अरे ला कारे केल्याने समस्या सुटत नाही उलट वाढत जाते. आपण काही करावे. व ह्यात त्याचे कष्ट न वाटता आनंदच वाटू लागणे हे परस्परांतील संबंधाचे चांगले लक्षण असते. दोघांनाही आपला जोडीदार वाईट नाही असे वाटत होते, पण... हा पणच मधे येत होता. तेथेच समस्येचे मूळ होते. दोघांच्याही एकमेकांकडूनच्या अपेक्षा जुळत नव्हत्या. श्री. जोशींना घरात रहाणारी, सासूशी जुळवून घेणारी अशी मातेसारखी पत्नी हवी होती. तर सौ. जोशींना धडाडीचा, स्वतंत्र विचारांचा व सौ. जोशींच्या सांगण्यानुसार वागणारा पती हवा होता. आता दोघांचेही हे दुसरे लग्न होते. लग्न मोडणे ही काही साधी सोपी बाब मानली जाऊ नये. संसार टिकवणे हे तर कुटुंब न्यायालयाचे मुख्य उद्दिष्ट! त्यादृष्टीने प्रथम प्रयत्न केले जातात. दोघांनाही परत एकदा एकत्र राहून बघण्याची संधी कायद्याच्या तरतूदीनुसार देता येत होती.

दोघांशी बऱ्याच बैठकी घेतल्या. त्यांच्या घरच्यांशी बोलणे केले. दोघांचे एकत्र रहाणे योग्य होईल असे त्यांना वाटू लागले. एकदा परत एकत्र राहून बघायचे त्यांनी ठरविले.

एकत्र बसून दिनक्रमात काय बदल करता येतील त्यावर चर्चा झाली. केस चालू ठेऊन दोघे एकत्र रहाणार होते. कौटुंबिक न्यायालयाच्या कायद्यानुसार पती-पत्नींना आपला दावा चालू ठेवून एकत्र राहून बघण्याची संधी देता येते. शिवाय ह्या एकत्र रहाण्याचा मूळ दाव्यावर कोणत्याही प्रकारचा परिणाम होत नाही. दोघांनी एकत्र रहाण्यास सुरुवात केली. दर महिन्याला दोघांना कोर्टात भेटावयास बोलावले जात होते. थोड्याफार तक्रारी येत होत्या. दोघेही चर्चेने त्या तक्रारींवर मार्ग काढण्याचा प्रयत्न करत होते.

परंतु सौ. जोशींना एकटे, स्वतंत्र रहाण्याची सवय लागली होती. त्या इतरांशी ॲडजेस्ट होऊ शकत नव्हत्या. प्रत्येकवेळी त्या सासूशी भांडत होत्या. श्री. जोशी गप्प बसत. त्यांची आपल्या आईला मूक संमती असे. सौ. जोशींपुढे बोलण्याचे त्यांना धैर्य होत नव्हते. चाळीत सर्वांना हे भांडतात हे कळत होते. त्याचा श्री. जोशींना राग येई. शेवटी सौ. जोशींनीच आपण वेगळे होऊ असा निर्णय घेतला. त्यांनी तसे श्री. जोशींना सांगितले.

सौ. जोशी ह्यांनी आपण विकत घेतलेल्या सर्व वस्तू नाशिकला नेल्या. दोघांनी संमतीने वेगळे व्हायचे ठरवले. आजवर संसारात कोणत्याही बाबतीत त्या दोघांचे एकमत झाले नाही पण आता घटस्फोट घेण्याच्या बाबतीत मात्र दोघांचे एकमत झाले. श्री. जोशींना अजूनही सौ. जोशी आवडत होत्या. त्या स्वतंत्र विचाराच्या आहेत याचा त्यांना अभिमान होता. पण---दोघांचे जमणे शक्य नव्हते.

# फसवणूक

लग्नापूर्वी दोन्ही घरची मंडळी एकत्र बसतात, बैठका होतात. मुला-मुलींमधील गुण-दोष सांगण्यात येतात. कुणी कोणापासून काही लपवून ठेवू नये अशी अपेक्षा असते. मध्यस्थ व्यक्ती ह्याबद्दल हमी देतात व त्यांच्या भरवशावर लग्न ठरते. कितीही पाहून-पडताळून लग्न केले तरी कधी कधी ह्यातही धोका दिला जातो. शेवटी लग्न हा जुगारच असतो. डाव लागला तर लागला नाहीतर अपयश पदरी येते. पण म्हणून लग्न करु नये असे नाही. आपल्याकडून सर्वतोपरी काळजी घेऊन - पाहणी करुन घ्यावी हेच योग्य.

दिलीप-स्नेहा हे जोडपे. दिलीपने आपले लग्न रद्दबादल ठरवण्यासाठी कोर्टात खटला दाखल केला. स्नेहाला कोर्टात बोलावण्यात आले व दोघांना माझ्याकडे पाठवण्यात आले होते.

दिलीपचे लग्न होऊन आता उणेपुरे सहा महिने झालेले. त्याचे वय अठ्ठावीस. दिसायला ठीक, ऐकायला जरा कमी येत होते. एका कंपनीत काम करत होता. कंपनीतर्फे रहायला जागा होती. त्याचे नातेवाईक दुसऱ्या गावी असत. स्नेहाशी त्याचे लग्न त्याच्या नात्यातल्या मंडळींनी जुळवले होते. स्नेहाला तो एकदा बघायला गेला होता. पण त्यानंतर दोघे एकत्र भेटले ते लग्नानंतरच. मध्यस्थ मंडळींनी लग्नाची बोलणी केली. स्नेहा वयाने सत्तावीस वर्षांची, दिसायला नाकीडोळी, नीटस. घरात कामे करु शकत होती. फारसे काही शिकली नव्हती. तिचे वडिल तिच्या लहानपणी वारले व तेव्हापासून तिच्या भावाने तिचा सांभाळ केला. तिच्या लग्नासाठी तिचा भाऊ गेले ८-१० वर्षे प्रयत्न करत होता. पण तिचे लग्न जमतच नव्हते. दिलीपला कानाने कमी ऐकू येत होते पण बाकी त्याच्यात काही कमी नव्हते. काहीही न देता-घेता दोघांचे लग्न झाले होते. स्नेहाचा भाऊ तिचे लग्न लागले ह्या आनंदात होता.

लग्नानंतर स्नेहाला सासरी रवाना केले गेले. पहिले ४-५ दिवस पाहुणेमंडळी घरात होती. स्नेहा एकाच जागी बसून रहायची. आपली स्वतःची कामे करायची पण कोणाशी मिसळत नव्हती. पाचव्या दिवशी मात्र सकाळी उठल्यापासून तिची वागणूक विचित्र होती. उठल्या उठल्या तिने वस्तू फेकायला सुरुवात केली. चहाचा कप फेकून दिला. घरातल्या वस्तू इकडे तिकडे टाकू लागली. आरडा-ओरडा करत होती. बाहेर कोणी ऐकले तर वाटेल की कोणी हिला मारहाणच करतंय की काय? घरातले सर्व गांगरुन गेले. काय करावे व हिला कसे आवरावे हे त्यांना कळेना. गावातल्या डॉक्टरला बोलावून आणले. तिला झोपेचे इंजेक्शन दिले गेले. तिचा हा संताप - आरडा-ओरडा कमी झाला. घरात शांतता होती पण कोणालाच काय करावे कळेना. तिच्या भावाला तार केली गेली व त्याला बोलावून घेतले. तिचा भाऊ ताबडतोब आला व तिला घेऊन गेला. तिला आपण डॉक्टरी उपचार करुन मग पाठवू असे त्याने सांगितले.

दिलीपच्या घरची मंडळी स्नेहाला माहेरी भेटायला आली. त्यांना कळले होते की स्नेहाला पूर्वीपासून मानसशास्त्राचा उपचार चालू होता पण हे त्यांना कोणी कळू दिले नव्हते. आता स्नेहा ठीक होती. तिचा भाऊ तिला परत पाठवायला तयार होता पण दिलीपची व त्याच्या घरच्यांची तयारी नव्हती. ती पुन्हा अशी वागली तर? ह्याची त्यांना धास्ती होती. स्नेहाच्या भावाशी लग्न मोडण्याबद्दल दिलीपच्या घरच्यांनी वाच्यता केली. स्नेहाला पोटगी मिळावी अशी तिच्या भावाची मागणी होती. दिलीपने पोटगी का द्यावी असा त्याच्या मंडळींचा सवाल होता. समजूतीने काही निष्पन्न होईना म्हणून दिलीपने कोर्टात खटला दाखल केला.

स्नेहाच्या भावाशी मी बोलले. त्याच्याकडे स्नेहाच्या उपचारांची कागदपत्रे होती. स्नेहावर बऱ्याच वर्षापासून उपचार चालू होते. तिला असे झटके पूर्वीपण आले होते. ती पूर्णपणे बरी होणार नाही असे डॉक्टरांनी सांगितले होते. तिची जबाबदारी किती वर्षे सांभाळायची ह्या विचाराने तिच्या भावाने तिचे लग्न लावून दिले होते. लग्नापूर्वीच हे सांगितले असते तर लग्न जमले नसते असा त्यांनी विचार केला. दिलीपच्या घरची मंडळी चांगली होती, ते तिला सांभाळून घेतील असे वाटून त्यांनी त्यांना हे कळू दिले नाही. उलट लग्नानंतर त्यांच्याचमुळे तिला असा झटका आला असावा असा त्याने कोर्टात पवित्रा घेतला होता. अजूनही पोटगी देत असतील तर सोडचिठ्ठी देण्यास तो तयार होता.

दिलीप साधासुधा होता. आपली स्नेहाच्या मंडळींकडून फसवणूक केली गेली ह्याचे त्याला दु:ख होते. स्नेहा अजूनही बरी होणार असेल तर तो तिला सांभाळायला तयार होता. पण डॉक्टरी सल्ल्यानुसार स्नेहा बरी होऊ शकणार नव्हती. दिलीपच्या घरच्या मंडळींनी स्नेहासाठी दहा हजार रुपये द्यायची तयारी दाखवली. तिच्या वस्तू तिला परत करण्यात आल्या. स्नेहाच्या भावाला दहा हजार रुपये मिळतायेत असे दिसल्यावर तो खटला संपवण्यास तयार झाला. स्नेहावरचे आरोप मान्य करुन लग्न रद्द ठरवण्यात आले.

# ती स्त्री आहे म्हणून!

दोघे एम.ई. शिकलेले. तो मुंबईचा, ती नागपूरची. तिची आई कॉलेजमधे हेड ऑफ डिपार्टमेंट. वडिल चांगल्या हुद्द्यावर. तिला एक भाऊ. तोपण सुशिक्षित. त्याची आई त्याच्यासोबत रहाते. त्याच्या वडिलांनी त्याच्या जन्मानंतर त्याच्या आईला सोडून दिले. त्याच्या वडिलांचे दुसरे लग्न झाले. ते वेगळेच रहातात. ह्यांच्याशी त्यांचा काहीही संबंध नाही. त्याचे मामा-मावश्या त्याला मदत करीत. तो शिकला स्वत:च्या जिद्दीने पायावर उभा राहिला. असे हे स्थळ. मुलगा होतकरु वाटला म्हणून त्याच्या कौटुंबिक बॅकग्राऊण्डकडे कानाडोळा करुन लग्नाला तिचे आईवडिल तयार झाले. घरच्यांच्या निर्णयाला तिचीपण संमती होती.

ती गोरीपान नाही पण उजळ रंगाची. तो सावळाच. दोघे एकमेकांना अनुरुप नव्हते. पण शिक्षण दोघांचे सारखेच झालेले. लग्नानंतर ती मुंबईत आली. तिचे काका-मामा मुंबईतच होते. तेपण चांगल्या हुद्द्यावर नोकरीला होते. लग्न थाटामाटात झाले. लग्नानंतर तिला कॉलेजात लेक्चररचा जॉब मिळाला. त्याची नोकरी होतीच. दोघे एकत्र भाड्याच्या घरात रहात होते. सासू कधी त्यांच्यासोबत असायची तर कधी ती तिच्याच घरी रहायची.

मुलाचा जन्म झाला. मग सासूची तिच्या संसारात ढवळाढवळ वाढली. ती त्याला हिच्याविरुद्ध काही सांगे. ती शिकलेली, तुझ्या डोक्यावर मिरी वाटेल. ती बाहेर जाते, कोणाकोणाशी बोलते-भेटते. मग तो त्यावरुन तिला प्रश्न विचारुन बेजार करी. तिच्या मनात येई मी काही वाईट केले नाही तर कशाला घाबरायचे? संसाराची गाडी पुढे सरकत होती. कधी हा त्रास सहन न झाला की ती काही महिने माहेरी रहायची पण नोकरी साभाळून होती. मुलाशी त्याला फारसे काही देणेघेणे नसे. दोघे घरात असले तरी फारसे संभाषण नव्हते. तशात मुलगी झाली. बाळंतपण माहेरी झाले. कारण सासरी काळजी घेणारे कोणी नव्हते. मुलगी जरा मोठी झाली पण त्याचा संशयी स्वभाव कमी होत नव्हता. कॉलेजातल्या बरोबरीच्या लेक्चरर्सना तो भेटत होता. तिच्या चारित्र्याबद्दल बरेवाईट कॉलेजमधे अगदी वॉचमनपासून, प्यून पासून सर्व लेक्चरर्सना सांगत होता. पण त्या सर्वांना ती कशी आहे हे माहित होते. बऱ्याचदा तिने त्याला हवेतर डिटेक्टिव्ह ठेव असे सांगितले होते. पण त्याचा क्रम कमी होत नव्हता. त्यातच त्यांना म्हाडाचा एक प्लॉट मिळाला. दोघांनी मिळून तिथे बंगला बांधायचे ठरले. प्लॉट त्याच्या नावावर होता. ती घरात आपला पगार खर्च करी. त्याने आपल्या पगारातून प्लॉटसाठी खर्च केला. कर्ज घेतले. ती सिवील इंजिनीयर तेव्हा बांधकामाचे देखरेखीचे काम तिने केले.

बंगला झाल्यावर सर्व तिकडे रहायला गेले. त्याची आईपण तिथे आली. परत सासू-सूनांचे खटके उडू लागले. तो आईचीच बाजू मानायचा. तिच्यावर मारहाणीचा प्रयत्न केला गेला. पण संसार तूटू न देण्याचा तिचा प्रयत्न होता. सर्व मानहानी सहन करत ती राहिली. त्याचे येणारे नातेवाईक त्यांचे ती सर्व करी पण परत त्यांच्याशी तिचे संबंध तो जोडू लागला. त्याचेच त्याच्या नातेवाईकांशी भांडणे होत होती. आईशीपण तिचे पटत नव्हते.

एक दिवस सासूने सून मारहाण करते म्हणून पोलिस कंप्लेंट केली. तरीही ती गप्प राहिली. आता तो तिला विचारत होता की तुला घटस्फोट हवा का? दोघांचे शारिरीक संबंध तर बऱ्याच वर्षांपासून नव्हते. मने पण वेगळी झाली होती. तिच्या माहेरच्यांनी घटस्फोटासाठी तिची समजुत घातली. ती तयार झाली पण त्यासाठी मुले तिच्यासोबत ठेवून त्याने तिला घर व मुलांचा खर्च द्यावा अशी तिची अपेक्षा होती.

भावाच्या लग्नासाठी ती माहेरी गेली. आठवड्याने परत आली तर तिच्या घरात त्याने तिला घेतले नाही. शेजारी चाळीतली भाड्याची खोली त्याने घेतली होती. त्यात तिने आणलेले सर्व सामान ठेवले होते. त्याच्यामते त्यांचा तो बंगला त्याने आईला दिला व आता ह्या भाड्याच्या घरात त्यांनी संसार करायचा. तिने बंगल्यात प्रवेश करण्यासाठी पोलिसांची मदत मागितली पण त्याने तो बंगला आईच्या नावावर केला होता व तिच्या मते आता मुलगा सून दोघांनाही ती त्या घरात घेण्यास तयार नव्हती. बंगल्यात रहायचे सोडून चाळीत रहाणे तिला पसंत नव्हते. ती आपल्या मामांकडे मुलासोबत राहू लागली.

मध्यंतरी नवऱ्यानेच घटस्फोटाचा दावा दाखल केला. तिची त्याला तयारी होतीच. पण आपल्या मागण्या पूर्ण झाल्यावरच ती घटस्फोट देणार होती. त्याच्यामते तो काही देणार नाही किंवा त्या भाड्याच्या घरात तिने रहावे. मुलांना त्याच्याकडे देऊन तिने आपले मुक्त जीवन व्यभिचारात जगावे. तो त्यासाठी तिला मोकळे करुन तिच्यावर उपकार करत होता. तिच्या मनाचा संताप चेहऱ्यावर दिसत होता पण ती मच्युअर्ड पद्धतीने आपल्या भावना हाताळत होती.

आपण शिकलो हा आपला गुन्हा! आपण स्त्री आहोत हाही आपलाच गुन्हा! आपण आई आहोत.. मुलांचे भले व्हावे अशी आपली इच्छा हा पण आपलाच गुन्हा! पुरुष असतो तर किती बरे झाले असते! नाहीतर शिकायला तरी नको होते. शिकलेली बायको म्हणून त्याच्या मनात भीती होती, ही आपल्याला वरचढ होईल का? बायकोचे शिक्षण मोकळ्या मनाने मान्य करणारे किती पुरुष आज पहायला मिळतात? स्त्रीने आपली जागा ओळखून आपल्या मर्यादेत रहावे हीच सर्वसाधारण पुरुषांची अपेक्षा किंबहुना आज्ञा असते. स्त्री-पुरुष समानता कागदावरच चांगली वाटते. प्रत्यक्षात ती येणे केवळ अशक्यच!

# सुभद्रा

मी सकाळी कामावर येतानाच सुभद्रा मला रस्त्यात भेटली. तिने मला तिच्या तारखेची आठवण करुन दिली. अर्थात माझ्या लक्षात होतेच. सुभद्रा अंदाजे २५ वर्षांची. लग्नाला फक्त ५ वर्षे झालेली. ती टेलिफोन निगम मध्ये कामाला आहे. दिसायला चारचौघींमध्ये उठून दिसणारी, गोरी व लांबसडक केस असलेली सुभद्रा पहाताक्षणीच कोणाच्याही नजरेत भरेल अशी. परंतु कोर्टातील दाव्यामुळे सदा भेदरलेली व डोळ्यात सदैव भीती की कुठून मनोहर तिला बघेल व कसले आरोप करेल यांची.

सुभद्राचा नवरा-मनोहर याने सुभद्रा विरुद्ध तिच्यापासून विभक्त होण्यासाठी दावा केलेला. त्याचे म्हणणे सुभद्रा त्याला मानसिक छळते व आता तो सुभद्राबरोबर रहाणे अशक्य असल्याने विभक्त होण्याचा प्रयत्न करतो आहे. मनोहरने कलम १३, हिंदु विवाह कायदा याखाली कौटुंबिक न्यायालयात दावा दाखल केला आहे.

दावा दाखल केल्यानंतर पहिल्या तारखेला दोन्ही व्यक्तींना (वादी व प्रतिवादी) समुपदेशकाकडे समुपदेशनासाठी पाठवण्यात येते. अशीच मनोहर सुभद्रा माझ्याकडे आली होती. मनोहरने दावा दाखल केल्याने तो वादी होता व आमच्या नियमाप्रमाणे मी प्रथम त्याच्याशी बोलायचे ठरवले.

मनोहर खोलीत आला तेव्हा अतिशय चिडलेला होता. ह्या कोर्टात कोणालाच काही कळत नाही व त्याचे कोणीच ऐकत नाही असा त्याच्या बोलण्याचा सूर होता. मी मनोहरला प्रथम शांतपणे बसायला सांगितले व त्याला पाच मिनिटांचा अवधी दिल्यावर त्याला जे काही सांगायचे आहे ते तो शांतपणे सांगू शकतो अशी मी त्याला सुचना दिली. एकदा बोलायला लागल्यावर मनोहरला काय व कुठून सांगू हे सुचेनासे झाले. कारण त्याला सुभद्राबरोबर असलेल्या भांडणातील/वादातील काहीच लपवून ठेवायचे नव्हते. ते सगळे मी ऐकावे असे त्याचे म्हणणे होते. सुरवातीला मनोहरचे बोलणे ऐकून घेण्यासाठी कमीतकमी दोन तास तरी लागतील याचा मला अंदाज आला व मी त्याला तसे स्पष्ट सांगितले की आपल्याकडे १ १/२ ते २ तास वेळ आहे त्यात तुला जे काही अगदी आवश्यक वाटत असेल तेवढे सांग व बाकीचे आपण परत वेळ ठरवून बोलू शकतो. हे माझे सांगणे मनोहरला पटले असे त्याच्या चेहऱ्यावरुन कळत होते. त्याचा चिडलेला स्वर व चेहरा हळूहळू शांत होत होता. त्याने त्याच्या वैवाहिक जीवनातील घटना सांगायला सुरुवात केली.

मनोहरच्या मते सुभद्रा त्याला कुठल्याच गोष्टीत साथ देत नव्हती. त्याचा जास्त भर शारिरीक सुखावर होता. सुभद्रा नेहमीच दमलेली असते म्हणून ती मला नाही म्हणते. त्याचा सुभद्रावर संशय होता. तो म्हणतो टेलिफोन निगममधे असल्याने तिच्या कामाच्या वेळा बदलतात व रात्रपाळी असताना तिचे दुसऱ्याशी संबंध असावेत अशी त्याची खात्री होती. आणखी दुसरी तक्रार म्हणजे सुभद्रा तिचे लांबसडक केस मुद्दाम मोकळे सोडते म्हणजे तिच्या सौंदर्यावर परपुरुष आकृष्ट होतात व त्यांची सलगी वाढते. त्याने सुभद्राला बरेचदा केस मोकळे सोडू नकोस असे सांगितले तरीही तिचे केस ओले राहिले तर डोके दुखते, त्रास होतो या कारणासाठी सुभद्रा ते कायम मोकळे सोडायची. सुभद्रा मुलांचे नीट संगोपन करत नाही असाही मनोहरचा दावा होता. त्याचे कारण मनोहरच्या मते, निष्काळजीपणाने मुलगा आजारी पडून गेला म्हणजे तिच्या स्वैर वर्तनाला सुभद्रा मोकळी होणार होती. सुभद्रा कामावरुन उशीरा आली त्याची कारणे न शोधता मनोहरला वाटे की ती तिच्या याराबरोबरच फिरुन आली असेल.

मनोहरचे म्हणणे की त्याचे मित्र जेव्हा घरी येतात तेव्हा त्यांना चहापाणी देतांना सुभद्रा मुद्दाम त्यांना हात लावते. त्यांची नजरानजर होते म्हणून त्याने मित्रांना घरी बोलावणेही सोडून दिले होते. सुभद्रा सासूसासऱ्यांशी कधीही नीट वागत नाही कारण तिला त्यांच्याशिवायच म्हणजे वेगळे रहायचे आहे व त्यानंतर तिला जाब विचारणारे कोणी नसेल. तिच्या स्वैरवर्तनाला मोकळीक मिळेल अशी मनोहरची खात्री पटली होती.

मनोहरचे बोलणे, तक्रारी ऐकून घेताना एक प्रकर्षाने जाणवले म्हणजे सुभद्राच्या चारित्र्यावरच मनोहरचे

जास्तीत जास्त आरोप होते व सुभद्राचे कुठलेही वागणे तो त्याच एका मापदंडाने मोजत होता. सुभद्राने दिलेल्या स्पष्टीकरणाचा कधीही विचारच करीत नव्हता. सुभद्राशी बोलताना लक्षात आले की मनोहरने जे सांगितले ते मुख्यत: त्याच्या संशयी स्वभावामुळे. सुभद्राने तर त्याच्या संशयी वृत्तीचा लग्नापासूनच धसका घेतला होता. लग्न झाल्या दिवसापासून मनोहरने सुभद्राला अजिबात कुठेही एकटे (ऑफिसव्यतिरिक्त) जाऊ दिले नव्हते. कोणाही पुरुषाबरोबर ती नुसते बोलली तरीही त्या दोघांचे संबंध असतील असे मनोहरला वाटायचे व तो तिला वाटेल ते बोलायचा. मनोहरने तर एकदा कहरच केला, "तू वेश्या आहेस म्हणून कुठल्याही पुरुषाबरोबर संबंध ठेवायला तुला लाज वाटत नाही पण मी एक घरंदाज पुरुष आहे तेव्हा माझ्या पत्नीने असे वागलेले मला चालणार नाही", ह्या शब्दात सुभद्राची निर्भत्सना केली होती. सुभद्राला जेव्हा आणखी प्रसंग विचारले तेव्हा ती म्हणाली की, कधी इस्त्रीचे कपडे आणणारा भैय्या, तर कधी भाजीवाला ह्या रोजच्या व्यवहारातील माणसांशी बोललेलेही मनोहरना खपत नव्हते. म्हणून सुभद्रा शक्यतो भाजीवाल्या बायांकडून भाजी घ्यायची म्हणजे तेवढे कारणही मनोहरला मिळायला नको. तिचे सासूसासरे त्यांचा मुलगा तिला त्रास देतो हे मानायलाच तयार नव्हते. त्यांचे म्हणणे, बायकोने नवऱ्याचे ऐकायचे नाही तर कोणाचे? आमचा मनोहर जे काही करतो ते बरोबरच आहे. सुभद्राच मुद्दाम आगीत तेल ओतते. मनोहर चिडका आहे तेव्हा सुभद्रानेच सांभाळायला हवे. त्यामुळे सुभद्राला सासरी कोणाचाच आधार नव्हता. मनोहर तिला क्षुल्लक कारणांवरुन मारायचा व तिला धमक्या देऊन पोलिस चौकीत घेऊन जायचा. घरी तिच्याकरवी जबरदस्तीने कुठल्याही कागदांवर सही घ्यायचा. सुभद्रा मुळातच भित्री होती याचा मनोहरने पुरेपुर फायदा घेतला होता. मनोहरचे वकीली शिक्षण पूर्ण झाल्याने तो सतत कायद्यावर बोट ठेवून तिला धमक्या देत असे, तिच्या भित्रेपणाचा त्याला फायदा मिळत असे.

दोघांचे म्हणणे ऐकून घेतले तेव्हा वरवर पहाता मनोहरचा संशय अगदी क्षुल्लक वाटतो. पण जेव्हा असा संशय वारंवार घेतला जातो तेव्हा त्याचा दुसऱ्या व्यक्तीला त्रास होतो. नीट विचार केल्यावर माझ्या लक्षात आले की दोष हा सुभद्रात नसून मनोहरमध्येच आहे. मनोहरला एक प्रकारची मानसिक विकृती आहे. त्याला मानसशास्त्रात पॅरानोयीआ (Paranoia) अथवा संभ्रम असे म्हणतात. अशा विकृतीमुळे त्या व्यक्तीत काही स्वभावदोष निर्माण होतात की ज्यामुळे दुसऱ्यावरील विश्वासाला तडा जातो, स्वार्थीपणा व मालकी हक्काची भावना वाढते. अशी व्यक्ती आपल्याच जोडीदाराच्या प्रत्येक हालचालीवर संशय घेते. अशा व्यक्तींना विकृत संशयाचा भ्रम सतत होत असतो. समोरच्या व्यक्तीला अथवा जोडीदाराला आरोपी समजून खऱ्याखोट्याची शहानिशा करीत असतो.

मनोहरच्या स्वभावाचे त्याने स्वत: सांगितलेल्या व सुभद्राने कथन केलेल्या घटनांवरुन जेव्हा विश्लेषण केले त्यावेळेस तो खरोखरीच एक मनोरुग्ण असावा याची जाणीव होते. यामुळे सुभद्राची त्याच्यापासून सुटका करणे अगदी आवश्यक आहे हे प्रकर्षाने जाणवते. परंतु सुभद्राचा स्वभाव लक्षात घेता, प्रथम तिला मनोहरच्या मानसिक अवस्थेची कल्पना देऊन मगच तिला विभक्त होण्याचा मार्ग सुचविणे आवश्यक आहे हेही जाणवले.

सुभद्राला पटवून देताना तिला हेच सांगितले की, मनोहर एक मनोरुग्ण आहे व त्याच्याबरोबर संसार करणे तिला फार त्रासाचे होईल. तिच्या आजपर्यंतच्या अनुभवाने तिलाही ते पटले व ती मनोहरशी घटस्फोट घ्यायला तयार झाली. दुसरीकडे मनोहरला त्याचे वर्चस्व सिद्ध न करु देता समजुतीने घटस्फोट घेण्यास तयार करणे चालूच होते.

मनोहरला स्वत:ला काही विकृती आहे हे पटतच नव्हते. अर्थात अशा मनोरुग्णांना स्वत:ला ते पटणे शक्यही नसते कारण त्या व्यक्ती मुळातच संभ्रमावस्थेत असतात. त्यामुळे मनोहरच्या कलाने घेऊन त्याला घटस्फोटाला प्रवृत्त करणेच तसे कठीण काम होते व इथेच समुपदेशकाला त्याचे कसब वापरायचे होते. मनोहर सुभद्राला नांदवायला नेण्यास तयार होता. पण त्याचे म्हणणे, सुभद्राने ताबडतोब त्याच्या अटी मान्य करुनच नांदायला यावे. सुभद्रातर इतकी घाबरलेली होती की त्या दोघांना एकत्र बोलायला सांगितले तरी सुरुवातीला तिची तयारी नव्हती, मग नांदायला जाणे तर दूरच राहिले.

मनोहरला त्याच्या मुलाला भेटायचे होते परंतु सुभद्रा ते मान्यच करत नव्हती. मी तिला ह्या भेटीचे महत्त्व पटवून दिले. मुलगा व वडिलांमधे काही भांडण नाही तेव्हा त्या दोघांनी भेटणे तिच्या मुलाच्या सर्वांगिण

विकासाकरीता आवश्यक आहे हे सुभद्राला समजावून दिल्यावर तिने मुलाला भेटण्यासाठी संमती दिली. त्यांचा मुलगा संजय तीन वर्षांचा होता. सुभद्रा विरारला व मनोहर गिरगावात रहात असल्याने त्यांच्या मुलाला मनोहरच्या भेटीसाठी इतक्या लांब तेही गर्दीच्या वेळेत गाडीतून आणणे शक्य नव्हते. एकट्या मनोहरला तिच्या घरी जाण्यास परवानगी देणेही योग्य नव्हते, त्यामुळे कोर्टात जे लहान मुलांचे संकुल आहे, ज्याठिकाणी मुले त्यांच्या जवळ नसलेल्या पालकांना व पालक मुलांना भेटू शकतात त्या ठिकाणी भेटण्याचे ठरविले. संजयला घेऊन सुभद्रा महिन्यातून दोन शनिवारी दुपारी येईल व मनोहर त्याला भेटेल. त्याचप्रमाणे वेळ संपली की सुभद्रा मुलाला परत नेईल अशा आशयाचा कागद तयार करुन त्यावर मनोहर व सुभद्राच्या सह्या घेऊन तो कोर्टाला माहितीकरीता पाठवला.

संजयच्या वडिलांबरोबरच्या भेटी अशारितीने सुरु झाल्या. सुभद्रा अगदी ठरलेल्या वेळी थोडी आधीच हजर असायची. परंतु मनोहर मात्र कधीही वेळेवर येत नसे. मनोहरला वेळेचे महत्त्व व लहान मुलाला ताटकळत ठेवल्याने होणारा त्रास याची जाणीव दिल्यावर तो वेळेवर यायला लागला. एवढ्यात दिवाळी आली. मनोहरच्या मनात मुलाला ८ दिवस तरी घरी न्यायचे होते. तसा त्याने कोर्टाकडे अर्जही दिला. आतापर्यंत बापलेकांच्या झालेल्या भेटींतून आमच्या निदर्शनास आले होते की दोघेही एकमेकांशी व्यवस्थित व मिळून मिसळून वागतात. त्यामुळे कोर्टाने मनोहरला ३ दिवसांकरिता घरी घेऊन जाण्याची परवानगी दिली. त्यावेळेस परत सुभद्राला मानसिक आधाराची गरज होती. संजयला एकट्याला तीन दिवस वडिलांकडे पाठवणे तिला एक संकटच वाटत होते. परंतु सुरुवातीची दुबळी सुभद्रा आता राहिली नसल्याने याही प्रसंगी तिने धीर धरला व मूक संमती दिली.

आम्ही, म्हणजे मी, मनोहर व सुभद्रा महिन्यातून एकदा तरी एकत्र भेटत होतो. त्यांच्या भेटी मुलाबरोबर व मग माझ्याबरोबर अशा असत. यातून सुभद्रा हळूहळू सामोपचाराने घटस्फोट घ्यायला तयार होत होती. परंतु मनोहर मात्र मुलाचा ताबा सोडायला तयार नव्हता. त्याचा ताबा मिळविण्याकरीता वेगळा अर्जही कोर्टात केला होता. मनोहरची संशयी वृत्ती व मानसिक संतुलन मात्र दिवसेंदिवस बिघडतच जात होते. संजयबरोबरच्या भेटी कोर्टाच्या आवारात व्यवस्थित सुरु होत्या. काही महिन्यांनी मनोहरच्या नोकरीमुळे त्याला ठरल्यावेळी कोर्टात नियमित भेटायला यायला जमेनासे झाले. मनोहरची मानसिक विकृती लक्षात घेता त्याला बाहेर भेटण्याची परवानगी कोर्ट देवू शकत नव्हते.

कोर्टातील भेटी हळूहळू कमी होत होत्या. मनोहरही सामोपचाराने घटस्फोट घ्यायला तयार होत होता पण मुलाचा ताबा मिळावा ही इच्छा झाली की लगेच तो घटस्फोटाला तयार नसायचा. परत मनोहरशी एकदा एकटी बोलले. त्यावेळेस नोकरीतील वाढती जबाबदारी, घरी असलेले त्याचे वृद्ध आईवडिल यांची जाणीव देवून ४ वर्षांच्या संजयला सांभाळणे किती कठीण होईल याची जाणीव दिली. नंतर त्याने संजयचा ताबा मिळवण्याचा हट्ट सोडला व अर्जही मागे घेतला. त्याचप्रमाणे संमतीने घटस्फोटाच्या दाव्यावर दोघांनी सही करुन घटस्फोटाला मान्यता दिली.

मनोहर व सुभद्रा यांनी शेवटी संमतीने वेगळे व्हायचे ठरविले. संजय तसा लहानच होता व त्याला सध्यातरी आईची जास्त गरज आहे हे पटल्यामुळे संजयचा ताबा सुभद्राकडेच राहू देण्यासही संमती दिली. परस्पर संमतीने वेगळे होण्याच्या कागदांवर दोघांच्या सह्या झाल्या. सुभद्रा स्वत: नोकरी करत असल्याने तिला पोटगी नको होती. परंतु दरमहा ५०० रुपये मनोहरने मुलासाठी देण्याचे ठरवले. हे पैसे मनोहर परस्पर बँकेत भरणार असे ठरले. बँकेत सुभद्रा व संजय यांच्या नावे एकत्र खाते उघडून तो नंबर कोर्टाला सुनावणीच्या वेळी माहितीकरिता देण्यात आला.

अशातऱ्हेने सुभद्राची दोन वर्षांच्या कालखंडात सुटका झाली. तरी कुठेतरी मनात आल्यावाचून रहातच नाही की, सुभद्रा शिकलेली, नोकरी करणारी असूनही तिची त्रास सहन करुन एकत्र रहाण्याची तयारी होती. म्हणजेच अजूनही स्त्रिया पतीलाच सर्वस्व मानून जगतात व त्यांचे स्वत:चे मत अथवा व्यक्तिमत्त्व असू शकते हे मानायलाही तयार नसतात. सुभद्राला सुरुवातीपासून तिच्या आईवडिलांचा, भावांचा पाठींबा होता तरीही समाज काय म्हणेल व आपण पुढे एकटे राहू शकू का? या भीतीपोटी तिची वेगळे होण्याची तयारी नव्हती.

सुभद्रा वेगळे होऊन आज बराच काळ लोटला आहे. कालपरवाच ती मला भेटून गेली. फार खुशीत होती.

तिचे व संजयचे एक वेगळे विश्व तिने तिच्या आईवडिलांच्या मदतीने तयार केले होते. मुलगाही शाळेत व इतर खेळांत व्यवस्थित प्रगती करत होता. अधूनमधून मनोहर मुलाला भेटून जात होता. त्यांच्यात विशेष आपुलकी मात्र निर्माण झाली नव्हती. पण एकमेकांमध्ये द्वेषही नव्हता. सुभद्राची नोकरी व संजयची शाळा अगदी व्यवस्थित चालू होते. म्हणूनच मनात येते, अशा सुभद्रा आपल्या समाजात बऱ्याच असतील, त्यांनी स्वत:च खंबीर होऊन पुढे यायला हवे व स्वत:चे निर्णय स्वत: घ्यायला हवेत.

# सुदैव

'डॉक्टर, ह्यांना बरे वाटेल ना? ते पूर्ण बरे होतील ना?' ती हा प्रश्न दरखेपेस विचारायची. आपल्या आजारी नवऱ्याला नियमितपणे हॉस्पिटलमधे घेऊन यायची.

त्यांच्या लग्नाला अवघे ९-१० महिने झाले होते. घरी सासू, सासरे, दीर, नणंद सर्व होते. सर्व तसे सुशिक्षित. नवरापण एका कंपनीत टायपिस्टचे काम करत होता. लग्नाची नवी नवलाई अजून संपायची होती. तोच तिच्या मागे ही चिंता लागली होती. तिच्या नवऱ्याला कातडीचा कॅन्सर होता. डॉक्टरांच्या मते तो बरा होऊ शकणार होता. 'गुड प्रोग्नोसिस' असे त्यांचे म्हणणे होते. पण तरी तिला मनातून सारखी भीती वाटत होती. ती त्याची खूप काळजी घेत होती. अगदी नियमितपणे औषधे देत होती. डॉक्टर सांगतील तेव्हा हॉस्पिटलमधे न चुकता येत होती. घरच्या सर्वांना धीर देत होती. घरचे पण विचारात पडले, आताच तुमचे लग्न झाले आणि हे काय होऊन बसले? बाहेरुन ती फार धिटाईने वागत असली तरी मनातल्या मनात फार गंभीरपणे विचार करत होती. काय करु म्हणजे हे सर्व टळेल? ह्या देवाला नवस बोलू की त्या देवाला? पण मनात एक विचार मात्र नक्की होता की, "मी ह्यांची सेवा करणारच, त्यांना त्यातून बरे करायचेच."

तिला भेटायला तिच्या मैत्रिणी येत. माहेरची माणसे येत. आपुलकीने चौकशी करत. एकदोघांनी तर तिला चक्क सल्ला दिला, 'तुझे नुकतेच लग्न झालेय, तू अजून लहान आहेस. माहेरी परत जा. दुसरे लग्न कर.' त्यांना तिने उडवून लावले. त्याकडे संपूर्ण दुर्लक्ष केले.

नवऱ्याची पगारी रजा संपत आली होती. तसे घरी दीर, सासरे कमावत होते पण तरीही तिच्या मनात यायचे की आता मला नोकरी शोधायला हवी. पूर्वी ती नोकरी करत होती. पण लग्नानंतर नवऱ्यानेच तिला ती नोकरी सोडायला लावली. 'मी आहे ना. मग तू कशाला धावपळ करतेस.' असे त्याचे म्हणणे. पण आता परत नोकरी शोधायची म्हणजे कठीणच होते. त्यातून नवऱ्याकडे लक्ष देणे, नोकरी सांभाळून सर्व करता येईल का? शिवाय तिने नोकरी केली तर त्याला आवडेल का? असा विचार ती करत होती. डॉक्टरांच्या मते तिचा नवरा परत कामावर जाऊ शकणार होता. तेव्हा तिने नोकरीचा विचार तात्पुरता बाजूला सारला.

आज तिचा नवरा माझ्याकडे आला होता. एक-दोन दिवसांपासून तो कामावर जाऊ लागला होता. आपल्या पत्नीबाबत बरेचसे सांगत होता. तिला बराच त्रास झाला होता. घरच्यांनी तसे उघडपणे बोलून दाखवले नसले तरी 'तिचा पायगुणच वाईट ठरला' असे कुठेतरी त्यांच्या मनात आले होते. त्याला त्यांचे म्हणणे खटकत होते. तसे ते सुशिक्षित त्यामुळे तिला काही त्यांनी मारहाण केली नव्हती की उघडपणे तसे काही बोलले नव्हते. पण त्याला हे सर्व जाणवत होते. माझ्याकडे हे सर्व तो सांगत होता. त्याचे म्हणणे होते की तो कदाचित बरा होईलही आणि झाला तर त्याचे श्रेय डॉक्टरांइतकेच त्याच्या बायकोला जाईल. पण यदा कदाचित वाचलो नाही तर तिचे कसे होईल? घरचे तिला मदत करतीलच अशी त्याला खात्री नव्हती. 'मी स्वत: तिला होती ती नोकरी सोडून द्यायला लावली. आता खूप पश्चाताप होतोय. तिला आता मिळेल काहो नवीन नोकरी?' मी काय करु म्हणजे माझ्यानंतर तिला त्रास होणार नाही. एकदा घटस्फोटाबाबत तिला त्याने विचारले होते पण त्यावर उलट ती खूप चिडली होती. तेव्हा ते तर शक्य नाही. 'मी काय करु?' तो मला हे विचारत होता.

एक खरं की आपण मोठ्या प्रमाणात बघतो की बायका आपल्या नवऱ्याला काहीही झालं तरी जीव पाखडून त्याची सेवा करतात. पण हेच जर उलट असले तर? नवरे आपल्या बायकांसाठी किती झिजतात? बरेचसे असे पुरुष बघण्यात येतात की बायकोला काही मोठा आजार झाला की तिला सोडुन देतात आणि खुशाल दुसरे लग्न करतात. पण असे नेहमी होत नसावे. कारण हा माणूस माझ्यापुढे बसला होता तो आपल्या स्वत:च्या आजारापेक्षाही अपल्या बायकोची जास्त काळजी करत होता.

त्याचे उपचार चालू होते. सुदैवाने तो लवकरच बरा झाला. बायकोने त्या काळात त्याची काळजी घेतली व धीर दिला. आपण तिला खूप त्रास दिला अशी भावना त्याच्या मनात येत होती. पण हेच उलट झाले असते तर? तेव्हा पुढचे आयुष्य सुखासमाधानात घालवणे आता दोघांनाही शक्य होते. ह्याचा आनंद मानून पुढे जायचे दोघांनीही ठरवले.

# परिणती

घटस्फोट म्हणजे काहीही म्हंटल तरी दु:खाचीच बाब. आपले लग्न कोणी आनंदाने मोडत नाही. अगदीच काही पर्याय नसला तरच माणूस लग्न मोडण्याचा विचार करतो. घटस्फोटाच्या कागदपत्रांवर सही करतांना सही करणाऱ्याची मनस्थिती ही वेगवेगळया स्वरुपाची असते. कोणी अगदी सहजतेने सही करुन मोकळे होते तर कोणी पेन हातात धरुन विचार करण्यात मग्न असते तर कोणाच्या डोळ्यात पाणी आल्याशिवाय राहत नाही. कोर्टाची पायरी कोणी धीटपणे, खंबीरपणे चढतं, कोणी भीतभीतच चढतं. व्यक्ती तितक्या प्रवृत्ती.

सुगंधाने घटस्फोटचा दावा दाखल केला होता. सुगंधा तशी खंबीरपणे वावरत होती. कोर्टात येण्याची तिला भीती वाटत नव्हती. आपला संसार मोडलाय हे ती पूर्णपणे जाणून होती. किंबहुना लवकारात लवकर त्यावर शिक्कामोर्तब व्हावे अशी तिची इच्छा होती. तिचा नवरा सुरेश इंजिनियर-गोरापान दिसायला चांगला, एका कंपनीत मोठ्या हुद्द्यावर चार आकडी पगार घेणारा. ती स्वत: एका बँकेत नोकरी करते. दोघेही शिकलेले-उच्च पदवीधर, चांगल्या नोकरीवर व चांगला पगार कमावणारे. उच्चमध्यमवर्गीयांत त्यांची गणती करता येईल असे हे कुटुंब, त्यांना दोन मुली-दोघीही आईकडेच असतात.

सुगंधा ही वडिलांची एकुलती एक कन्या. तिला ना भाऊ ना बहिण. वडिल वयस्कर आता निवृत्त होऊन घरीच असतात. मुंबईत एका उपनगरात त्यांचा ब्लॉक आहे. सुगंधा सध्या वडिलांकडेच रहाते. मुली आशा व नंदा शाळेत शिकताहेत. सुरेशचा ब्लॉकपण सुगंधाच्या माहेरापासून जवळच आहे. सध्या तो एकटा रहातो. त्याचे आईवडिल गावी असतात. तो पण त्यांचा एकुलता एक पुत्र.

सुगंधाचे शिक्षण झाले व लगेच तिला एका बँकेत नोकरी मिळाली. बँकेच्या परीक्षा देत देत ती ऑफिसर झाली. सुरेशशी तिचे लग्न अगदी पाहून वगैरे पद्धतीने ठरले. लग्न ठरल्यावर दोघे खूपदा भेटत होते. अगदी बाहेरगावीपण फिरुन येत असत. लग्न अगदी थाटामाटात झाले.

दोघांचा संसार सुरु झाला. दोघे सकाळी कामावर जात, रात्रीच परत येत. कुरकुर करायला एकच कारण घडायचे ते म्हणजे खर्च! सुरेशचे म्हणणे की खर्च अगदी मोजूनमापून करावा तर सुगंधाला वाटे की घरात सर्व सुखसोयी करुन घ्याव्यात. दोघेही कमावणार मग घरात सर्वकाही नको का? सुगंधा आपल्या पगारातून सर्व आणायला तयार होती पण परत एकदा तिला वाटे की सुरेशनेपण खर्चाला हातभार लावला पाहिजे. ह्यावरुन दोघांचे रोज वादविवाद होत.

सुगंधाला दिवस गेले. पहिले बाळंतपण माहेरीच करायचे ठरले. सुरेशच्या मते त्याचा खर्च वाचणार होता. सुगंधा बाळंतपणासाठी सातव्या महिन्यातच माहेरी रहायला गेली. ती रोजच्या भांडणांना कंटाळत होती. सुरेश अधूनमधून तिला भेटायला येत असे. सुगंधाला मुलगी झाली. दोघांनाही आनंद झाला. बाळंतपणानंतरही सुगंधा लवकर सासरी गेली नाही. ६-८ महिने आईकडेच राहिली. नंतर कामावर रुजू झाली. दिवसभर तिची आई मुलीला सांभाळत होती. परत पूर्वीसारखेच खर्चावरुन खटके उडत होते. आतातर पूर्वीपेक्षा खर्च वाढला होता. सुरेशने मध्यंतरीच्या काळात डिपार्टमेंटच्या परीक्षा दिल्या व त्याला प्रमोशन मिळाले. पगारातही बरीच वाढ झाली होती. पण त्याची विचारसरणी पूर्वीसारखीच होती. तो खूप कंजूष होता व पैसे साठवण्यात त्याला खूप समाधान वाटत होते. एका वर्षाने परत सुगंधाला दिवस राहिले. आता दुसऱ्या बाळंतपणाचा खर्च सुरेशला करायला लावाला असे तिला वाटे. पण सुरेशच्या मते तिचा सर्व खर्च तिला बँककडून मिळेलच तेव्हा त्याच्याकडून तिने अपेक्षा का करावी? ह्या भांडणतंट्यापेक्षा माहेरीच जावे असा तिने विचार केला. दुसरे बाळंतपणसुद्धा माहेरीच केले.

आता त्यांची भांडणे वाढत जात होती. दोन्ही मुलींसाठी सुरेश कधी हौशीने खाऊ किंवा खेळणी आणत नसे याचा सुगंधाला राग यायचा. ती स्वत: मग विकत आणायची पण त्यावरही सुरेशची नाराजी असायचीच. सुरेश थोडा

जास्तच रागीट होता. आता सुगंधावर तो कधी कधी हात उगारत असे. मुली मोठ्या होत होत्या. त्यांच्या समोर सुगंधाचा अपमान केलेला तिला आवडत नसे.

सुरेशच्या वागणूकीत खूपच बदल होत होता. घरात त्याचे हवे तसे लक्ष नसायचे. उलट नको तिथेच तो लक्ष घालत असे. काहीतरी कारण काढून मारहाण करायचा. एकेदिवशी सुगंधाला तिचा बालमित्र भेटला. मध्यंतरी काही वर्षे तो परगावी गेला होता. आता परत मुंबईत आला होता. दोघांच्या खूप गप्पा झाल्या. खरंतर लग्नापूर्वी सुगंधा व त्याची खूप मैत्री होती. पण परजातीचा म्हणून सुगंधाच्या आईवडिलांना तो पसंत नव्हता. सुगंधाला आईवडिलांच्या मर्जीविरुद्ध काही करायचे नव्हते. नंतर तो बाहेरगावी गेला व त्यांचे संबंध संपले. आता अचानकपणे दोघांची गाठभेट झाली. जुन्या आठवणींना उजाळा मिळाला.

सुरेश एका बाईच्या प्रेमात पडला होता. त्यांच्याच ऑफिसातली ती क्लार्क. नेहमी बरोबर असत. हसत-खेळत त्यांचे संबंध वाढत होते. सुगंधाच्या कानावर हे आले होते. पण ती गप्पच होती. तिचा बालमित्र अविनाश वरचेवर तिला भेटायला यायचा. घरी सुरेशचा पत्ता नसायचा. दोघांना मोकळीक मिळायची. अविनाश आशा नंदाला फिरायला घेऊन जायचा. खाऊ खेळणी आणायचा. दोघींचे तो खूप लाड करायचा. त्यामुळे दोघींना तो फार आवडायचा. सुट्टीच्या दिवशीपण सुरेश बाहेर असे. सुगंधा मग मुलींना घेऊन अविनाशच्या गाडीतून बाहेर फिरायला जायची. हळूहळू सुगंधाला अविनाशबद्दल जवळीक वाटू लागली. ती मनातल्या मनात सुरेश व अविनाशची तुलना करीत असे. अविनाशबरोबर जसे हसावे-बोलावे वाटे तसे सुरेशबरोबर वाटत नव्हते.

सुरेशच्या जेव्हा हे लक्षात आले तेव्हा मात्र त्याचा पारा चढला. तो खूप संतापला. खूप बडबड केली व सुगंधाला खूप मारहाण सुरु केली. आशा नंदा खूप गांगरुन गेल्या. त्या आईला वाचवण्याचा प्रयत्न करत होत्या. पण सुरेश खूपच संतापला होता. त्याचा स्वत:वरचा ताबा सुटला होता. रात्र कशीतरी काढून सुगंधा सकाळी आपल्या मुलींना घेऊन माहेरी आली. सुगंधाच्या आईवडिलांना जेव्हा झाला प्रकार समजता तेव्हा ते पण खूप रागावले. जावयाला जाऊन भेटले व त्याला खूप सुनावले. पण परिणाम काहीच झाला नाही. सुगंधा दुपारच्या वेळेस जाऊन आपले सर्व सामान घेऊन आली. त्याचवेळी तिने सुरेशला मनातून काढून टाकले. अविनाशने तिला आधार दिला. दोघे भेटत होते. मैत्री वाढत होती. अविनाश अविवाहित होता. दोघांनी ठरवून मग सुगंधाने घटस्फोटाचा दावा दाखल केला. सुगंधाच्या दाव्याला प्रतिउत्तर म्हणून तिने नांदण्यास परत यावे अशा आशयाचा दावा दाखल केला. दोन्ही खटले कोर्टात चालू होते. मध्यंतरीच्या काळात मुलींना भेटावयास परवानगी मिळावी असा सुरेशने अर्ज केला.

दिवसेंदिवस सुरेश मनाने खचत होता. त्याची ज्या बाईबरोबर मैत्री होती ती बाहेरगावी निघून गेली होती. तिने त्याच्याशी संबंध तोडले होते. घरात तो एकटाच रहात होता. कपडे नेहमी मळलेले असत. बाहेरच जेवत असे. सुगंधा व मुलींची त्याला प्रकर्षाने आठवण येत होती.

वडिल या नात्याने त्याचे मुलींना भेटणे रास्त होते. कोर्टात त्यांची भेट घालून देण्याची ऑर्डर करण्यात आली. ठरलेल्या तारखेला सुगंधा एकटीच आली. दोन्ही मुली आजारी असल्याचे डॉक्टरचे सर्टिफिकेट तिने कोर्टात दाखवले. मुलींना आणण्याचे ती टाळत होती. शिवाय मुलीपण वडिलांना भेटावयास तयार नव्हत्या. मी कोर्टाची तारीख नसतांना दोन्ही मुलींना बोलावून घेतले. दोघींशी बोलले. त्यांना वडिलांबद्दल राग होता. 'आपल्या आईला मारणारा हा मनुष्य आमचा कोणी लागत नाही.' असे त्यांचे म्हणणे होते. खूप प्रकारे समजूत काढून शेवटी दोघी वडिलांना एकदातरी भेटायला तयार झाल्या. पुढच्या तारखेला दोघी आल्या. आज सुरेश मात्र खूप उशिरा आला. त्याने दोघींसाठी काही खाऊ वगैरेपण आणला नव्हता. त्याने दोघींशी बोलायला सुरुवात केली. दोघी एकमेकींना चिकटून वडिलांपासून लांबच बसल्या होत्या. मानेनेच होकार-नकार देत होत्या. मीच मधूनमधून प्रश्न विचारुन संभाषण चालू ठेवण्याचा प्रयत्न करत होते. कोर्टाची अवन्या करायची नाही म्हणून चारवेळा दोघी हुकुमाप्रमाणे कोर्टात आल्या. पण आतामात्र ह्यापुढे येण्याचे त्या नाकारत होत्या. न्यायाधिशांना भेटायला त्या तयार होत्या. 'आपल्यावर कोणीच जबरदस्ती करु नका' असे त्या सांगत होत्या.

कोर्टाबाहेर बागेत जर गाठभेट घालून दिली तर कदाचित जास्त योग्य ठरेल असे वाटून एका सुट्टीच्या दिवशी मी दोघींना घेऊन घराजवळच्या बागेत जावे असा कोर्टाने हुकुम दिला. सुरेश दोघींना बागेत भेटणार होता. दोघी माझ्याबरोबर आल्या पण माझा हात घट्ट धरुनच मला चिकटून बसल्या होत्या. अशा ह्या बागेतल्या भेटी काही दिवस चालू होत्या. काही निष्पन्न होत नव्हते. आता दोघींची वये वाढली होती. आशा १६ वर्षांची तर नंदा १५ वर्षांची. दोघींना आपला विचार करण्याची कुवत होती. आशाने तर कोर्टातच सांगितले होते की ती मोठी होऊन वकीली परीक्षा देणार व न्यायाधिश होणार. तिला न्यायाधिश व्हायचे होते ते सर्व पुरुषांना शिक्षा सुनावता यावी ह्यासाठी. 'पुरुष' जातीवर तिचा खूप राग होता. नवरा हा खूप वाईट प्राणी असतो. मित्र ठीक पण नवरा नको. तिला लग्नच करायचे नव्हते. तिची ही विचारसरणी हळूहळू पक्की बनत होती.

सुरेश संमतीने घटस्फोट द्यायला तयार नव्हता. तर सुगंधाला सुरेशबरोबर रहायचे नव्हते. दोघांचे दावे खरे-खोटे करायच्या टप्प्यातून जात होते. सुरेशला मुली भेटावयास येत नव्हत्या. तो कोर्टाच्या चकरा मारत होता.
खटला चालला व निकाल देण्यात आला. सुरेशचा दावा फेटाळण्यात आला तर सुगंधाच्या दाव्यावरुन घटस्फोटाचा निर्णय देण्यात आला. दोघांचे कागदोपत्री असलेले वैवाहिक जीवन संपुष्टात आले. सुगंधाला आज सुटल्यासारखे वाटत होते.

आशा-नंदा दोघी शिकत होत्या. दोघी आईबरोबर रहात होत्या. 'बाबांच्या कचाट्यातून आईची सुटका झाली' असे आशाला वाटत होते. लग्नसंस्थेवर तिचा विश्वास नव्हता. नवरा हा बायकोला हक्काचे त्रास देण्याचे साधन मानतो असे तिचे ठाम मत होते. तिच्यामते आईचे काही चुकले नव्हते. बाबाच दोषी होते. आईला त्याची शिक्षा मात्र विनाकारणच भोगावी लागली होती. ती स्वत: लग्न करणारच नाही असे म्हणत होती. आजच्या ह्या उमलत्या कळीचे हे विचार. तिचे बरेच समज-गैरसमज बदलणे जरुरीचे होते.

# निराधार

दुपारची वेळ, नुकताच लंचटाईम संपलेला होता. आज तशी आमच्या विभागात फारशी गर्दी नव्हती. इतक्यात एक बाई आत आली. खूप काळजीत असल्यासारखा तिचा चेहरा दिसत होता. डोक्यावर मणाचं ओझं असल्यासारखी ती दिसत होती.

तिच्या हातात आमच्या हॉस्पिटलचे पेपर्स होते. त्यावर तिचे नाव - सुलोचना कदम, वय ५० वर्षे, पत्ता मुंबईतला होता. गेले काही महिने ती उपचारांसाठी येत होती. आमच्या विभागातर्फे तिच्या औषधांच्या खर्चाची सोय केली जात होती.

सुलोचनाचा नवरा काही वर्षांपूर्वी अपघातात वारला. तिला एक मुलगा व एक मुलगी. दोघेही लग्न करुन त्यांच्या संसारात मग्न होती. सध्या सुलोचना मुलीकडे रहाते. "जावई चांगला आहे म्हणून मी रहाते." सुलोचना सांगत होती. "मुलीच्या घरी रहायला कोणाला आवडेल? पण काय करु? पोटचा मुलगा विचारत नाही तो बायकोचे ऐकतो. माझ्या आजाराला तो कंटाळला. मी आता घरात काही काम करु शकत नाही म्हणून त्याला माझी अडचण वाटते. आता औषधांचा खर्च तुम्ही पुरवता म्हणून बरे. पण रहायचे कुठे हा माझ्यासमोर प्रश्न आहे."

सुलोचनाला मुलाने घरात राहू नको असे सांगितले. म्हणून ती मुलीकडे गेली. मुलगी चांगली आहे, जावई समजूतदार आहे. पण तिच्याकडे तरी किती दिवस रहायचे? शिवाय तिच्या आजारपणामुळे तिला दुखते तेव्हा तिच्या कण्हण्याचा त्रास घरात सर्वांना होतो हे तिला आवडत नाही. आपल्या पायी इतरांना त्रास होऊ नये म्हणून तिला दुसरीकडे रहायची सोय करुन हवी होती.

सुलोचनाचा आजार शेवटच्या टप्प्यापर्यंत पोहचला होता. आता ती बरी होण्याची शक्यता नव्हती. पण दुखण्यावर सध्या औषधे चालू होती. आजारी माणसाला औषधांबरोबर घरच्यांचे प्रेम, काळजी घेणे ह्याची गरज असते. आपण एकटे नाही, आपली काळजी घेणारी माणसे आजूबाजूला आहेत ह्याची जाणीव झाली की आजाराला सामोरी जायला बळ येतं व आजारही लवकर बरा होतो. सुलोचनाला आता एकटेपण जाणवत होते. मुलगा लक्ष द्यायला तयार नव्हता. मुलीकडून मदत घेत रहाण्याची तिची तयारी नव्हती. नवरा अपघातात गेल्यामुळे तिचा संसार अचानकपणे उद्ध्वस्त झाला होता. आता ह्या आजारपणापुढे डॉक्टरांनी हात टेकले होते. आता जे काही आयुष्य राहिले आहे ते कुठे घालवायचे हा तिच्यापुढे प्रश्न होता.

मी तिच्या मुलाला बोलावून त्याच्याशी बोलणे केले. त्याच्या म्हणण्याप्रमाणे तो एका चाळीतल्या घरात रहातो. बाहेर कॉमन बाल्कनी व आत एकच खोली त्यातच पडदा लावून स्वयंपाकघर केलेले. त्याच्या आईचे एकतर त्याच्या बायकोशी पटत नाही शिवाय दिवसभर किंवा रात्री अपरात्री तिला जेव्हा दुखते तेव्हा तिच्या आवाजाचा त्रास चाळीत सर्वांनाच होतो. शेजारी पाजारी लोक कंटाळतात. त्यामुळे त्याने तिला बहिणीकडे जायला सांगितले. बहिणीचा ब्लॉक आहे. एक स्वतंत्र खोली तिच्यासाठी देता येते. तो बहिणीकडे पैसे द्यायला तयार आहे. पण तिचाच हट्ट की मुलीकडे रहायचे नाही. त्याचीपण कुचंबणा होतेच. बहिण-जावई सुलोचनाला ठेवून घ्यायला तयार आहेत.

सुलोचनाची समजूत काढण्याचा सर्वांनी प्रयत्न केला. पण व्यर्थ. तिची आश्रमात रहाण्याची इच्छा होती. कॅन्सर अशा शेवटच्या टप्प्यावर गेलेल्या आजाऱ्यांसाठी मुंबईत एक आश्रम आहे. तेथे तिची व्यवस्था करुन देण्याचे ठरले.

उभ्या आयुष्यात घरासाठी त्रास सहन केला व शेवटी बेघर व्हायची पाळी सुलोचनावर यावी ह्याचे वाईट वाटले.

# हे टाळता आले असते का?

'बाई, तुम्ही इथुन उडी मारायला सांगितलीत तरी मी मारेन पण घटस्फोट, छे! नावच काढू नका. मी अजिबात कबूल करणार नाही.' सुनयना आली तीच मुळी घाबरलेली, बावरलेली. सुनयना सधारण २४-२५ वर्षांची देखणी, नावाप्रमाणेच लक्ष वेधून घेतील असे तिचे डोळे. परंतु त्यात भाव मात्र भित्र्या सशाचे.

सुनयना नाव म्हणालीस न! बस जरा शांतपणे. लगेच आपल्याला कसलाही निर्णय घ्यायचा नाहीए. तू तुझी अडचण काय ते सांग. मग आपण त्यावर तोडगा काय निघतो ते बघूया. सुनयनाच्या पतीने सुरेशने आज कोर्टात दावा दाखल केला होता. त्याने घटस्फोट मागताना सुनयनाचे अनैतिक संबंध आहेत असा तिच्यावर आरोप केला होता. सुरेशने दावा केल्याने खरं म्हणजे त्याच्याशीच प्रथम मला बोलायचे होते परंतु सुनयनाची स्थिती लक्षात घेतल्यावर सुरेशला बाहेर बसायला सांगून सुनयनाशी प्रथम संवाद साधायचे ठरले.

सुनयना एवढी घाबरलेली होती की सुशिक्षित असूनही नक्की त्या दोघांत काय घडले हे सांगायला ती गोंधळत होती व तिच्या संपूर्ण बोलण्याचा निष्कर्ष काढल्यावर लक्षात आले की सुनयनाला लहानपणापासून भरपूर मित्रमैत्रिणी जमवायची आवड होती. मैत्रिणींनी घेऊन एकत्र फिरायला जाणे, नाटक सिनेमा बघणे, एकमेकांना भेटवस्तू देणे सतत सुरु असायचे. तिच्या आईवडिलांनी यात कधी लक्ष घातले नाही वा तिला कधी अडविले नाही. हेच वागणे तिने लग्नानंतरही चालू ठेवले. तिच्या अल्लडपणामुळे म्हणा किंवा जाणूनबुजून यातले तिने सुरेशला काही सांगितले नाही.

सुरेश-सुनयनाचे लग्न ३ वर्षांपूर्वी अगदी थाटामाटाने झाले. दोन्ही घराणी अगदी तोलामोलाची होती. दोघांचे आईवडिल सुशिक्षित व चांगल्या हुद्द्यावर नोकरी करत होते. लग्न ठरवतांना आपल्या समाजात साधारण इतकेच बघितले जाते. मग त्या दोघांची मानसिक पातळी काय आहे, ती जुळते की नाही याचा विचार एकतर फार उशिरा करण्यात येतो अथवा बऱ्याचदा तो विचार करतही नाहीत. याचप्रकारे इथेही तो विचार केला नव्हता.

मी सुनयनाला बाहेर बसायला सांगून सुरेशला आत बोलावले. सुरेश दिसायला देखणा. उंचापुरा होता. बोलायला लागल्यावर लगेच त्याची हुशारी लक्षात आली. पदवीधर झालेला सुरेश एका नामांकित कंपनीत नोकरीला होता. सुनयनाही पदवीधर होती. परंतु तिच्यात सुरेशएवढी प्रगल्भता नव्हती. त्यामुळेच दोघांच्या आवडी-निवडींत बरीच तफावत होती. सुरेशला उत्तम लेखन वाचायला आवडायचे तर सुनयलाला मात्र फेमिना सारखी मासिके वाचायला आवडत. फिरायला जाणे व मौज करणे हिच तिची आवड होती. सुरेशलाही फिरायला आवडे पण त्या फिरण्यातून निसर्गाचा अभ्यास अथवा नवीन काही शिकायला मिळावे असे वाटे.

सुरेशला त्याच्या व सुनयनाच्या मधील भिन्नता लग्नानंतर लगेच लक्षात आली. 'बाई, मी सुनयनाला बदलायचा बराच प्रयत्न केला. सुरुवातीला प्रेमाने समजावले, नंतर अटी घतल्या पण मी सहा महिन्यांनंतर थकलो व मलाच भरपूर तडजोड करावी लागणार याची मनात गाठ बांधली. तेव्हाच सुनयनाला बाळाची चाहूल लागली व घरच्यांनीपण जास्तीत जास्त सुनयनाला जप, तिच्या मनाविरुद्ध काही करु नको हेच बजावले. मग माझा नाईलाज झाला. मी आणि घरची सर्व मंडळी तिला अगदी तळहातावरच्या फोडाप्रमाणे जपत होतो. पण त्याचा तिने गैरफायदा घेतला. तिने स्वत:चा स्वैरावार कमी करण्याऐवजी वाढवला. मी काही तिला मोकाट सोडले नव्हते. तिची पत्रे तुम्ही वाचा म्हणजे तुम्हाला कळेल, मी काय म्हणतोय ते. अहो बाई, आपल्या मनातही जे विचार आपण आणूही शकणार नाही ते ती अगदी सहजगत्या कागदावर लिहू शकते. नको बाई तो विषयच मी काढत नाही. मला त्यावर काही बोलायचेही नाही. मी मागितला त्याप्रमाणे तुम्ही मला घटस्फोट मिळवून द्या व माझ्या मुलाला समीरला माझ्याकडे द्या. ह्या सगळ्या कटकटींमुळे त्याला त्रास होत असेल. समीरला ह्यासगळ्यापासून थोडे दूरच ठेवायला हवे.'

सुरेश, तुम्ही म्हणताय ते मला कळतंय पण सुनयनाची बाजू तुम्ही समजून घ्या. तिचे वागणे तसे का होते हे

लक्षात घ्या व नंतर आपण सर्व एकत्र बसून काय तोडगा निघेल ते बघुया. समीर सध्या लहान आहे तेव्हा सध्यातरी त्याला त्याच्या आईकडेच राहू द्या. नंतर मोठा झाल्यावर त्याचे तोच ठरवेल. सध्यातरी त्याला आईची गरज जास्त आहे. नंतर मी दोघांनाही एकत्र बोलण्यासाठी बोलाविले. सुनयना आली. ती आल्यावर सुरेशने त्याची खुर्ची सरकावली व तिच्याकडे फारसे बघावे लागणार नाही याप्रमाणे तोंड फिरवून बसला. सुनयनामात्र खोलीत शिरल्यापासून एकटक सुरेशकडेच बघत होती. एकीकडे तिचे सुरेशना विनवणे चालू होते, 'सुरेश, ह्यावेळेस मला माफ करा. मी यापुढे कोणालाच पत्र काय साधा फोनही करणार नाही. पण नसते आरोप माझ्यावर करु नका. माझे तसे काहीच नाही हो!'

'हे बघ सुनयना, तुला जे काही सांगायचे आहे ते माझ्याशी नाही, माझी सहनशक्ती संपलीय. उगाच ताणण्यात काय अर्थ? तू आपले म्हणणे कौन्सिलरला सांग. त्या म्हणतील तसा मार्ग मला पटला तर मी पत्करीन नाहीतर कोर्ट देईल तो निर्णय मला मान्य असेल. मी आज फक्त एवढीच विनंती केली आहे की मला समीरला ताबडतोब बघायचे आहे. तसा मी कोर्टात अर्जही दिला आहे. त्यावर तुला काय बोलायचे असेल ते बाईंना सांग.'

हे बोलणे चालू असतांनच मी त्याचे निरिक्षण करत होते. सुरेश वरवर अतिशय शांत दिसत असला तरी मनातून तो बरेच चिडलेला व त्रासलेला दिसत होता. त्याच्या कपाळावरच्या आठ्या व वक्राकार भुवया सांगत होत्या. म्हणूनच मी मनात ठरवले याक्षणी ती दोघंही कुठलाही निर्णय घेण्याच्या मनस्थितीच नव्हती. म्हणून मी त्यांना आलेल्या प्रसंगाचा सखोल विचार करण्यासाठी आठ दिवसांची मुदत घ्यायला सांगितली व परत भेटीसाठी बोलावले. जातांना सुनयनाला समीरला नक्की आण हे सांगून पाठवले.

ती दोघे गेली त्या दिशेकडे बघत मी विचार करत होते, विवाह समुपदेशनाचे काम सुरु केल्यापासून अशी निदान चार तरी जोडपी दररोज भेटत होती. ह्या जोडप्यांतली विसंगती चुकवण्यासारखी होती. मग अशी चूक घरच्याकडून झाली की त्यांच्या नियतीतच तसे होते?

आठ दिवसांनी ठरल्याप्रमाणे दोघेही वेळेवर कोर्टात हजर होती. सुनयनाने येताना समीरला आणले होते. काही वेळा किती आया कारणे सांगतात. आज सर्दीपडसेच होते तर उद्या काय व त्यांना कोर्टात आणायचे टाळतात. कारण त्यांच्या मनात एक चीड असते. वेगळे झाल्यापासून त्यांनी मुलांचे पालनपोषण एकट्याने केलेले असते. मग आज वडिलांना एवढा पुळका का? ह्या त्यांच्या प्रांजळ प्रश्नाला उत्तर कोणाच जवळ नसते. फक्त दोघांची समजूत घालणे आम्ही करु शकतो व परत असे होता नये याची जाणीव देतो.

सुनयनाला मुळात स्वत:ची चूक कळली होती व तिला शक्यतो मिळते जुळते घ्यायचे असल्याने लहान असला तरीही ती समीरला घेऊन आली होती. समीरला बघताच लक्षात येत होते की नक्कीच तो सुरेशची हुशारी घेऊन आलाय. दीड वर्षाचा समीर छोटी छोटी वाक्ये छान बोलत होता. खोलीत आल्याबरोबर बाबा बाबा करत सुरेशकडे झेपावला. सुरेशने माझ्याकडे बघितले. त्याच्या डोळ्यातले भाव सांगत होते की मुलगा त्याला विसरला नाहीए, व दोघांना एकमेकांचा कसा लळा आहे.

मी सुरेश व सुनयनाला बसायला सांगून समीरला त्याच्या आजीकडे बाहेर पाठविले. उगाच त्या बाळाला आत्तापासून कशाला त्रास?

समीर बाहेर गेला व दोघांनीही बोलण्यासाठी तोंड उघडले व एकमेकांकडे बघत गप्प बसले. मीच मग सुरुवात केली. 'काय सुरेश? द्यायची मग एक संधी सुनयनाला? तिच्या चुका का घडल्या त्यावर आपण आत्ता बोलूया व परत तशा चुका होणार नाही ह्याची खात्री पटली की मगच तुम्ही दोघे एकत्र राहू शकाल. हा जो एकमेकांमध्ये विश्वास निर्माण व्हायला हवा आहे त्या साठी तुम्ही काय व कसे प्रयत्न करु शकाल?'

सुरेशने काही प्रतिक्रिया व्यक्त करण्याच्या आतच सुनयना म्हणाली, 'बाई! तुम्ही जे म्हणाल ते मी करायला तयार आहे. मी इथे ह्यांची तर माफी मागतेच आहे. पण घरातही सर्वांची मागेन पण माझा निर्णय पक्का आहे की मी

त्यात घरात परत जाणार. मला आणखी काहीच करायला सांगू नका. समीरलाही त्याच्या बाबांची गरज आहे, आवश्यकता आहे.'

'हे बघा बाई, मी तुम्हाला माझ्या निर्णयाबद्दल मागच्याच भेटीत बोललो आहे. जी पत्नी पतीपासून लपवून तिच्या मित्रांना पत्र-भेटी पाठविते तिच्यावर माझा संशय नाही, मी तिला वाईट चालीची म्हणत नाही पण अशा उच्छृंखल उथळ मनाच्या व्यक्तीबरोबर मी संसार करुच शकणार नाही. लग्नानंतरही हिने बऱ्याच अटी कबूल केल्या होत्या. परंतु त्यातली एकही लक्षात ठेवली नाही व तसा तिने वर्तणुकीत बदलही केला नाही. मग आज कबूल करुन ती तसे वागेल हे कशावरुन ठरवायचे? तुम्हीच म्हणालात विश्वास निर्माण करायला हवा. माझी मात्र आता सहनशक्ती संपली आहे. आता मानहानी, मनस्ताप नको. मीच जाणून बुजून तोडलेय ते कसेही सांधायचे म्हटले तरी मला जमणारच नाही हे नक्की. सुनयनाला घटस्फोट द्यायचा नसेल तर माझी कोर्टात जायची तयारी आहे. फक्त माझ्या समीरला माझ्याकडे द्या. आतापासूनच त्याच्यावर योग्य ते संस्कार व्हायला हवेत..'

सुरेश एवढे बोलत होता तेव्हा मी सुनयनाकडे बघितले. रंग उतरल्यासारखा तिचा चेहरा खाली उतरला. डोळ्यातून टिपंच पडायची बाकी होती. मीच परत दोघांशी बोलून कुठे काही जुळते का ते बघितले. सुरेश एकदातरी सुनयनाला संधी देऊन बगा. पुन्हा जर काही चूक झालीच तर तुम्ही तुमचा निर्णय पक्का करा. काय सुनयना तुझी तयारी आहे ना त्याच्या रितीप्रमाणे वागण्याची?
'

नको नको बाई, तुम्ही उगीच आम्हाला भरीस पाडू नका' इति सुरेश.

'सुनयना, देणार का माझ्याकडे समीरला?' सुरेशचा रोखटोक सवाल.

'एवढा लहान समीर. कसा राहिल तिकडे. तुम्ही त्याला फिरायला वगैरे घेऊन जा. माझी तयारी आहे पाठवायची.'

सुरेशचे बोलणे एवढे निर्णयात्मक होते की सुनयना बाकी काही बोलूच शकत नव्हती. त्याच्या बाजूने विचार करता तेही पटत होते. म्हणजे आज परत काहीच निर्णय होणार नव्हते. फक्त समीरला सुरेशने कधी, कुठे भेटायचे एवढेच ठरवले. त्यात असे ठरले की दर शनिवारी व रविवारी दोन ते तीन तास ते समीरला बाहेर फिरायला न्यायचे त्याप्रमाणे नेतील . तसा संमती अर्ज करुन कोर्टाला देण्यात आला. त्या दोघांनी परत दोन महिन्यांनी भेटायचे असे ठरले.

दोन महिन्यांनंतर दोघे आले. ती त्याच मनस्थितीत. सुरेश व समीरची चांगली मैत्री जमली होती. कोर्टात ठरल्याप्रमाणे नियमित दोघेही एकत्र येत होती. परंतु सुनयनाची दखलही सुरेशने घेतली नाही. याउलट सुनयना तिच्यापरीने सुरेशची बोलण्याचा प्रयत्न करत होती. पण तिच्या प्रयत्नांना यश येईल असे वाटत नव्हते.

मी सुरेशची एकटीने बोलायचे ठरवले व सुनयनाला बाहेर बसायला सांगितले. सुरेशची नेमकी काय भुमिका आहे हे मला ताडायचे होते.

सावकाशपणे सुरेशला सुनयनाची मनस्थिती, अल्लडपणा बोलून दाखविला व त्याला त्याबद्दल त्याचे विचार मांडायला सांगितले. सुरेश काहीच मानायला तयार नव्हता. 'आमच्या दोघांच्या स्वभावामध्ये एवढी प्रचंड दरी आहे व आम्ही दोघेही आहे त्याच समांतर रेषेत चालणार. मूळ लग्नातच चूक झालीए. आता कोणी वाट सोडून जुळवून घ्यायचे हे एक प्रश्नचिन्हच आहे. सुनयनाच्या वागण्याने एवढी बदनामी झाल्यावर मी आता तिच्याकडे पत्नी म्हणून बघू शकणार नाही. मग एकत्र येण्याचा खटाटोप कशाला? त्यापेक्षा शांतपणे वेगळे झालेले काय वाईट?'

सुरेश तुझे म्हणणे थोडेफार पटतेय. परंतु तुमच्या अशा वागण्याने समीर बिचारा त्रासतोय. त्याला का दोन्ही

पालकांपासून दूर ठेवायचे. त्यापेक्षा तुम्ही दोघेही बदललात तर निदान त्या बाळाला प्रेमळ मातापिता दोघेही एकत्र मिळतील.

'अहो बाई, तुम्ही म्हणताय ते पटतं पण मन तसे करायला मानत नाही. आजपर्यंत कोर्टात येण्याचे मी टाळले ते एवढ्याच कारणासाठी. परंतु आता सुनयनाचे वागणे सहनशक्तीपलीकडले आहे. मी आता कुठलीही तडजोड करायला तयार नाही. तुम्ही सुनयनाला संमतीने घटस्फोट द्यायला तयार करा. कारण मी आज कितीही म्हटले तरी कोर्टात भांडणे मला आवडणार नाही व माझी तशी इच्छाही नाही. तिला कायद्याने जे काही योग्य व आवश्यक आहे ते सर्व मी द्यायला तयार आहेच.'

'सुरेश, कोणी कुठला निर्णय घ्यायचा हा वैयक्तिक प्रश्न आहे. आम्ही ते मुद्दाम कोणावर लादू शकत नाही. परंतु योग्य निर्णय घेण्यासाठी जी काही आवश्यक मदत आहे ती सर्व आम्ही करतोच. सुनयनाशी बोलून मी हे सर्व करेन.'

'ठीक आहे बाई, तुम्ही तुमचे प्रयत्न करा. माझा निर्णय मात्र कायम आहे. त्यात जराही बदल होणार नाही हे निश्चित.' एतके बोलून सुरेश बाहेर निघून गेला.

सुनयना आत आली ती बऱ्याच अपेक्षा बाळगून. मला तिला सगळे समजवायचे म्हणजे बऱ्याचे कष्टाचे काम होते. विवाह समुपदेशकाने पक्षकाराच्या समस्येत स्वत:ला गुंतवून घ्यायचे नसते हे आपण शिकलेले असतो व आचरणातही आणतो. परंतु कधी कधी त्याचा मनाला त्रासही होतो. आज या दोघांना घटस्फोट घ्यायला लागतोय ते एका छोट्याशा चुकीमुळे हे जाणवल्यानेच वाईट वाटते पण शेवटी तटस्थाची भुमिका घ्यावीच लागते.

सुरेश तिच्याबरोबर एकत्र रहायला तयार नाही याची तिला मी कल्पना दिली. आजपर्यंत झालेल्या गाठीभेटींतून सुनयनाही थोडी तयार झाली होतीच. 'बाई, आमचे ठीक होईल पण समीरचे काय? मी काही त्याच्याशिवाय राहूच शकणार नाही.'

'अगं सुनयना! समीर आत्ता फारच लहान आहे. तो तुझ्याशिवाय राहू शकणार नाही हे आपण सुरेशला समजावून सांगूया. परंतु त्याला भेटण्याचे हक्क कायम रहातील. सुनयना, तू आज काहीच निर्णय घेऊ नकोस. पण पुढच्या तारखेला येशील तेव्हा तुझ्या आईवडिलांना घेऊन ये. आपण सगळे एकत्र बसून काय तो निर्णय घेऊ.'

अखेर प्रयत्न करुनही सुरेश सुनयना काही एकत्र येऊ शकले नाहीत. पुढच्या तारखेला सगळी आली होती म्हणून एकत्र बसून हेच ठरविले की सुनयनाकडे समीरचा ताबा राहिल. सुरेश नियमितपणे त्याला भेटेल. दोघांच्याही खर्चासाठी एक ठराविक रक्कम दरमहा सुनयनाच्या बँकेत सुरेश जमा करेल. शिवाय समीरला वेळोवेळी लागणारा शाळेचा खर्च तसेच त्याचे छंद जोपासण्यासाठी जो काही खर्च होईल त्याची तरतूद म्हणून सुरेश व त्याच्या वडिलांनी स्वत: एक ठराविक रक्कम समीरच्या नावे कायम स्वरुपाची ठेव बँकेत ठेवली की ज्याचे व्याज समीरच्या शिक्षणासाठी उपयोगी येईल. सुनयनाचे सगळे हक्क, 'स्त्री-धन' तिला मिळणार होते. सुनयना सुरुवातीला तयारच नव्हती पण ४-६ महिन्यांत तिची मानसिक तयारी झाली व तिनेही प्राप्त परिस्थितीचा स्वीकार केल्याने कुठलेली पुरावे न दाखवता तडजोडीने घटस्फोट घेण्यात दोघेही यशस्वी झाले. एवढेच एक मानसिक समाधान.

त्या दोघांनी कोर्टात सह्या केल्या त्यादिवशी मात्र मनात आले, हे लग्न झालेच नसते तर? किंवा दोघांनाही विवाह म्हणजे काय, कशा प्रकारे एकमेकांशी सामंजस्याने व मनमोकळेपणाने रहायचे असते ते दोघांनाही विवाहपूर्व कळले असते तर पुढचा अनर्थ टळू शकला असता.

# पश्चाताप

तिशीच्या आसपास वय, भेदरलेला चेहरा, घामाघुम झालेली सुनिता माझ्याकडे आली. आत येतांना तिच्याबरोबर कोणीतरी पुरुष होते. पण त्यांना आत येण्यास मनाई केल्याने ते बाहेरच थांबले. सुनिता मात्र जरा गांगरुन गेली. तिला बसायला सांगून जरा शांत केले. तिच्या चेहऱ्यावरुन ती कोर्टात येण्याला किंवा मला घाबरली नसून बाहेरच्या तिच्यासोबत आलेल्या पुरुषांना घाबरली होती असे दिसत होते. मी तिला आपले बोलणे गुप्त ठेवले जाईल, बाहेर आवाज जाणार नाही किंवा त्या व्यक्ती आत येऊ शकणार नाहीत ह्याची खात्री दिल्यावर ती जरा मोकळी बसली. पाणी पिऊन जरा शांत झाल्यावर तिच्याशी बोलायला सुरुवात केली.

पहिल्या भेटीत सुनिता गप्पच होती. मी वेगवेगळे प्रश्न विचारल्यावर त्याची तुटक व अगदीच थोडक्यात उत्तरे देत होती. काही प्रश्न तर टाळतच होती. तिला थोडा जास्त वेळ देण्याची गरज होती. मी जबरदस्ती केली नाही. तिला हवे तेवढेच सांगू दिले व पुढची तारिख दिली. तारिख दिल्यावर तिच्या सोबतची मंडळी मला भेटली. त्यांच्यामते सुनिताला कोर्टात न आणता तिच्या घटस्फोटाच्या अर्जाचा विचार व्हावा. पण हे कसे होणार? मी सुनिताला यावेच लागेल असा आग्रह धरला. तिच्यासोबत असलेल्या ४-५ पुरुषमंडळींपैकी कोणीही तिच्या नातेवाईकांपैकी नव्हते. काहीतरी काळेबेरे असल्याची चाहूल मला लागली. पुढील तारखेला सुनिताशी पुन्हा बोलण्याचे ठरविले.

सुनिताच्या नवऱ्याला घटस्फोटाचे कागद पोहचते केल्याचा रिपोर्ट होता पण एकाही तारखेस तो हजर नव्हता. आज सुनिताची पाचवी तारिख होती. मी तिच्या नवऱ्याला पुढच्या तारखेस मला भेटण्याचे पत्र टाकले.

सुनिताशी झालेल्या पहिल्या भेटीत ती एका मैत्रिणीकडे रहाते असे सांगितले होते. तिचे आईवडिल गावी असतात. तिला दोन मुले होती. त्या दोन्ही मुलांसह ती मैत्रिणीकडे रहात होती. मुले तिकडेच शाळेत जात होती. तिला घटस्फोट हवा होता व तोही लवकरात लवकर. नवऱ्याविरुद्ध काहीही ती सांगत नव्हती. पण घटस्फोट हवा हे मात्र वारंवार सांगत होती. कोणीतरी पढविल्यासारखे बोलत होती. त्याव्यतिरिक्त एकही शब्द उच्चारत नव्हती.

त्यांच्या तरखेला आपण दोघांशी बोलू असे मी ठरविले. पण तारखेपूर्वीच राजेशचा (सुनिताच्या नवऱ्याचा) भाऊ मला येऊन भेटला. त्याला माझे पत्र मिळाले होते. सुनिताने केलेल्या केसचे पेपर्सपण मिळाले होते. पण कोर्टाच्या तारखेला तो हजर रहात नव्हता. कारण त्याला कोणीतरी तारखेला हजर राहिलास तर मारुन टाकू अशी धमकी फोनवर देत होते. राजेशचा भाऊ आज आला होता पण तो पण चिंताग्रस्त दिसत होता. त्याच्याकडून मला समजले की राजेश व सुनिताचे ठीक चालले होते व एके दिवशी अचानक दुपारी सुनिता मुलांना घेऊन निघून गेली. राजेशने तिच्या नातेवाईकांकडे तपास केला पण व्यर्थ. दोन महिन्यांनी घटस्फोटाचे पेपर्सत्याच्या हाती आले. त्यावरच्या पत्त्यावरही तो जाऊन आला पण तेथे सुनिता त्याला भेटली नाही. त्याच्यामते तो पत्ताही खोटाच होता. मी राजेशच्या भावाला राजेशला घेऊन येण्यास सांगितले. कोर्टाच्या तारखेपूर्वीची एक वेळ दिली. राजेश बोलावल्यावेळी हजर राहिला.

राजेश-३५ वर्षे वय, सावळा रंग, उंच, देखणा नसला तरी स्मार्ट दिसत होता. खूप हताश झाला होता. हे काय झाले व पुढे काय होणार ह्या विचारांनी गोंधळून गेला होता. बाई तुम्ही काहीही करा पण माझ्या सुनिताला व मुलांना माझ्याकडे परत पाठवा असे तो विनवत होता. सुनिताला व मुलांना भेटण्याची त्याची तीव्र इच्छा होती. दोन महिन्यांपूर्वी सुनिता घरातून निघून गेली तेव्हापासून त्याचे कशातच लक्ष लागत नव्हते. त्याचे रेडिमेड ड्रेसेस विकण्याचे दुकान होते. सुनिताने ड्रेस डिझाईनचा कोर्स केला होता. ती वेगवेगळे पॅटर्न्स तयार करुन द्यायची. त्यांची आमदनीपण पुरेशी होती. राजेशचे आईवडिल गावीच असत. ते म्हातारे होते. त्यांना खर्चासाठी तो पैसे पाठवी. इकडे राजेश व त्याचा भाऊ संतोष रहात होते. संतोषचे अजून लग्न झाले नव्हते. तो कधी घरी तर कधी दुकानात झोपत असे. दोघे भाऊ मिळून दुकान चालवत असत. दोघांचे एकमेकांवर प्रेम होते. दोघांचे चांगले जमत होते. संतोषचे सुनिताशी पण

चांगले जमत होते. मुलांच्या जाण्याने दोघे भाऊ हळहळत होते.

त्यांचे लग्न ५-६ वर्षापूर्वी झाले. पहिल्या २-३ वर्षातच दोन मुले झाली. दोघांचे अगदी सुरळीत चालू होते. कधी वादविवाद होत पण ते पण प्रेमानेच सोडवले जात होते. सुनिता राजेशच्या कामात मदत करत होती. घरचेपण तिलाच बघावे लागे. दुकानाचा व्याप वाढला तसे राजेश दुकानात जास्त वेळ थांबू लागला. घरी उशिरा येत असे, सकाळी लवकर घराबाहेर पडे. आणखी एक छोटीशी जागा दुकानासाठी घ्यावी ह्या खटपटीत तो होता. ह्या सर्व गडबडीत तो सुनिताला पूर्वीएवढा वेळ देऊ शकत नव्हता. सुनिता मग चिडचिड करायची. दोन्ही मुलांची जबाबदारी तिच्यावरच पडत होती. तिलापण पूर्वीएवढा वेळ दुकानात जायला मिळत नव्हता. सुनिता तशी भोळी व सरळमार्गी होती. पण राजेशचे आता तिच्यावर पूर्वीएवढे प्रेम राहिले नाही असे तिला वाटू लागले होते. राजेशला हे जाणवत होते. पण त्याचा नाईलाज होता. कामात तो अगदी गर्क असायचा. त्याचवेळी त्याचा बऱ्याच लोकांशी संपर्क आला. त्यातलाच एक त्याचा मित्र घरी वरंवार येत असे. त्याला सुनिता आवडली व त्याने तिच्याशी संवाद वाढवला. राजेश नसतांना तो येऊन गप्पा मारत बसायचा. सुनितालापण एकटेपण नको असायचे. हळूहळू त्या मित्राने सुनिताला आपल्याकडे ओढून घेतले. सुनिता तशी हलक्या कानांची व सांगेल त्यावर पटकन विश्वास ठेवणारी. त्या मित्राने तिला मग आपण पळून जाऊ म्हणून सांगितले. राजेश माल आणायला बाहेरगावी गेला होता. दोन दिवस तो घरी येणार नव्हता. संतोष दुकानातच रहात होता. ह्या संधीचा फायदा घेऊन त्याच्या मित्राने सुनिता व दोन्ही मुलांना घेऊन पळ काढला. राजेशला सुनिताबद्दल खात्री होती. ती त्याच्यावर प्रेम करते व ती अशी कोणाबरोबर जाईल यावर त्याचा विश्वास बसत नव्हता. पण संतोषने शोध लावला. त्या मित्राला भेटण्याचा प्रयत्न केला पण त्या मित्राने गुंड पाठवून संतोषला मारहाण केली. त्यामुळे पुढे काहीच करता आले नाही. राजेश सुनिता व मुलांना घेऊन जाण्यास आतूर होता. पण कोर्टाच्या तारखेस आल्यावरच दोघांची गाठभेट होणे शक्य होते. पोलिस संरक्षण मागून पुढच्या तारखेस हजर रहाण्यास राजेश तयार झाला.

सुनिता व राजेशने दिलेल्या माहितीत खूपच तफावत होती. कोणीतरी एकजण आपल्यापासून काहीतरी लपवून ठेवत होते व खरे सांगण्यास टाळत होते हे उघडच होते. सुनिता नवऱ्याबद्दल काहीच सांगत नव्हती तर राजेशच्या मते दोघांचे एकमेकांवर अपार प्रेम होते.

आज सुनिताची कोर्टाची तारिख. मी ऑफिसमधे पोहोचले तेव्हा राजेश येऊन बसला होता. तो तारखेला आला म्हणून मला बरे वाटले. सुनिता अजून आली नव्हती. तासाभराने ती आली. अगदी नटून आली होती. जणू कोणाच्या लग्नाला आली आहे. मी सुनिताला एकटीला बोलावले. तिने राजेशला बाहेर पाहिले होते. आत आल्यावर तिने हळूच विचारले की दार बंद करुन तिला माझ्याशी बोलता येईल का? मी होकार देताच दाराला कडी लावून माझ्याजवळ येऊन हळू आवाजात बोलू लागली. आज मी काही न विचारताच ती आपणहून सर्व सांगत होती. बाहेर तिच्याबरोबर आलेले पुरुष म्हणजे त्या राजेशच्या मित्राची माणसे होती. आज कोणत्याही परिस्थितीत एकतर्फी घटस्फोटाचा निकाल हातात घेऊन तो तिला गावी घेऊन जाणार होता. लग्नानंतर राजेश व सुनिताचे सुरळीत चालू होते. धंद्यासाठी राजेश जास्त वेळ बाहेर रहात असे. सुनिता कंटाळून जायची. मग अशातच त्याच्या मित्राशी तिची जवळीक वाढली. त्यावेळी तिचा पाय घसरला. त्याच्या मोहाला बळी पडून ती त्याच्याबरोबर बाहेर पडली. पण त्यानंतर त्याने एका खोलीत तिघांना नेऊन ठेवले. दिवसभर दोन्ही मुलांना कोणाकडेतरी पाठवून तो तिच्याशी शारिरीक संबंध ठेवत असे. दिवसभर त्याचा तिला त्रास होई पण तो ऐकत नसे. ह्यासाठीच तर तुला इकडे आणले असे म्हणायचा. १०-१५ दिवसांनी जबरदस्तीने काही कागदांवर सह्या करुन घेऊन तिला कोर्टात आणण्यात आले. त्याच्या मर्जीविरुद्ध वागली तर राजेशला ठार मारुन टाकू अशी धमकी तो देत होता. मग मात्र तिचा नाईलाज झाला. तो म्हणेल तसे ती वागू लागली. दोघांची नावे जवळच्या शाळेत घातली. ती दोघांना शाळेत सोडायला व आणायला जायची. दोघे नवराबायको सारखे रहात होते. सुनिता मनोमन ह्या सर्वाला कंटाळली होती. पण काय करावे हे तिला सुचत नव्हते. आजपण तिला घेऊन तो गावी जाणार होता. दोन्ही मुलांना ओळखीच्या एका बाईकडे ठेवणार होता. सुनिताला हे सर्व नको होते. यातून तिला बाहेर पडायचे होते. कोर्टाकडून यासाठी काही मदत होईल का असे ती विचारत होती. खूप बोलून झाल्यावर सुनिताला जरा मोकळे वाटत होते. मन हलके झाले होते. पुढचा विचार करायचा होता. निर्णय घ्यायचा होता. तिने स्वतःच यातून बाहेर पडण्याचा निर्णय तर घेतला होता पण आता हे कसे करायचे हा

प्रश्न होता. मी त्यापूर्वी राजेशशी बोलले होते. तो सुनिताला नेण्यास तयार होता. त्यामुळे तिला त्याच्याकडे जाणे शक्य होते. मी दोघांची गाठभेट घालून द्यायचे ठरवले.

राजेशला आत बोलावले. इतर कोणालाही आत येण्यास बंदी केली. दोघे एकमेकांजवळ बसले. सुनिता राजेशकडे बघत होती, कितीतरी दिवसांनी दोघांची नजरानजर झाली. वेळ कमी होता हे दोघांनाही माहित होते. सुनिताने राजेशला परत नेण्यासाठी विनंती केली. राजेशने तयारी दर्शवली. मागचे काय झाले यावर दोघेही बोलले नाहीत. कदाचित दोघांनाही ते माहित होते व दोघांनी एकत्र रहायचे ठरवले होते म्हणून असावे. रुमच्या बाहेर राजेशच्या मित्राची माणसे उभी होती. तेव्हा त्यांच्यासमोर तर दोघांना एकत्र जाणे शक्य नव्हते. दोन्ही मुले त्या मित्राच्या ताब्यात होती तेव्हा त्याच्याविरुद्ध असे जाणे दोघांनाही योग्य वाटले नाही. शेवटी दोघांनी ठरवले की आज कोर्टाची पुढची तारिख घ्यायची. सुनिताने परत त्याच खोलीवर जायचे. दुसऱ्या दिवशी मुलांना शाळेत सोडायला निघाल्यावर त्यांना घेऊन राजेशला स्टेशनवर भेटायचे. मग मात्र दोघेजण मुलांसह परस्पर गावी निघून जाणार होते. मुंबईत त्या मित्राकडून राजेशच्या जीवाला धोका होता. राजेश त्याला घाबरत होता. त्याचे दुकान संतोष सांभाळणार होता. दोघेही मुलांसह जयपूरला जाऊन परत धंदा उभा करणार होते. दोघांचे पक्के ठरले. दोघांनी एका कागदावर तसे लिहून दिले. राजेशला मी बाहेर पाठविले. मग सुनिताबरोबरच्या माणसांना आत बोलावले. आज घटस्फोटाचा निर्णय होऊ शकणार नाही व आता पुढची तारिख पडेल असे सांगितले. सुनिताने त्यांना सांगितले की राजेश घटस्फोट द्यायला तयार आहे पण पुढच्या तारखेला. सुनिता त्यांच्याबरोबर निघून गेली.

राजेशने दुसऱ्या दिवशी पोलिसांत नोंद करुन सुनिताला आपल्या सोबत ठरल्याप्रमाणे नेले. गाडीत बसण्यापूर्वी मला फोन केला. आम्ही सर्व जयपूरला जात आहोत. तेथे पोहचल्यावर पत्र देऊ असे सांगितले. दोघांचे १५ दिवसांनी पत्र आले. दोघे मुलांसह आनंदात होते. परत कामधंदा चालू करण्याची तयारी चालू होती.

महिनाभराने परत पत्र आले दोघांचा संसार चांगला चालू होता. ५-६ महिन्यांनी दोघे एकत्रितपणे मला येऊन भेटले. मुलांसह आज ते कोर्टात मला भेटण्यासाठी आले होते. गावाहून परस्पर माझ्याकडे आले होते व परत तासाभराने गावी जाणार होते. दोघांची न्यायाधिशांशी भेट घालून दिली. त्यांची केस काढून टाकण्यात आली.
दोघांचा सुखी-समाधानी चेहरा बघून मनोमन समाधान वाटत होते.

# घटस्फोट

"नाही नाही, मला माझ्या आईला अजिबात भेटायचे नाही." हे सोनाली मला सांगत होती. आज शनिवार होता व सकाळपासून कोर्टात हेच शब्द कोणाच्या ना कोणाच्या कडून कानावर येत होते. कोर्ट चालू असेल त्या शनिवारी पालक त्यांच्याकडे नसणाऱ्या मुलांना भेटत असतात. काही भेटी फार आनंददायी असतात व मुले आतुरतेने पालकांची किंवा पालक मुलांची वाट बघत असतात. तर काही फारच तापदायक असतात. त्यापैकीच सोनाली व तिच्या आईची (प्रतिमा) भेट.

सोनालीचे वडिल सुरेश शहा यांचे प्रतिमाबरोबर दुसरे लग्न आहे. सुरेश शहा यांची पहिली पत्नी वारली व त्यांना सुरेखा नावाची मोठी म्हणजे कॉलेजमध्ये जाणारी मुलगीही आहे. सुरेश शहा कोर्टात येण्यापूर्वी बरीच वर्षे बँकेत नोकरी करीत होते परंतु त्यांनी मुदतीपूर्व सेवानिवृत्ती घेऊन सध्या ते स्वत:चा व्यवसाय (शिकवण्या घेण्याचा) करताहेत.

सुरेश शहा व प्रतिमा यांचे प्रतिमाच्या रागीट स्वभावामुळे पटत नव्हते व त्याच कारणामुळे मागची दोन वर्षे ते एकमेकांपासून वेगळी रहात होती. सुरेश शहा यांनी कोर्टात प्रतिमाविरुद्ध घटस्फोटाचा अर्ज केला होता व सोनालीचा ताबा मागितला होता.

सुरेश शहा माझ्याशी प्रथम बोलतांनाच लक्षात येत होते की तो अतिशय समंजस आहे व प्रतिमाशी जरी त्यांचे पटत नसले तरी तिच्या भवितव्याची त्यांना काळजी होती व कोर्टाचा कसल्याही प्रकारचा आदेश नसूनही दरमहा एक ठराविक रक्कम ते प्रतिमाला चेकने देत होते. त्यातच त्यांचा समजूतदारपणा दिसून येत होता.

सोनाली ही सात वर्षाची मुलगी सुरुवातीला काही दिवस आईकडे रहात होती. परंतु शाळेत नेणे-आणणे आईकडून लांब पडत असल्याने आईनेच तिचा तात्पुरता ताबा वडिलांकडे देण्याचे कबूल केले होते. सोनालीशी बोलतांना लक्षात आले की, सोनालीसुद्धा आईच्या रागीट स्वभावाला थोडी कंटाळलेली असून सुरेश शहांकडे म्हणजेच वडिलांच्या घरी जायला तयार आहे. त्यामुळे कोर्टाने केसचा निकाल लागेपर्यंत ताबा सुरेश शहाकडेच देण्याचे ठरविले व त्याप्रमाणे तसा आदेशही कोर्टाने काढला.

याच आदेशामध्ये प्रतिमा व सोनालीच्या भेटीसाठीही आदेश दिला होता. त्याप्रमाणे दर पंधरा दिवसात एकदा सोनाली व प्रतिमाच्या सवडीने दोन तास कोर्टात भेटावे असे ठरले होते. याच त्यांच्या भेटी सुखद व्हाव्यात व कोणालाही त्याचा त्रास होऊ नये म्हणून त्या सगळ्यांना समुपदेशकाकडे पाठविण्यात आले होते.

प्रतिमाशी बोलतांना लगेच लक्षात येत होते की प्रतिमा जरा चिडखोर स्वभावाची आहे. लहान मुल आहे याचेही ती भान विसरुन राग प्रगट करते. त्यातच भर म्हणजे सोनाली वडिलांकडे राहिल्यापासून प्रतिमाला भेटायलाही तयार नव्हती. त्यामुळे प्रतिमा अजूनच चिडलेली होती. प्रतिमा मला लगेच म्हणाली एवढीशी चिमुरडी पोर पण मला, तिच्या स्वत:च्या आईला भेटायला तयार नाही? बघा बघा वडिलांनी तिला शिकविले आहे. प्रथम दर्शनी तरी प्रतिमाचे वागणे तापटच वाटत होते. पण तरीही तिची समजूत घालणे मला क्रमप्राप्त होते. प्रतिमाला परिथितीची कल्पना दिली व समजावले की, "लहान मुलांच्या काही गोष्टी अगदी मनावर बिंबतात व त्यांनी जर का एकदा मनात ग्रह केला की आई उगाच कारणाशिवाय रागवते तर मुलाची समजूत पटणे कठीणच होते. अशावेळी मोठ्यांनीच धीर धरायला हवा." प्रतिमाला मी हे अतिशय शांत शब्दात सांगितल्याने तिला थोडेफार पटले व तिने सोनालीशी समजूतीने वागायचे ठरविले.

सोनालीलाही शांतपणे पटविले की माझ्या उपस्थितीत आई तिला रागावणार नाही व कोर्टाच्या नियमाप्रमाणे थोडावेळ तरी तिला आईशी बोलायचे भेटायचे आहे. जर तिने हट्ट केला तर मला जबरदस्ती करावी लागेल. एवढे

म्हटल्यावर सोनाली म्हणाली, "मावशी, मी आईशी बोलणार नाही पण आम्ही एकत्र बसू." एवढे तिने कबूल केल्यावर आम्ही सर्व मुलांच्या संकुलात जिथे पालक आपल्या मुलांना भेटतात अशा खोलीत गेलो. सोनाली तिथे असलेल्या विविध खेळण्यांमध्ये रमली. हळूहळू एकीकडे सोनालीला वेगवेगळ्या विषयांत बोलते करुन तिच्या आवडी-सवयी पण लक्षात घेतल्या. मध्येच प्रतिमा तिला एखादा प्रश्न विचारायची. मनात असेल तर सोनाली उत्तर द्यायची किंवा दुर्लक्ष करायची.

सोनाली व प्रतिमाच्या भेटी ठरल्याप्रमाणे दर पंधरा दिवसांनी सर्वांच्या सवडीने विशेषत: सोनालीच्या शाळेच्या वेळेव्यतिरिक्त घेण्याचे ठरले व त्याप्रमाणे कोर्टाच्या देखरेखेखाली त्या दोघींच्या भेटी होत होत्या. सोनालीचा कल थोडासा प्रतिमाकडे झुकायला लागल्याचे लक्षात येत होते. प्रतिमा प्रत्येक वेळी हळूवार शब्दात सोनालीला सूचना करायची. कधी सोनाली नीट वेण्या घाल, तर कधी सोनाली व्यवस्थित कपडे करुन ये. सोनाली पुढील भेटीत मूकपणेच दाखवून द्यायची की प्रतिमाची सूचना तिने लक्षात ठेवलीच आहे. सोनाली व प्रतिमामधली अढी बरीच कमी झाली होती. नियमित भेटणे व भेटीत न रागवता खेळीमेळीने वागणे यामुळे थोडोशी आपुलकी दोघींमध्ये निर्माण झाली होती.

सुरेश शहा मात्र त्यांच्या विभक्त होण्याच्या निश्चयाला टिकून होते. बरेच दिवस लोटल्याने सोनालीची आईसुद्धा हळूहळू विभक्त होण्यास तयार झाली होती कारण प्रतिमालाही कळून चुकले होते की सुरेशचे च तिचे एकत्रित येणे, रहाणे शक्य नव्हते. समुपदेशकाकडे बोलतांना दोघांना असे लक्षात आले की जर एकत्र येणे शक्य नाही तर मग निदान वेगळे होतांना भांडणे कशाला. मग सुरेश व प्रतिमा समुपदेशकाकडे एकत्र बसले. विभक्त होण्याची पार्श्वभूमी तर तयार झालीच होती. फक्त त्यावर कोर्टाचे शिक्कामोर्तब बाकी होते.

सुरेश शहा यांनी सुरुवातीपासूनच समजूतदारपणा दाखविला होता. पत्नीला पोटगीही द्यायलाही ते तयार होतेच, नव्हे सुरुवातीपासून आपणहून देतच होते. प्रश्न राहिला तो सोनालीचा. त्यावर सर्वानुमते असा तोडगा काढला की जशा भेटी चालू आहेत तशाच परंतु कोर्टाबाहेरील एका सेवाभावी संस्थेत होणार होत्या. मे महिन्याच्या सुट्टीत १५ दिवस सोनाली आईकडे रहायला जाईल असेही ठरविले.

सुरेश शहा व प्रतिमा यांनी कायदेशीर घटस्फोट घेण्याचे ठरविले व दरम्यान सुरेश शहा प्रतिमाला एक ठराविक रक्कम चेकने देणार असेही ठरले. ही रक्कम दरमहा प्रतिमाचे दुसरे लग्न होईपर्यंत अथवा तिला नोकरी लागेपर्यंत देणार असे ठरले. अर्थातच सोनालीचा ताबा मात्र कायदेशीरपणे सुरेश शहा यांचेकडेच राहिला.

# पुरुष जात

सुवर्णाने परत यावे यासाठी सुरेशने कोर्टात दावा दाखल केला होता. सुरेश वय ४० वर्षे, सुवर्णा वय २१ वर्षे. सुरेश पोलिस कॉन्टेबल, सुवर्णा शिकत होती. सुवर्णा त्यांच्या मुलीला घेऊन तिच्या माहेरी रहात होती. तिला २ विवाहित भाऊ, आई आहे. वडिल नाहित. तिचे लग्न ती ९वीत शिकत असतांना झाले. जून महिन्यात शाळा नुकतीच सुरु झाली होती तेव्हा सुरेशकडून मागणी आली. पुढचे शिक्षण आम्ही करू, तुम्ही काळजी करु नका असे त्यांच्याकडून सांगण्यात आले. वडिलांचे वय ७० वर्षांचे असल्याने त्यांनी होकार दिला. साखरपुडा झाल्यावर लग्नाची घाई करु लागले. त्याच्या घरी बाईमाणूस कोणी नव्हते. दुसरा भाऊ पण अविवाहित होता. घरात कोणी कामाला हवे होते. लग्न झाले. तिचे वय अवघे १६ वर्षे.

ती आईच्या खूप जवळ होती. रोज आईच्याच जवळ झोपायची तिची सवय होती. लग्नाची पहिली रात्र तिच्या नणंदेकडे होती. एकच खोली, मधे पडदा. ते दोघे झोपले. तिला आईशिवाय झोपच येईना. मग नवऱ्याने हात लावला तरी ती दचकायची. गॅस सिलिंडर ठेवण्याच्या कोनाड्यात जाऊन बसली. पहाटे इतरांना चाहूल न देता परत अंथरुणावर गेली. त्याने त्याचा गवगवा केला नाही. आई तिलाच रागावली. 'रात्री नवऱ्याने काहीही केले तरी विरोध करायचा नाही', असे तिला बजावण्यात आले. ती भोळी, हो म्हणाली.

घरात हे दोघेच, पण घरात धुळीचा कणही त्याला चालायचा नाही. खूप संशयी. 'कोण आले, तू कुठे गेली?' ही रोजची उलटतपासणी. घराच्या बाहेर डोकवायला पण तिला संमती घ्यावी लागायची. हे महाराज पोलिस खात्यातले. त्यांचा रुबाब घरी चालायचा. घरी आल्यावर पायातले बूट बायकोने काढायचे, शर्ट काढायचा, चहापाणी द्यायचे, जेवायला वाढायचे व रोजच्या उलटतपासणीला उत्तरे द्यायची. मध्येच त्याचे काही बिनसले तर मार खायचा. कोणताही प्रतिप्रश्न करायचा नाही. लग्नानंतर पहिल्याच महिन्यात तिला दिवस राहिले. वय लहान त्यात हा शारिरीक-मानसिक छळ व गरोदरपण सर्वांनी ती अगदी कंटाळून गेली होती. एके दिवशी मग ती विष प्याली. त्याने दवाखान्यात भरती केले. तिला 'मी स्वत:हून चुकून औषध घेतले' अशी जबानी द्यायची जबरदस्ती केली. त्यातून ती वाचली. सोनोग्राफी केल्यावर मुलगी असल्याचे त्याच्या लक्षात आले. तेव्हा गर्भपाताचा आग्रह करु लागला. पण तिने ऐकले नाही. मारहाण सहन केली पण ती तिच्या निर्णयावर ठाम राहिली. आठव्या महिन्यात ती माहेरी आली. मुलगी कमी वजनाची झाली. औषधोपचार आईने केले. मुलगी झाली म्हणून सासरचे कोणी पहायलापण आले नाही. सव्वा महिन्याने तिला परत बोलावले गेले. माहेरच्यांनी तिची पाठवणी केली. घरी पूर्वीसारखाच त्रास चालू होता. आता पदरात लहान मूल. त्याची सर्व कामे करावी लागतच, पण घरात तान्ह्या बाळाने कुठे शी-शू केले तर त्याच्यासाठी ओरडा खावा लागे. एकदा तर तिच्या मुलीने लादीवर सू केली म्हणून त्याने रागाने त्या वर्षाच्या मुलीला कमरेवर तापत्या चमच्याचा चटका दिला. अजूनही तो डाग तसाच आहे. सुवर्णाला तर रागाने खूपदा फक्त हाताचा मारच नव्हे तर सिगारेटचे चटके, कमरेच्या पट्ट्याचे फटके, जे सापडेल त्याने मारले जायचे. शेजारचे कुटुंब चांगले होते. त्यांनापण सुरेश शिवीगाळ करत असे.

सुवर्णा एक-दोनदा माहेरी आली होती. पण माहेरची तिची समजूत काढत व परत पाठवून देत होते. आता मुलगी ३ वर्षांची झाली. शाळेत नाव घालायला हवे म्हणून सुवर्णाची धडपड होती. तिचे शिक्षण तर त्यांनी अर्धवटच ठेवले. लग्नाच्या वेळी पुढे शिकवणार म्हणून सांगितले पण नंतर जेव्हाजेव्हा ती त्याबद्दल बोले तेव्हा तिला मारच खावा लागला. आता मुलीला शाळेत घालायला पण ते तयार नव्हते. मुलगी आहे मग शिक्षणावर खर्च कशाला? असा त्यांचा विचार. माधुरी ४ वर्षांची झाली तेव्हा सुवर्णाला रहावेना. आतापर्यंत तिचा प्रत्येक वाढदिवस तिच्या आईने येऊन खर्च करुन साजरा केला होता. घरात धान्य, भाजी सर्व तिची आई पुरवत होती. आपण फक्त तिथे सुरेशच्या शरिरसुखासाठी व घरकामासाठी रहात आहोत अशी जाणिव सुवर्णाला झाली म्हणून तिने एक दिवस घर सोडले. माहेरी आली. आईला सर्व सांगितले. परत पूर्वीसारखी आईने समजूत घातली पण आता ती परत जायला तयार नव्हती. मनाने तिने पक्के ठरवले होते.

तिच्या पूर्वीच्या शाळेत ती गेली. मुख्याध्यापकांना भेटली. त्यांनी तिचे सर्व ऐकून घेतले व १०वीत प्रवेश दिला. भावांनी आर्थिक मदत केली. पण वहिन्यांच्या चेहऱ्यावरची नाराजी तिला समजून आली. तिचा नाईलाज होता. म्हणून तिने त्याकडे लक्ष दिले नाही. घरात सर्व काम ती करत होती. मुलीला शाळेत घातले. तिच्याकडे पण ती लक्ष पुरवत होती. काम करावे लागत असले तरी सासरच्यासारखे दडपण, भीती नव्हती. ती दहावी पास झाली. शाळेत तिचा सत्कार झाला. तिला मनापासून बरे वाटले. पुढे बीए साठी प्रवेश घेऊन आता आपण स्वत:च्या पायावर उभे रहाण्याचा निश्चय तिने केला. ती बारावीत गेली तेव्हा सुरेशने कोर्टात केस दाखल केली. कोर्टात यायला ती घाबरायची. त्याचा चेहरा पहावा लागेल ह्या कल्पनेनेच तिचे हातपाय गळून जात होते. आई-वहिनी तिला घेऊन आल्या. मी तिच्याशी बोलले. तिची व्यथा ऐकून मनात आले, आजच्या समाजातल्या स्त्रीचे स्थान काय? ती मुलगी म्हणून अत्याचार सहन करत होती. आता तिला तिच्या मुलीला ह्यापासून दूर ठेवायचे होते. ती परत जायला तयार नव्हती. घटस्फोट देऊन तरी काय करणार? का म्हणून घटस्फोट द्यायचा? त्याने तिच्याशी लग्न केले तेव्हा त्याचे वय होते ३५, ती होती १६ वर्षांची. लग्नानंतर तिला कळले होते की गावी ३-४ मुलींबरोबर त्याचे संबंध होते. पण विचारणार कोणाला? आणि विचारुन काय मिळणार? त्याची पुरुषाची जात, त्याला कसेही वागायची मुभा आहेच. लग्नात रु. २५,०००/- हुंडा रोकड दिली होती. घरातले सर्व सामान दिले होते. तो सामान द्यायला तयार होता पण रक्कमेबाबत मात्र तो मान्य करत नव्हता. सुवर्णाचे म्हणणे होते की जर त्याने पैसे परत केले तर ती ते तिच्या भावांना परत करुन टाकू शकेल.
सुरेशच्या मते त्याचा पगार कमी आहे. तो एवढी मोठी रक्कम देऊ शकणार नाही. सुवर्णाचे म्हणणे तो मान्य करत होता. त्याची वागणूक तशी होती. पण त्यात काही चूक नव्हते असेच त्याचे मत होते. तो पुरुष आहे, त्याच्या घरचे पुरुष असेच वागतात व बायकांना असेच वागवतात, मग त्याचे त्यात काय चुकले?

सुवर्णा परत जायला तयार नव्हती. सुरेश ती मागत असलेली रक्कम द्यायला तयार नव्हता. सुरेशचा नांदवण्याचा दावा होता. मुलीला दरमहा रु. ४००/- द्यायचे त्याने कबूल केले व तो ते देऊ लागला. मुलीला भेटण्याची त्याने एकदाही इच्छा दर्शवली नाही. केस कोर्टात चालू झाली. खरे खोटे करण्यात आले. त्याची व तिची जबानी झाली. उलटतपासणी झाली. शेवटी कोर्टाने त्यांचा अर्ज फेटाळून लावला. सुवर्णाला कोर्टाच्या हुकुमामुळे काही फरक पडला नाही पण सुरेशला दुसरे लग्न करायचे होते. सुवर्णाने सांगितले की त्याने एक बाई आणून ठेवली आहे. आता त्याचे दुसरे लग्न झाले काय आणि नाही काय? त्याला त्यामुळे काही फरक पडत नव्हता.

सुवर्णा गेली आता दुसरी! त्याची गरज भागत होती. त्याने काहीच चूक केली नव्हती का? इतरांच्या मते जर सुवर्णा त्याच्याकडे रहात नाही तर त्याने दुसऱ्या बाईला आणून ठेवले यात गैर काय? हे समाजातले चित्र कधी बदलेल का?

# अट्टाहास

वहिदा विशीतली तरुणी. जरा लाडावलेली, सगळ्यांमध्ये लहान व दिसायला सुरेख. म्हणून सगळीच तिचे कौतुक करायचे. लहान असल्याने घरकामाची जराही सवय नव्हती. हेच तिला लग्न झाल्यावर फार नडले.

वहिदाचे लग्न तिच्या नात्यातच म्हणजे मावसभावाशी झाले. तिच्या मावशीने हौशीने तिला मागून घेतली व नात्यातच लग्न झाल्याने हुंडा वगैरेचा प्रश्न आलाच नाही.

वहिदाचा नवरा युसुफ हा सौदी अरेबियात कामाला होता. लग्नानंतर दोनच महिन्यांत त्याला परत जायचे होते. तो असेपर्यंत नवी नवरी म्हणून युसुफ बरोबर फिरायला जाणे, मजा करणे एवढेच वहिदाला माहित होते. लग्नानंतरही तिचे सर्वपरीने लाडच होत गेले. हळूहळू युसुफचे परदेशी जाणे जवळ यायला लागले तेव्हा त्याने तिला समजावले, की आता तो गेल्यावर तिने घरातही थोडे लक्ष द्यावे, घरकामाचा हातभार उचलावा. युसुफ असतांना वहिदा कबूलही झाली. दोन्ही घरांमध्ये जोडी चांगली जमली याचा आनंदही झाला. युसुफच्या घरात तर सगळेच खुश होते.

युसुफ सौदी अरेबियात गेला व पंधरा दिवसांतच वहिदाच्या लक्षात आले की ती आई होणार आहे. घरात सगळ्यांनाच खूप आनंद झाला. तिचे डोहाळे हवे त्या तऱ्हेने पुरविण्यात येत होते. वहिदा अगदी आनंदात होती. तिचा व युसुफचा नियमित पत्रव्यवहार सुरु होता. पहिलटकरीण म्हणून युसुफच्या आईने वहिदाला सुचविले की, तिला हवे तेव्हा घरात सांगून ती आईकडे जाऊ शकते. वहिदाची आईपण हौशीने तिला न्यायला यायची. या आनंदोत्सवात दिवस कसे गेले ते कळलेच नाही. वहिदाला या सगळ्यांमुळे घरातल्या जबाबदाऱ्या वा काम काहीच करावे लागत नव्हते. बाळंतपणासाठी म्हणून वहिदा माहेरी गेली. जाताना तिच्या सासूने रितीरिवाजाप्रमाणे तिची साडीचोळी करुन तिला पाठविले व वहिदाला मुलगा झाला. सगळीकडे आनंदीआनंद झाला.

मुलगा झाल्याची बातमी ऐकताच युसुफ सुट्टी घेऊन आला. मुलासाठी भरमसाठ खेळणी, कपडे तसेच वहिदासाठीही कपडे, दागिने असे त्याने जेवढे शक्य होते तेवढे आणले. काहीही आणायचे म्हणून बाकी ठेवले नाही. घरात सगळ्यांच्या आनंदाला नुसते भरते आले होते. आनंदाने मुलाचे बारसे करुन त्याचे रफिक नाव ठेवले व दोन महिन्यांची सुट्टी संपवून युसुफ परत गेला. जातानाच वहिदाला त्याने सांगितले की रफिक तीन महिन्यांचा झाला आहे तेव्हा 'वहिदा, अब तू घर चल.' युसुफच्या आईनेही त्याला दुजोरा दिला. तिलाही नातवंड खेळवण्याची इच्छा झाली होती. तिने अगदी आनंदाने वहिदाला 'बेटी अब घर चलो' असेही सांगितले.

इथेच वहिदाचे बिनसले. लग्नानंतरची नवलाई, गर्भारपण व बाळंतपण सुखाने, ऐश-आरामात घालविल्यावर वहिदाला अजिबात घरी जायची घाई नव्हती. कारण तिला सासरी असलेला कामाचा डोंगर पुढे दिसत होत. तिला तर कामाची अजिबात सवय नव्हती. सासू व नवरा दोघेही मागेच लागल्याने वहिदाला नाईलाजाने का होईना सासरी यावेच लागले.

नवी नवलाई संपलीच होती. वहिदाची सासू हळूहळू तिला एक-एक काम सांगायची व ह्या जबाबदाऱ्या दिवसेंगणिक वाढतच होत्या. त्यातूनच तिचे व सासूचे खटके उडायचे. वादावादी व्हायला लागली. घरातील मोठ्या जाऊबाईंशी तर वहिदा फारच फटकून वागायची. जावेचे व वहिदाचे जराही पटत नव्हते.

रफिकला सांभाळून घरकाम करणे म्हणजे वहिदाला अगदी पहाड उचलण्यासारखे होते. शेवटी तर वहिदा व सासूची बरीच भांडणे व्हायला लागली ती पत्रातून युसुफपर्यंत पोहोचली. त्याचा परीणाम त्याच्या कामावर व्हायला लागल्याने युसुफ एके दिवशी सरळ नोकरी सोडूनच परत आला.

युसुफने वहिदाचीही बरीच समजूत घातली परंतु वहिदा काहीच ऐकायला तयार नव्हती. तिचा हट्ट एकच. युसुफने घर सोडावे व वहिदाला घेऊन वेगळे रहावे.

याच दरम्यान युसुफचा मोठा भाऊ अचानक अपघातामुळे गेला. ह्या आणिबाणीच्या प्रसंगीसुद्धा वहिदा मात्र वेगळे रहाण्याचा आपला हट्ट सोडायला तयार नव्हती. युसुफ मात्र शेवटी वहिदाच्या हट्टाला कंटाळला. रोजची सकाळ-संध्याकाळ वहिदा करीत असलेली कटकट त्याला नकोशी झाली. म्हणून तो वहिदाला म्हणाला, "वहिदा, तुझे जो करना है वो कर, मै इस हालातमें घर छोडके नही आ सकता!". वहिदाला तेच हवे होते. पडत्या फळाची आज्ञा घेतल्यागत तिने सुटकेस भरली व लगेच आईकडे मुलाला घेऊन निघून गेली. घरातील प्रसंग, सासूची, नवऱ्याची मनस्थिती या कशाचाही विचारच केला नाही.

युसुफ व त्याचे कुटुंबिय भावाच्या निधनातून जरा सावरले तेव्हा युसुफची आई व तो स्वत: वहिदाला आणायला गेले. त्यावेळेस वहिदाची आई जी युसुफच्या आईची बहिण आहे तिने युसुफ व त्याच्या आईची अतिशय वाईट शब्द वापरुन निर्भत्सना केली. त्या दोघींमध्ये असलेल्या नात्याचा किंवा त्यांच्या मताचा कसलाही विचार केला नाही. लगेचच शिवीगाळ व भांडण काढले. युसुफ मनातून चिडलेला होता व काहीही कारण नसताना सासूचे बोलणे ऐकून घ्यायला तो तयारच नव्हता. त्याचाही संयम संपला व लगेच त्याने वहिदाला सांगितले, "वहिदा, अब तेरा और मेरा कोई संबंध नही. फिर कभी वापस आनेकी कोशिश मत करो." व ताडताड पावले टाकित एकिकडे आईला घेऊन निघून गेला.

हे सगळे चालू असतांना वहिदाच्या वडिलांची एकदम तटस्थाची भूमिका होती. ते दूरुन सगळे बघत होते. परंतु युसुफच्या तडकाफडकी निघून जाण्याने त्यांच्या लक्षात आले की आता प्रकरण चिघळणार. तेव्हा त्यांनी वकिलाचा सल्ला घेतला व ताबडतोब कोर्टात रफिक व वहिदाला पोटगी मिळण्याकरिता अर्ज केला.

पहिल्यांदा जेव्हा ते जोडपे माझ्याकडे आले तेव्हा दोघेही अगदी दोन बाजूला तोंड करुन बसली होती. त्यांच्यातील दुवा म्हणजे त्यांच्या मुलगा "रफिक". रफिक आता दोन वर्षांचा झाला होता. थोडेफार बोलायलाही लागला होता. युसुफ व वहिदाशी बोलतांना असे निदर्शनास आले की त्यांच्यात फार मतभेद नसूनही त्यांनी लहान-लहान भांडणांना महत्त्व देऊन त्याचे भांडवल केले आहे. त्या संपूर्ण घराला थोडेफार समजावून परिस्थितीची जाणिव द्यायला हवी होती. सर्वांनी एकत्र बसून विचार विनिमय करायला हवा होता. समाजरुढीप्रमाणे वहिदालाच संसार कसा करावा याची जाणिव होणे अगदी आवश्यक होते.

युसुफ व वहिदाच्या कुटुंबातील वडिल माणसांनाही त्यांची मते जाणून घेण्याकरिता बोलाविले, त्यांनाही सगळ्या परिस्थितीची जाणिव होतीच. वहिदाचे वडिल जे तटस्थाची भूमिका घेऊन बाजूला उभे राहून बघत होते, त्यांना थोडा मान देऊन लक्ष घालायला सांगितले. सगळीच कुटुंबिय लग्नाआधीपासूनच नात्यातली असूनही एकमेकांशी त्रयस्थासारखी वागत होती. एक वेळ अशी होती की दोघी बहिणी (वहिदाची सासू व आई) रोज भेटल्याशिवाय त्यांचा दिवस जात नव्हता. त्याच बहिणी आज एकमेकांकडे बघायलाही तयार नव्हत्या. मग बोलणे तर बाजूलाच राहिले. या सर्व कुटुंबियांना परिस्थितीचे गांभीर्य समजावून सांगितले व सर्वांनाच त्यांच्या निग्रहापासून थोडे दूर झालात तर या समस्येतून मार्ग निघू शकेल याची कल्पना दिली. अर्थात निर्णय त्यांनाच घ्यायचा होता. दोन्ही घरातील सगळी एकत्र कोर्टात आलीत, तेव्हा त्यांना मागचे विसरुन जा व एकत्र येऊन बघा अशी सूचना दिली व सगळ्यांना थोड्याफार प्रमाणात ती पटली.

दरम्यान कोर्टातील येणे जाणे व भेटींमुळे वहिदाचा मुलगा रफिक याचाही सर्वांना लळा लागला होता. या भेटींमध्ये वहिदालाही बरीच समज आली होती. तिच्यातही मधल्या काळात घडलेल्या सर्व प्रसंगांमुळे थोडा समजूतदारपणा आला होता व हट्टीपणा कमी झाला होता. या सगळ्याची परिणिती युसुफ व वहिदा एकत्र नांदण्यात झाली. वहिदा व युसुफ एकत्र नांदायला गेल्यावर त्या दोघांना थोडा एकांत मिळावा म्हणून युसुफची आई थोड्या

दिवसांकरिता त्यांच्या मोठ्या सूनेकडे रहायला गेली.

युसुफ व वहिदा पंधरा दिवसांनी मला कोर्टात भेटायला येतच होते. वहिदाची कामाची तक्रार होतीच पण ती दोघे वेगळी रहायला लागल्यावर त्याची तीव्रता थोडी कमी झाली. युसुफची आई व सासू यांनीही एकमेकांची माफी मागून त्या दोघांच्या संसारात मदतच करायची ठरविल्याने सगळी भांडणे, राग-रुसवे एकदम मिटल्यासारखेच वाटत होते.

वहिदा व युसुफ अशा तऱ्हेने हळूहळू एकत्र येऊन त्यांनी नवीन जीवनाला सुरुवात केली. वहिदा व युसुफच्या कथेमधून असे निष्पन्न निघते की अगदी बारीक सारीक तसेच क्षुल्लक कारणावरुन पती-पत्नींमध्ये भावनिक जिव्हाळा निर्माण न होता एकप्रकारे दुरावा निर्माण होतो. त्यातच नातेसंबंधाची तसेच सासूची भूमिका व त्यांचे एकमेकांशी असलेले संबंध ह्यावर कौटुंबिक विकास अवलंबून असतो. अशा क्रियांतून पतिपत्नींना आपले विश्व निर्माण करणे कठिण होते व एकमेकांना मुकावे लागते. यात वैवाहिक सुखापेक्षा दुःखच जास्त सहन करावे लागते.

म्हणूनच मनात येते की असे राईचे पर्वत न होऊ देणेच लग्न बंधन टिकण्यासाठी श्रेयस्कर असते. ह्याच वहिदाने सुरुवातीलाच युसुफचे म्हणणे थोडेफार तरी ऐकले असते तर कोर्टाची पायरी चढण्याचा व्याप तरी वाचला असता.

****************************************************************************

# ई साहित्य प्रतिष्ठान

**मराठी** भाषा आता झेप घेण्याच्या मूड मध्ये आहे. रडणाऱ्यांकडे लक्ष नका देऊ. मराठीत कधीच नव्हते इतके वाचक आहेत आता. पुर्वी पुस्तकाच्या एका आवृत्तीच्या हजार दोनहजार प्रती छापल्या जात. पाच हजार म्हणजे डोक्यावरून पाणी.

आता ई पुस्तकांच्या जमान्यात एक एक पुस्तक पाच दहा लाख वाचकांपर्यंत जातं. वर्षाला चाळीसेक लाख डाऊनलोड होतात. वाचक एकमेकांना परस्पर फ़ॉरवर्ड करतात. व्हट्स अप, ई मेल, ॲप्प, ब्ल्यु टुथ, वेबसाईट, पेन्ड्राईव्ह, सिडी अशा असंख्य मार्गांनी पुस्तकं व्हायरल व्हायलीत. सुसाट सुटलित. खेड्यापाड्यांच्या गल्लीबोळांपासून ते जगाच्या पाठिवरच्या प्रत्येक देशात. रॉकेटच्या वेगाने सुसाट सुटलेल्या मराठीच्या वेगाला आता कोणी थांबवू शकत नाही.

या धूमधडक क्रांतीत सामिल व्हा. आपल्या ओळखीच्या मराठी साक्षरांना यात ओढा. त्यांचे ई मेल पत्ते, व्हाट्सप नंबर आम्हाला पाठवा. तुम्ही फ़क्त दहा वाचक आणा. ते शंभर आणतील. आणि ते दहाहजार. तुमच्या व्हाट्सप ग्रुपमधून याची जाहिरात करा. आपल्याला फ़ुकट पुस्तकं वाचकांपर्यंत पोहोचवायची आहेत. आपल्याला टिव्ही पेपर ची जाहिरात परवडत नाही. आमचे वाचक हेच आमचे जाहिरात एजंट. तेच आमची ताकद. मराठी भाषेची ताकद जगाला दाखवू.

www. esahity.com वरून डाऊनलोड करा.

esahity@gmail.com ला कळवून मेलने मिळवा..

किंवा ई साहित्यचे app.

https://play.google.com/store/apps/details?id=com.esahity.www.esahitybooks

या लिंकवर उपलब्ध आहे